रविवार
आधुनिक केसरी
विश्वव्यापी मराठी दैनिक
रविवार, १४ जानेवारी २०२४





मांडणी व सजावट
अतुल ह. खंडगावकर

# शिवसेनेतील घराणेशाहीला चपराक ?

आधुनिक केसरी

**शिवसेना कोणाची? पक्षाच्या आमदारांच्या अपात्र प्रकरणावर विधानसभा सभापती राहुल नार्वेकर यांनी निकाल दिला. त्यावर देशभर पुन्हा चर्चा सुरु आहे. शिवसेना ठाकरे परिवाराऐवजी सामन्य कार्यकर्ता शिंदे गटाचा असल्याचा निकाल दिला आहे.हा निकाल आपल्या बाजूने का दिला नाही? म्हणून ठाकरे गटाकडून आक्रोश सुरु आहे. सभापतीनी पक्षातील घराणेशाही या निकालात चांगलाच धडा शिकविला! पक्षाच्या मावळ्यांना गद्दार म्हंटले गेले! शिंदेसह १६ मावळे गद्दार नाहीत, ते सर्व पात्र आहेत, स्पष्ट केले! शिवसेनेतला बंडाचे अनेक झटके बसले! पण ५६ वर्षानंतर सामान्य कार्यकर्त्याच्या भूकंपाचा ठाकरे परिवाराला मोठा हादरा बसला.पण शिवसेना पक्ष अजून जीवंत आहे.आता ठाकरे काय करणार? त्यांचेसमोर न्यायालयात व निवडणुकीला सामोरे जाणे, हे दोन पर्याय आहेत. पण त्यापेक्षा मन व मतभेद चर्चेतून मिटवितात येतात! पुन्हा शिवसेना एकत्रित येवू शकते.**

निवडणूक आयोगाच्या माहितीनुसार देशात ६ राष्ट्रीय पक्ष आहेत.तर प्रादेशिक पक्षाची संख्या ५७ आहे.देशातील सर्व पक्ष एका परिवाराच्या मालकीचे बनले आहेत.महाराष्ट्रात राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची मताची टककेवारी कमी झाल्याने या पक्षाची'राष्ट्रीय पक्षाची मान्यता रद्द झाली. महाराष्ट्रात स्वतः च्या पक्षाला एकहाती सत्ता आणता आलली नाही,पण देशात भाजपा व मोदी यांचा पराभव करणार! यावर पवार जेँव्हा भाष्य करतात, तेंव्हा यांचे आश्चर्य वाटते! या राष्ट्रीय नेत्याचे हे कर्तृत्व आहे.पण महाराष्ट्राच्या राजकारणात उलथापालथ करणारे चाणाक्ष नेते! राज्यात सरकारे पाडली,नवीन सरकारे आणली आहत! महाराष्ट्रात नवीन नेतृत्व करणारा देवेद्र फडणवीस राज्यात भाजपा ताकद वाढवितो हे त्यांना बोचत होत.राज्यातील.२०१४ व २०१९ च्या विधानसभा निवडणुकीत भाजपाने सर्वाधिक मिळविल्या होत्या.तैंव्हा राज्यात भाजपा सत्तेत येवू द्यावयाचे नाही,यासाठी समविचारी व कट्टर



कमलाकर जोशी
ज्येष्ठ पत्रकार, नांदेड
संपर्क क्र. 9422170850

हिंदुत्वादी शिवसेनेशी सत्ता मैत्री करण्याचा धूर्त डाव नेते शरद पवारांनी शकुनी संजय राऊत यांच्या मध्यस्थीतीने रचला !त्यात त्यांना यश आले.सत्ता हाती घेतली.पण या सरकारने भानगडी केल्या!पण पवारांना शेरा सव्वाशेर निघाला नेते फडणवीस निघाले. भाजपाविरोधात डाव खेळला तो त्यांच्या अंगलट आणला.दोन्ही पक्षात फूट पडली आहे.आता हिंदुच्या मतात फूट पडावी यासाठी आरक्षणाचा वाद सुरु केला आहे!शरद पवारांनी.ना। समाजाचे ना! शेतकऱ्यांचे,त्यांनी गुरूला मानले नाही.ते ठाकरे कायमची साथ देतील काय? काँग्रेस व राष्ट्रवादी काँग्रेसने उध्दव ठाकरे यांना सत्तेच्या मोहातून जाळ्यात ओढले.पण या पक्षाचे नेते शिवसेनेला खड्यासारखे कधीही बाजूला सारतील! हे ठाकरे समजायला हवे! देशात शिवसेनेला स्व. बाळासाहेब ठाकरेंनी प्रतिष्ठा मिळवून दिली त्या पक्षाची काय दशा झाली आहे. ते पहा! महाराष्ट्रात मराठी भाषिकांना न्याय मिळावा,यासाठी शिवसेना प्रमुख बाळासाहेब ठाकरे यांनी १९ जून १९६६ ला शिवसेनेची स्थापना केली. तेंव्हा त्यांनी शिवसेना ८० टक्के समाजकारण व २० टक्के राजकारण करेन,असे सांगितले होते.आता या पक्षात शंभर टकके राजकारण केले जात आहे.ठाकरेंनी राजकारणात हिंदुत्वाच्या विषयावर १९८९ मध्ये भाजपाशी युती केली.त्यांनी महाराष्ट्र विधानसभा व संसदेत भगवा ध्वज फडकविण्याचे वचन दिले. राज्याच्या इतिहासात १९९५ प्रथम भाजपा व सेना युतीची सत्ता आली.मनोहर जोशी हे युतीचे पहिले मुख्यमंत्री झाले. त्याच ज्येष्ठ नेत्याचा ठाकरेंकडून अवमानाची वागणूक दिली जातेय!शिवसेना प्रमुखांनी काँग्रेस पक्षाची भूमिका मांडताना 'सेना खूर्चीसाठी युती तोडणार नाही. पक्ष काँग्रेसशी मैत्री करणार नाही,जर केली तर पक्षाचे दुकान बंद करीन,असे जाहीरपणे म्हणाले आहेत. तितेकच नव्हे,ही 'शिवसेना तुमची आहे,माझी नाही,तुमच्या भल्यासाठी आहे.' बाळासाहेबांनी शिवसेना पक्ष हा आपल्या मालकीचा असल्याचे कधीच म्हंटलेले नाही. सेनेतील ज्या कार्यकर्त्यांला राजकीय वारसा नाही,अशा कार्यकर्त्यांना पक्षाची उमेदवारी दिली व त्यांना आमदार केले.विशेषतः ठाकरेंनी ओ.बी.सी समाजाला तरुणांना जवळ त्यांना मोठे केले.त्यावेळी शिवसेनेत दगडाला उभे केले ,त्याला निवडून आणण्याचे ताकद होती ! असे उगाच म्हंटले जायचे नाही!त्यांनी स्वतः साठी कधीच पद मागितले नाही सामान्य कार्यकर्ते आजही त्यांना दैवत मानतात,शिवसेनेने मराठी व हिंदूच्या रक्षणासाठी जीव देणारे मावळे निर्माण केले.आज सेनेतील नेते,पद व सत्ता यावरुन कार्यकर्ते,एकमेकांन शिव्या,डोके फोडून घेत आहेत.मग असे स्वार्था व दळभद्री नेते समाजाचे काय भले करणार? शिवसेनेला देशात नाव प्रतिष्ठा मिळाली होती.ती लयाला गेली आहे. देशातील मोठ मोठी मंडळी मातोश्रीवरुन जाऊन झुकायचे!तो आदर! आदरयुक्त भीती राहिलेली नाही.सत्तेवरुन शिवसेनेत फूट पडावी,या घटनेच्या सामान्य कार्यकर्त्यांना वेदना होतात,पण ठाकरेंना त्याची पर्वा नाही, राज्यात शिवसेनेने वेग-वेगळ्या सहा चिन्हावर निवडणुका लढविल्या आहेत शिवसेनेने १९८९ मध्ये धनुष्यबाण' चिन्ह घेतले.आजही झारखंड मुक्ती मोर्चाचे धनुष्यबाण हेच चिन्ह आहे. २००३ शिवसेनेचे कार्यकारी प्रमुख उध्दव ठाकरे यांची निवड झाली.बाळासाहेब हयात असेपर्यत महाराष्ट्रात युती अभेद होती. त्यांच्या मृत्यूनंतर मात्र पूत्र उध्दव ठाकरे यांनी राजकीय रंग दाखविण्यास सुरुवात केली. २०१४ मध्ये विधानसभा निवडणुकीत केवळ एका जागेवरुन त्यांनी युती तोडली.या दोन्ही पक्षांनी स्वतंत्रपणे निवडणूका लढविल्या व निकालानंतर पुन्हा युतीशिवाय पर्याय नाही,म्हणून युती आले. भाजपाला सर्वाधिक जागा जिंकल्याने भाजपाचे फडणवीस मुख्यमंत्री झाले.तेंव्हा युतीचा सत्तेचा फार्मूला बाळासाहेबांनी ठरविलेला होता.केंद्रात२०१४ भाजपा व मोदी सरकार सत्तेत आले. २०१९ मध्ये युतीने राज्यात लोकसभा आणि विधानसभा निवडणुका एकत्रपणे लढविल्या.केंद्रात भाजपा सत्तेत आल्यानंतर शिवसेना मंत्र्याचे रुसवे फुगवे चालू होते.तरी भाजपा सावध झाला नाही. उध्दवजी कपटीपणा करतील असे भाजपाल वाटले गेले.त्यांनी मित्र पक्षावर विश्वास ठेवला व त्यांनी सत्तेसाठी भाजपाचा विश्वासघात केला.


नेते पवारांनी उध्दवजींना मुख्यमंत्रीपदाची खूर्ची दिली,पण राज्याची सूत्रे स्वतः कडे घेतली.पण तत्पूर्वी पवारांनी राज्यात भाजपा- बरोबर सत्ता स्थापन करण्याचा भूमिका घेतले होती,त्यांचा हा धूर्तपणा नंतर उघडकीस आला.अजित पवार साहेबांच्या आदेशानुसार सकाळचे उपमुख्यमंत्री झाले होते.पण साहेबांनी अचानकपणे भूमिका बदलली वअजितदादांना तोंडघाशी पाडले.याचा परिणाम राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात फूट पडली.शिवसेनेच्या इतिहासात ठाकरे परिवार हा सत्तेत सहभगी झाला. वडील उध्दव व मुलगा आदित्य ठाकरे सत्ताभोगी बनले. पण आज पक्ष हातातून गेला आहे. उध्दवजींनी बाळासाहेबांच्या विचाराला छेद देणारे कृत्य केले.सत्तेच्या नशेत धूंद असल्याने ठाकरेंनी आमदार नाराजीची चिंता केली नाही.त्याचा परिणाम पक्षात २० जून २०२२ मध्ये भूंकप झाला.पक्षाचे गट नेते एकनाथ शिंदे यांचेवर विश्वास ठेवत २५ आमदार बाहेर पडले.पुढे शिंदे गटातील आमदारांची संख्या ४० वर गेली.शिंदे गटात,नेते कार्यकर्त्यांची संख्या वाढत गेली. यात शिंदे गटाचे बहुमताचे पारडे अधिक जड होत गेले ठाकरें,हे बंड त्यांना शमविता आले असते पण "शकुनी' संजय राऊतांच्या सततच्या बेताल विधानाने शिंदे- उध्दवजी यांचेत मतभेदाची दरी वाढत गेली.यातून ठाकरें यांना मुख्यमंत्रीपदाचा राजीनामा द्यावा लागला.यात सेनेच्या विचाराशी गद्दारी' कोणी केली?नंतर एकनाथ शिंदे यांची विधिमंडळ पक्ष नेतेपदी निवड झाली ते मुख्यमंत्री झाले.मग ठाकरेंनी शिंदे गटाच्या १६ आमदारांना अपात्र ठरविण्याची मागणी केली.शिंदे गटाने निवडणूक आयोगाकडे बहुमताच्या आधारावर शिवसेना पक्ष आपला असल्याचा दावा केला. आयोगाने दि. १७ फेब्रुवारी २०२३ रोजी शिवसेना पक्ष व धनुष्यबाण चिन्ह शिंदे गटाला देण्याचा निर्णय दिला.त्या निवणडणूक आयोगाला रखेल" म्हणण्या- पर्यत मज्जल गेली.ठाकरेंनी सर्वोच्च न्यायालयात शिंदे गटाच्या १६ आमदारा विरोधात अपात्रेची याचिका दाखल केली.यात न्यायालयाने विधानसभा पीठासीन अधिकाऱ्यांना निर्णय अधिकार आहेत,असा निकाल दिला. पण महाराष्ट्रात सत्ताकारणाचा पेच राज्य घटनेच्या दहाव्या परिशिष्ठात अडकला होता.यात १९८५ मध्ये ५२ व्या घटना दुरुस्ती करताना १० परिशिष्टात त्यात नमुद करण्यात आले की, खासदार व आमदार व कोणत्याही सभागृहाचे सदस्यांना याचिकेच्या आधारावर पीठासीन अधिकारी (लोकसभा- विधानसभा) पक्षांतर बंदीच्या निर्णयानुसार अपात्र ठरवू शकतात. इतेकच नव्हे,न्यायालय त्यात हस्तक्षेप करु शकत नाही.म्हणजे, पक्षांतरबदी कायद्यानुसार सभागृह अध्यक्षाच्या निर्णयावर न्यायालय पुनर्विचार करु शकणार नाहीत.हा निर्णय काँग्रेस राजवटीत झालेला आहे.नंतर न्यायालयाने ही अट रद्द ठरविली.मात्र पिठासीन अधिकारी जोपर्यंत निर्णय देत नाही.पण न्यायालये त्यात हस्तक्षेप करणार नाही,असे म्हंटले.त्यानंतर अध्यक्षाच्या निर्णयानंतरच आव्हान देण्यास सुरुवात झाली.कायदेतज्ञांच्या मते,राज्य घटनेत पीठासीन अधिकाऱ्यांना याबाबतचे अधिकार दिले आहेत ते काढून घ्यावयला हवे.कारण अध्यक्ष हा कोणत्या तरी पक्षाचा असतो. अध्यक्षाने निष्पक्ष असणे अभिप्रेत आहे.राजकारणाचा इतिहास पहाता, अध्यक्ष आपल्या पक्षाच्या विरोधात कधी निर्णय देत नाही,असेच दिसून आले आहे.पूर्वी घटनेतील अनुच्छेद ३२९ (अ) रद्द करण्यात आले.ते पुन्हा अपात्रेच्या याचिकेवर निर्णय देण्याचा अधिकार उच्च न्यायालयाला द्यावयास दिला गेला पाहिजे. याचप्रमाणे पक्षाच्या आमदारांना विरोधी मत मांडण्यासही वाव मिळाला पाहिजे.अशा बाबतीत पक्षाने 'व्हिप' काढणे,ही संकल्पना धोकादायक आहे.कारण मतभेद आणि पक्षांतर यात फरक आहे. तसेच राजकीय पक्षाच्या सत्तेतील वंश पंरपरेलाही अर्थ नाही. राजकीय पक्षात पक्षांतंगत लोकशाही बंधनकारक असले पाहिजे. त्यासाठी गुप्तपध्दतीने मतदान घ्यावयाला पाहिजे. तत्कालिन पंतप्रधान राजीव गांधींनी १९८५ मध्ये पक्षांतरबंदी कायदा आणला. याचे कारण १९६७ मध्ये हरियाणाचे आ. गयालाल यांनी एकाच दिवसात ३ पक्ष बदलले.तेंव्हापासून देशाच्या राजकारणात आयाराम- गयाराम हा वाक्यप्रचार रुढ झालेला आहे. महाराष्ट्र विधानसभेचे अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी राज्यघटनेनुसार शिंदे गटाच्या१६ व उध्दव ठाकरे गटाच्या १४ आमदारांच्या अपात्रेबाबत सुनावणी घेतली व दि.१० जानेवारीला निकाल दिला.





अध्यक्षांनी निर्णय देतांना दोन्ही गटाच्या आमदारांना अपात्र ठरविले नाही.तर बहुमताचा आधार घेत शिवसेना पक्ष व धनुष्यबाण चिन्ह हे शिंदे गटाला देण्याचा निर्णय दिला.त्यांच्या निर्णयावर सर्वोच्च न्यायालयात आव्हान देता येते, पण ठाकरे गटांनी अध्यक्षाच्या निर्णयावरुन जी आगपाखड केली.ती सुसंस्कृत महाराष्ट्रातील राजकीय नेत्यांचे हे लक्षण नाही.त्यांनी खालच्या पातळीवरचे शब्द वापरले.राऊत यांनी तर नार्वेकर,शिंदे व गोगवले यांची 'औकात' 'मॅच फिक्सिंग' तर ठाकरे पिता -पूत्रांनी या निर्णयाला तर 'निर्लज्जपणाचा' कळस,असे म्हंटले. ठाकरे गटाला बोलण्याचे व मर्यादेचे भान राहिलेले नाही.हे त्यांच्या अंगलट येवू शकते.आपल्या विरोधात निर्णय दिला तर लोकशाही,न्याय व घटनेची हत्या म्हणण्याची प्रथा पडत चालली आहे.उध्दवजी ठाकरे यांचेवर काँग्रेसच्या संगतीचा परिणाम झाला असावा.त्यांचे विरोधात हक्कभंग प्रस्ताव आणला जाऊ शकतो. २००८ मध्ये विलासराव देशमुख मुख्यमंत्री असताना राज्य निवडणूक आयोगाचे आयुक्त नंदलाल यांनी स्थानिक स्वराज्य संस्था पदाधिकारी निवडणुकीवरुन'मी विधिमंडळ सभागृहाला जाणत नाही,असे विधान केले.त्यांचे विरोधात हक्कभंग प्रस्ताव आणला होता त्यातुन त्यांना अटक करुन आर्थर जेलमध्ये पाठविण्यात आले होते. तेंव्हा राऊत हे' किस झाड की पत्ती.हे लक्षात घ्यावे.अध्यक्ष नार्वेकर यांनी निकाल देतांना पक्षाची घटना,नेतृत्व व विधिमंडळ बहुमताचा आधार घेतला आहे.त्यांच्या निर्णयाचे निरीक्षण करताना असे दिसून येते, उध्दव ठाकरे यांनी ज्या घोडचूका केल्या आहेत,तेच त्यांना भोवलेल्या आहेत.ठाकरे गटांनी२०१८ ची घटना सादर केली होती,त्यावर तारीख नाही.त्याची निवडणूक आयोगाच्या दफ्तरी नोंद नाही.घटनेत बदल करण्यात केला तो बदल निवडणूक आयोगाला कळविला गेला नाही.त्यामुळे शिवसेनेची २०१८ ची घटना मान्य करण्यात आलेली नाही. शिवसेनेची १९९९ ची घटना वैध ठरविली गेली.त्यामुळे शिंदेना मूळ शिवसेना व धनुष्यबाण चिन्ह मिळालेले आहे.शिवसेना प्रमुख सर्वोच्चपद मानले जाते.पण पक्षाच्या घटनेत हे पदच नाही. उध्दव ठाकरे हेच पक्ष प्रमुख असल्याचा दावा केला गेला,पण तसे सिध्द करणारे पुरावे दिले नाहीत. बाळासाहेब ठाकरे यांनी शिवसेनेत पक्षांर्तगत कधीच निवडणूका घेतल्या नाहीत,पण त्यांची पक्षप्रमुख सर्वसमंतीने निवड केली जायची व तो बदल निवडणूक आयोगाला कळविला जात जायचा.:पण उध्दजींना पक्षाचे व घटनेचा अभ्यासच नाही,असे दिसतेय!त्यांनी शिवसेनेत पक्षांतर्गत निवडणुका घेतल्या नाहीत.त्यांची पक्ष प्रमुख निवड झाली ते आयोगाला कळविले नाही. त्यामुळे ठाकरेंचे पक्षप्रमुखपद बेकायदेशीर ठरविले गेले.या निकालाने शिवसेनेतील घराणेशाहीला धडा मिळाला आहे. शिवसेनेच्या घटनेत पक्ष प्रमुखापेक्षा राष्ट्रीय कार्यकारिणीला निवड व हकालपट्टीचे अधिकार दिले गेले आहेत.ते पक्ष प्रमुखाना नाहीत,त्यामुळे ठाकरें यांना शिंदे यांना गट नेतेपदावरुन काढण्याचा अधिकार नाही.तो निर्णय पक्ष कार्यकारिणीने घेतलेला नसून ठाकरेंनी वैयक्तीकरित्या घेतलेला आहे.हे निकालात म्हंटले आहे. यात ठाकरे गट कायदेशीर बाजू मांडण्यात कमी पडला. शिंदे यांच्या बंडानंतर ठाकरे यांनी बैठक घेतली त्याची माहिती आयोगाला दिली नाही.पक्षाच्या सुनावणीच्यावेळी स्वतः उध्दव ठाकरे यांना उपस्थित राहण्याचा कमीपणा वाटला,ते अनुपस्थित राहिले. त्यामुळे त्यांची उलटतपासणी घेता आली नाहीत.अपात्रतेच्या याचिकेचे प्रकरण ठाकरे यांनी गांभिर्याने घेतलेले दिसत नाही,त्यांच्या अंहकारामुळे महाराष्ट्रात सत्तेचे महाभारत घडलेले आहे.याची त्यांना थोडीही खंत वाटत नाही.नेते शरद पवारांची पूर्वीची व्हिडीओ व्हायरल झालेली आहे. यात ते,'बाळासाहेबांनी कष्टांनी शिवसेना वाढविली व त्याचेवर उध्दव ठाकरे हे आयत्या बिळावर बसलेले हेत,त्यांचे शिवसेनेतील नेतृत्व शून्य आहे,'असे म्हणाले आहेत.तेंव्हा शिवसेनेच्या सर्व राजकीय घडामोडी पहाता वडिलांनी शिवसेना वाढविली ती मुलाने घालविली, असेच म्हणावे लागेल.या निर्णयामुळे आता राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात धाकधूक वाढलेली आहे.लोकशाहीत राजकीय पक्षात एका परिवाराचा कायमचा हक्क व पदे देण्याचा अधिकार असता कामा नये. तो लोकशाहीसाठी घातक आहे.त्यावर निर्बंध घालण्याची गरज आहे. आता मोदी विरोधी धोरणाचा फायदा घेत इंडी आघाडीत जागेच्या वाटपावरुन परिवारवादी पक्ष काँग्रस पक्षाची कोंडी करत आहेत. हे पक्षाला कळते आहे,पण वळत नाहीय!ठाकरे यांची अवस्था तीच झाली आहे.शिंदे गट त्यांच्या वडिलांना दैवत व पूजनीय मानतात, हा तर ठाकरे घराण्याचा अभिमान आहे.शिवसेनेला एक परिवार मानला जातो,तेंव्हा चूका होत असतात, अशावेळी सांभाळून घ्यावे लागते मनाचा मोठेपणा दाखवावा लागतो. घरात वाद झाला म्हणून घरच जाळून टाकायचे नसते परिवारात एका व्यक्तीच्या अंहकारामुळे घर व नाते कायमचे संपते.शिंदे व आमदार दसऱ्या पक्षात गेलेले नाहीत,ठाकरे व शिंदे यांचेत मत व मनभेद झालेले आहे.शिवसेनेचा हा उद्देश हिंदुत्वाचे रक्षण करणे आहे!मग तो उद्देश सफल होणार काय? इंग्रजांनी'फूट पाडो राज करो! ही नीती अवलंबली, तीच काँगेस वराष्ट्रवादी व इंडी आघाडीची आहे.नेहरु ते श्रीमती सोनिया गांधीपर्यंत सोमनाथ मंदिर ते अयोध्या मंदिर उभारणीला विरोध यातून काँग्रेसचा हिंदू धर्माच्या विरोधी धोरण आहे,हे स्पष्ट झाले आहे.तेंव्हा भाजपा व शिवसेनेने एकत्र येण्याची गरज आहे. ठाकरे व शिंदे या दोन नेत्यांना एकत्र आणून मार्ग काढता येतो! यात कमीपणा अथवा अवमान नाही,तो मनाचा मोठेपणा दिसेल.खर तर! शहाण्याने कोर्टाच्या पायऱ्या चढू नयेत! असे बुजूर्ग मंडळी म्हणत असत ते काही खोटे नाही.उद्या, ठाकरे यांना पश्चाताप करण्याची वेळ येईल! महाराष्ट्रात भाजपाने सत्तेसाठी राष्ट्रवादी पक्षाला सोबत घेतले,ही मोठी चूक केली.शिंदेनी हे सरकार सामान्यांचे असे म्हंटले होते.पण नांदेड जिल्ह्यातील हळदा येथील अत्यल्प भूधारक शेतकऱ्यांची दोन मुले मेली तो २०१९ पासून राज्य शासनाकडे आर्थिक मदतीची टाहो फोडतै आहे.पण सरकार व प्रशासनापर्यंत सामान्य माणसांचा आवाजच जात नाही.त्यांच्या कानात कोणीला तरी तेल टाकले पाहिजे. मुख्यमंत्री एखनाथ शिंदे यांनी विकास कामासाठी आमदारांना कोट्यवधी रुपायांचा निधी दिला.यात कमीशन घेवून अनेक जण कोट्यधीश झाले.भाजपासत्तेसाठी कोणत्याही पक्षाशी मैत्री केली तरी जनता त्यांच्या म्हणण्यानुसार त्या पक्षाला मते देईल हा भाजपाचा भ्रम आहे.तो येत्या निवडणुकीत भाजपाला कळेल!

शिवसेनेच्या पक्ष अधिकारावरुन न्यायालयात जाणे,आरोप व प्रत्यारोप करणे यातून पक्षाचे अधिकच नुकसान होत जाईल.कवी केशवसुतांच्या कवितेत म्हंटले आहे,'जुने जाऊ द्या मरणालागूनी,जाळून पूसून टाका। तेंव्हा ठाकरे साहेब!अजूनही वेळ गेलेली नाही!आपला अंहकार सोडा! शिंदे गटाशी चर्चा करा बोला!आपण शिवसेनेचे प्रमुख आहात,तो मान आपणाला मिळेल! शिवसेना पुन्हा संघटीत होवू शकते! ही अशक्य बाब नाही. महाराष्ट्रात हिंदवी स्वराज्याच्या तुतारी आवाज पुन्हा गगणात घुमू द्या. शिवसेना एकत्र येणे तुमचे व समाजाचे भले आहे.कारण मराठी माणसांचे व हिंदू धर्माचे रक्षण करण्याचे बाळासाहेबांना महाराष्ट्राला वचन दिले आहे,ते पूर्ण करा! भाजपा व शिवसेनेची विचारधारा एकच आहे.काँग्रेस व राष्ट्रवादी पक्षाचे नेते हातात भगवा ध्वज कधीच घेणारे नाहीत,कारण त्यांची धर्मनिरपेक्षता 'खतरेमे"येते.तेंव्हा सावध व्हा! ही एकत्र येण्याची वेळ आहे,मग बघा! महाराष्ट्र शिवसेनेला पुन्हा आपणाला डोक्यावर घेईल!.दुसरे काँग्रेस पक्षाचे दोनदा विभाजन झाले,पण श्रीमती इंदिरा गांधी ह्या डगमगल्या नाहीत.त्या निवडणुकीला सामोरे गेल्या व त्यांनी नेतृत्वाची ताकद दाखवून दिली.तेंव्हा घरात बसून आक्रोश न करता सर्वोच्च न्यायालयात जावे,लागेल किंवा जनतेचा दरबार म्हणजे येणाऱ्या लोकसभा व विधानसभा निवडणुकीला सामोरे जावे. भारतीय लोकशाहीत न्याय मागण्याचा हाच मार्ग आहे.




विश्वास देशपांडे
संपर्क क्र. 9403749932

## त्या फुलांच्या गंधकोषी

आधुनिक केसरी

आधीच्या एका लेखात मानवी जीवनात कवितेचे किंवा साहित्याचे स्थान कसे अपरिहार्य आहे हे मी लिहिलं होतं. तसंच मानवी जीवन हे आणखी एका गोष्टीने समृद्ध केले आहे. ती गोष्ट म्हणजे फुले. फुलांशिवाय आपल्या जीवनाची कल्पनाच आपण करू शकत नाही. आपली सकाळच मुळी होते ती वेळ असते फुले उमलण्याची. आपला दिवस सुरु होतो ती पहाटेची वेळ जणू आपल्याला म्हणत असते, “ अरे, ऊठ आता. बघ बाहेर. सृष्टीला जाग आली आहे, फुलांना जाग आली आहे. पूर्व दिशेला आपल्या रथावर आरूढ होऊन सूर्यदेव निघाले आहेत साऱ्या विश्वाला चैतन्यात न्हाऊ घालण्यासाठी. बागेतील, तळ्यातील कमल पुष्पे उमलू लागली आहेत. ऊठ आणि निसर्गाचा हा सोहळा बघ. आणि तुझ्या दिवसालाही अशीच प्रसन्न, सुगंधित सुरुवात कर. खरंच, टवटवीत, प्रसन्न फुले पाहिली की आपले मनही प्रसन्न होते. नुकताच मी भूतानला जाऊन आलो. तेथे इतकी विविधरंगी, टवटवीत, प्रसन्न फुले जागोजागी आढळतात की भूतानला फुलांचा देश म्हणायला हरकत नाही. भारतातही फुलांचे प्रकार काही कमी नाहीत. केरळ,काश्मीर, तसेच महाराष्ट्रातील महाबळेश्वर सारखी थंड हवेची ठिकाणी फुलांनी समृद्ध आहेत. पण पुष्प प्रेमींना त्यासाठी खास कुठे गेलेच पाहिजे असेही नाही. आपल्या बागेतील, आपण कुंडीत लावलेला एखादा गुलाबही आपले मन प्रसन्न करतो. आपण हौशीने एखादे फुलझाड लावावे आणि त्याला फुले आलेली पहावीत यासारखा दुसरा आनंद नाही. बरं, फुले तरी किती विविध प्रकारची..! त्यांची गणती करणे अशक्य. जाई, जुई, मोगरा, चमेली, गुलाब, पारिजात, बकुल, चाफा, मधुमालती, जास्वंद, झेंडू, शेवंती किती नावे घ्यावीत ..! प्रत्येक फुलाचा रंग वेगळा, गंध वेगळा.






## आनंदी पहाट

### विचारांना विशिष्ट दिशा असावी

आधुनिक केसरी

मानसिक स्वास्थ्य टिकवल्यावर आपल्या अंतरंगात प्रसूत होणारा आनंद निरंतर राहतो. अर्थात, प्रत्येकाची आनंदाची व्याख्या जशी निराळी असते, तशीच अनुभूती देखील वेगवेगळी असते. खरं तर, आपापल्या अनुभूती आणि प्रचीतीनुसार आपली आनंदाची व्याख्या तयार होत असते. आनंद आपल्या अंतरंगात निर्माण होत असतो. आपल्या विचार, वर्तन आणि व्यवहारावर तो निर्माण कसा, किती आणि कधी होतो ? ते अवलंबून असतं. अनेकदा आपल्या अंतर्मनातील विचारांमध्ये आपण गुरफटली जात असतो, अगदी न कळत होत असतं तसं. दिवसभरांत हजारो विचार आपल्या अंतर्मनांत निर्माण होत असल्याचं विज्ञानाच्या प्रयोगांतून स्पष्ट झालं आहे. त्या विचारांना विशिष्ट दिशा, गती अथवा विषय असतीलच असं नाही. दिवसभरात आपल्या मनांत आलेले सर्वच विचार, तसं बघितलं तर, आपल्या लक्षात देखील राहतातच असं नाही. ह्या जगात विचार नाहीत असा प्राणी नाही. अनेकदा आपल्या विचारांचा संबंध सभोवताली घडत असलेल्या घटनांशी असतो. हे विचार कधी व्यक्तिगत तर कधी इतरांशी संबंधित असतात. अनेकदा इतरांच्या उणिवा शोधणारे विचारच त्यांत अधिक असल्याचं दिसून येतं. आपल्यापैकी प्रत्येकांत काही उणिवा असतातच, उणिवा नसणारी व्यक्ती सापडणे सद्यःस्थितीत विरळाच; कालच्या काही उणिवा कुरवाळत बसण्यात आपण धन्यता मानतो, सतत उणिवांचीच, समस्यांचीच, दःखाचीच सर्वत्र आणि सातत्यानं आपण चर्चा करत राहतो. आजच्या आपल्या आणि इतरांच्या जाणीवा जपण्याच्या दृष्टीकोनातून आपण खरंच गांभीर्यानं विचार करतो का? आपल्या बुद्धिवादी जीवाला कालच्या उणिवा दूर करून,आजच्या जाणीवा जपून त्यांना नेणीवेपर्यंत नेण्याची आज खरी गरज आहे.



विद्यावाचस्पती विद्यानंद
संपर्क क्र. 7709612655

## कडी...

आधुनिक केसरी

घराला कडी असली की किती सुरक्षित वाटते. कडीला कुलूप लावलं तर अधिक सुरक्षित वाटतं. कडी दोनच अक्षरी शब्द .., पण किती सुरक्षित वाटते त्या कडीमुळे .घराला ज्या कडीमुळे सुरक्षित वाटते तशीच कडी मनालाही घातली पाहिजे .काही ठिकाणी मन आवरता आलं पाहिजे. कडी नसेल तर मन बेभान पळेल. पण कडी घातली तर त्याला आवरता येईल. जिभेलाही कडी लावावी लागते. नसता ती खूप मोकळी सुटते. आणि मग नको त्या प्रसंगाला तोंड द्यावं लागतं. जिभेला तर नुसती कडी असून चालत नाही लगाम पण घालावा लागतो. कारण बत्तीस दातांच्या सैन्यातून सुद्धा ती सुटतेच. जिभेला आणि मनाला कडी घालायला ज्यांना जमलं ते भाग्यवान आहेत. पण कधी कधी ही कडी उघडली पण पाहिजे. कडी उघडून मनाची दारी मोकळी करा. श्वास गुदमरणार नाही. नाहीतर सतत कडी लावूनच ठेवली तर मानसिक आरोग्य बिघडेल किंवा हृदयरोग होईल. जसं दाराला कडी आपण खूप काळजीपूर्वक घालतो. आणि पुन्हा वेळेवर उघडतो सुद्धा. तसंच मनाच्या दाराची कडी कधी बंद तर कधी उघडी करायला विसरू नका. कुत्रा मांजर यांची घराला भीती असेल तर दाराला फक्त कडी घालतात. पण माणूस नावाच्या चोराची भीती असेल तर मात्र कडी कुलूप दोन्हीही लावावं लागतं. मग घर कसं सुरक्षित वाटतं. आणि घरातील माणसं पण.... किती ताकद आहे ना या कडीमध्ये. एका निर्जीव वस्तूवर सुद्धा माणूस किती विश्वास ठेवू शकतो. मग माणसावर का नाही ठेवू शकत.?? कारण कधी कधी माणसं विश्वासघात करतात. विश्वासातच विष असतं.एकदा विश्वास उडाला की तो लवकर हाती लागत नाही. तो उडतच राहतो. विश्वास कोणावर ठेवावा? कडीवर की माणसावर.,? कडीवर...कडी आपलं रक्षण करते.पण माणसाची ग्वाही नाही देऊ शकत. का असा अविश्वासू वागत गेला माणूस.? कडीचं मोल वाढलं ,माणसापेक्षा. कडी एकात एक गुंफलेली....

संस्कारधन



सौ.मंगला चौरे
संपर्क क्र. 9422711515

भाग.32

## कष्टाची कमाई श्रेष्ठ

आधुनिक केसरी

**एका गावात दोन चोर राहत होते. ते प्रत्येक दिवशी चोरी करत आणि आलेले धन तीन हिस्से मध्ये वाटून घेत. आपापला हिस्से स्वतःसाठी व एक हिस्सा ईश्वराला ठेवतात. असे खूप दिवस चालत होते. एका रात्री ते चोरीसाठी दुसऱ्या गावात निघाले. बरीच वेळ भटकंती करूनहीसुद्धा त्यांना काही चोरी करण्याची संधी मिळाली नाही.ते दोघेही थकून एका मंदिरात बसले. तेथे त्यांना एक साधू संत मादिरामध्ये झोपलेले दिसले. त्यांनी संताला उठवले व म्हणाले कि काही असेल तर द्या नाही तर मारून टाकले जाऊ.**

**संताने त्यांना विचारला तर त्या चोरांनी सांगितले कि आम्ही चोर आहोत.आम्ही चोरी करतो. हे ऐकून संत म्हनाले, तुम्ही करता ते चांगलेआहे की वाईट याचा कधी विचार केला ? चोर म्हणाले, आम्ही चांगलेच करतो कारण आम्ही चोरी करून जे धन मिळवतो ते आम्ही तीन हिस्यामध्ये वाटतो. एक एक भाग आम्ही घेतो आणि तिसरा भाग ईश्वराला चरणी अर्पण करतो. हे सगळे ऐकल्यावर संत त्यांच्या जवळील एक जिवंत कोंबडा काढला आणि त्यांना दिला व म्हणाले ”आज तुम्ही काहीही चोरी करू शकले नाहीत त्यामुळे तुम्हीला हा कोंबडादेऊ शकतो बाकी माझ्याकडे काही नाही.पण आता चोरापुढे प्रश्न पडला कि आता याचे हिस्से कसे करायचे. ते दोघेही चोर आश्चर्यचकित झाले. संताने त्यांना आशय समजावून म्हाणाले कि चोरी हा जगण्याचा पर्याय नाही. तुम्ही कष्टाची कमाई करून त्यातील एक हिस्सा ईश्वरचरणी ठेवा. ते खरे सार्थक आहे. हे सगळे म्हणणे त्या चोराला पटले आणि ते दोघेही संताला नमस्कार करून चोरी सोडून द्यायचा निर्णय करून तेथून निघून गेले.**

**तात्पर्य :- पापाची कमाई दुःखाचे कारण बनते तर कष्टाची कमाई मानसिक सुख, शांतता आणि आत्म्याला सुख देते.**


## निरुपण

आधुनिक केसरी

गांठोडें सोडून पाहाती ।हातां पडिलें तेंचि खाती ।
कांहीं तोंडीं कांहीं हातीं ।प्राण जाती निघोनी ॥८॥
तांतडी तांतडी जेऊं घाली ।तों तें जेवितां जेवितां कांहीं मेलीं ।
कांहीं होतीं धादावलीं ।तेंहि मेलीं अजीर्णें ॥९॥
ऐसीं बहुतेकें मेलीं ।येक दोनीं मुलें उरलीं ।
तेंहि दैन्यवाणीं जालीं ।आपलें मातेवांचुनी ॥१०॥

## घराघरात स्वर्वेद, मनामनांत स्वर्वेद, जनमनांत स्वर्वेद !

**शीत उष्ण वरसा सहे,
सबको एक समान ।
धर्म तितिक्षा जानते, धीरज परम सयान
।।३९।।(स्वर्वेद प्रथम मण्डल अष्टम अध्याय) ०१/०८/३९
मूळ भाष्याचा मराठी अनुवाद :
विहंगम योगाभ्यासात अनुभवरत असणारे वैराग्यवान योगी जगातील सर्व जीवांना समदृष्टिने पाहातात तसेच शीत, उष्ण आणि वृष्टीला एकसमान सहन करतात. सुख-दुःखात एकसमान आपल्या अवधूत वृत्तीने राहून ते परमप्रभूची भक्ती करतात. या दोह्यात अवधूत वृत्ती असणाऱ्या सहज योग्याच्या स्वरूपाचे निरुपण केले आहे. सद्गुरु देव भगवान, जे या ग्रंथाचे रचयिता आहेत, त्यांनी योगाच्या प्रारंभीक काळात अशाच अवधूत वृत्तीने राहून बरेच दिवस भक्ती, तपश्चर्या केली होती. याच भावाचे वर्णन या पदात केलं गेलंय.**



स्वर्वेद रचनाकार अनन्त श्री सद्गुरू सदाफल देवजी महाराज

**संदर्भ : हा ग्रंथ तुम्हाला हवा असल्यास वॉट्सॲप करा ८५५४८८३१६६.**

## ब्रम्हनिरूपण

आधुनिक केसरी

"मी आत्मा आहे" अशी आत्मपणाने जाणीव आत्मस्वरूपात नसते. सगळ्यात असणे आणि तरीही केवलस्वरूपाने असणे हेच अत्यंत संगरहित असण्याची खूण आहे खरं तर हे शब्दांच्या पलीकडले आहे पण तिची कल्पना येण्यासाठी शब्दांनी वर्णन करावे लागते. अनन्य झाल्याखेरीज स्वरूपानुभव नाही. खरं म्हणजे सद्वस्तूचे स्वरूप शब्दांनी सांगता येण्यासारखे नाही. म्हणून संतवचनावर मनन चिंतन करावे त्यामुळे लवकर आकलन होऊ शकते. संतवचनावर एकनिष्ठा ठेवावी. या दृष्य विश्वातील तत्वाचे विवरण करावे. निर्गुण ब्रण्हाचा शोध घ्यावा.




सौ. उज्ज्वला धर्माधिकारी
संपर्क क्र. 7588235646

## देव अत्यंत दयाळू आहे

आधुनिक केसरी

तुम्ही फार कष्ट करून इथे येता. किती दगदग, किती त्रास तुम्हाला सोसावा लागतो ! बरे, इथे आल्यावर हाल काय कमी होतात ? परंतु इथे कशासाठी आपण येतो, आपल्याला काय हवे आहे, हे आपल्याला कळते का ? आपल्याला देव खरोखरच हवासा वाटतो का ? याचा विचारच आपण फारसा करीत नाही. आपल्यावर काही संकट आले, किंबहुना आपले काही वाईट झाले, की आपण म्हणतो, देवाने असे कसे केले ? असे म्हणणे यासारखे दुसरे पाप नाही. देवावर विश्वास न ठेवणारा माणूस यापेक्षा एकवेळ परवडला, कारण तो ‘ देवाने वाईट केले ’ असे तरी म्हणणार नाही. देव खरोखर अत्यंत मायाळू आहे. त्याला कुणाचेही दुःख सहन होत नाही. कोणत्या आईला आपल्या मुलाला दुःख, कष्ट झालेले आवडेल ? म्हणून, देवाने माझे वाईट केले ही खोटी समजूत प्रथम मनातून काढून टाका. द्रौपदीला जेव्हा वस्त्रहरणासाठी दुःशासनाने भरसभेत खेचले, तेव्हा तिला वाटत होते की पांडवांना हे सहन होणार नाही, ते माझी



विटंबना होऊ देणार नाहीत, ते दुःशासनाची खांडोळी करतील. तिला पांडवांबद्दल विश्वास वाटत होता. दुःशासनाने जेव्हा तिच्या पदराला हात घातला, तेव्हा तिने आशेने धर्माकडे पाहिले. धर्माला वाटले, आता विरोध केला तर आपले सत्याचे व्रत उघडे पडेल, म्हणून त्याने लाजेने मान खाली घातली. हे कसले अहंपणाने लडबडलेले सत्य ! तीच स्थिती इतर पांडवांची झाली. पुढे तिने भीष्माचार्यांकडे पाहिले, परंतु त्यांनीही मान खाली घातली. तेव्हा मात्र तिने जगाची आशा सोडली, आणि कळकळीने परमात्मा श्रीकृष्णाला हाक मारली; आणि त्याने अनेक वस्त्रे पुरवून तिची अब्रू रक्षण केली. पुढे तिला एकदा श्रीकृष्ण भेटला असताना तिने त्याला विचारले की, “ आधीच तू माझ्या बचावासाठी का नाही धावलास ? तो दुष्ट, केस धरून मला खेचून नेत असतानाच का नाही धावलास ? ” तेव्हा श्रीकृष्ण म्हणाला, “ त्यात माझा काय दोष ? मी तुझ्या रक्षणासाठी आतुर होतो, परंतु तुला पांडवांची आणि इतरांची आशा होती, ते रक्षण करतील असे तुला वाटत होते. मला दरवाजा खुला नव्हता, मग मी कसा येऊ ? तू जगताची आशा सोडलीस आणि मला बोलावलेस, त्याबरोबर मी तुझ्या भेटीला धावलो. ” जगाची आशा, आसक्ति, सोडल्याशिवाय परमेश्वराला आपली हाक कशी पोहोचेल ? ज्या गोष्टीवर आपले प्रेम असते त्याच गोष्टीची आपल्याला नड लागते. आपल्याला देवाची नड लागली आहे का ? देवाचे प्रेम लागायला त्याच्या अखंड सहवासात राहण्याची अत्यंत जरूरी आहे; आणि हा सहवास जर कशाने साधत असेल तर तो एक त्याचे नाम घेतल्यानेच साधेल. भगवंताचे नाम घेऊन त्याचे प्रेम मिळवा, हेच माझे सांगणे.

**३२७. सर्व विसरून भगवंताला आळवले की तो कृपा करतो.**

## गहिनीनाथ

आधुनिक केसरी

असा मनात विचार करून तो काही उत्तर न देतां तसाच मुकाटयाने चालत होता. इतक्यात त्यांस एक पाण्याचे ठिकाण लागले तेथे मच्छिंद्रनाथाने गोरक्षास अंमळ थांबावयास सांगितले व आपली झोळी त्याच्याजवळ देऊन तो शौचास गेला. तेव्हा गोरक्षनाथाने गुरूच्या झोळीत पाहिले तो सोन्याची वीट दिसली. तेव्हा हेच भीतीचे मूळ असे जाणून त्याने ती वीट फेंकून देऊन तितक्याच वजनाचा एक दगड तीत भरून ठेविला व आपण चालू लागला. मच्छिंद्रनाथहि मागून चालू लागला. गोरक्ष बराच लांब गेल्यावरही गुरू मागून येतच होता. त्याची वाट पहात तो विसावा घेत बसला. तितक्यात एक विहीर त्याचे नजरेस पडली. तीत त्याने स्नान केले, मीननाथास स्नान घातले व नित्यकर्म उरकून घेत आहे तो मच्छिंद्रनाथ जवळ आला.

रविवार, १४ जानेवारी २०२४
⊙ किमत ५ रुपये | छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र)
⊙ मराठी ⊙ दैनिक
⊙ वर्ष - ०३ ⊙ अंक - १५०
⊙ आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६

# आधुनिक केसरी

विश्वव्यापी मराठी दैनिक

●MARATHI ●DAINIK ●CHHATRAPATI SAMBHAJINAGAR (MAHARASHTRA) SUNDAY 14 JANUARY 2024 | adhunikkesari.com | Adhunik Kesari | ●YEAR-03 ●ISSUE-150 ●RNI : MAHMAR/2021/82566 ●PAGE-16 ●PRICE-05

## महत्त्वाची बातमी

### देशातील सरकार शेतकरी विरोधी : शरद पवार

आधुनिक केसरी न्यूज

**पुणे :** देशाच्या शेती अर्थव्यवस्थेच्या संबंधित सध्याच्या सरकारचे धोरण शेतकरी विरोधी आहे. कांदा उत्पादक शेतकऱ्यांना वाटत होतं की आपला प्रश्न सोडवतील मात्र त्याकडे कुठलेही लक्ष देण्यात आले नाही. देशातील शेतकरी सध्या संकटात आहे. तरीदेखील सरकारकडून कुठलेही ठोस निर्णय घेण्यात येत नाही आहे असे राष्ट्रवादी काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष शरद पवार यांनी पत्रकार परिषदेत केंद्र सरकारवर हल्लाबोल केला आहे. शरद पवार म्हणाले की, आज इंडिया आघाडीची ऑनलाईन बैठक पार पडली आहे. या बैठकीमध्ये इंडिया आघाडीचे नेतृत्व मल्लिकार्जुन खरगे यांनी स्विकारावं अशी सूचना काही सहकार्यांनी केली त्याला अनेकांनी संमती देखील दिली. त्याचप्रमाणे संयोजक म्हणून नितीश कुमारांनी जबाबदारी घ्यावी, अशी सूचना करण्यात आली होती. परंतु संयोजक पदाची गरज नसल्याचे मत नितीश कुमारांनी मांडले. त्यामुळे संयोजक पदाची नियुक्ती करण्यात आली नाही. एकविचाराने निवडणुकीला सामोरे जाण्याचा विचार असल्याचे शरद पवार म्हणाले. आज झालेल्या बैठकीमध्ये एकत्रित सभा घेण्यासाठी एक कमिटी स्थापन व्हावी अशा सूचना देखील अनेकांनी मांडल्या. आज देशाला पर्याय देण्यासाठी विविध राजकीय पक्ष सत्ताधा-यांच्या विरोध एकत्र येत आहेत. हिच इंडिया आघाडी जमेची बाजू आहे.

# गद्दारांच्या घराणेशाहीचे तिकीट मोदीच कापतील

## उद्धव ठाकरे : मुख्यमंत्री शिंदेंच्या बालेकिल्ल्यात झंझावाती दौरा

आधुनिक केसरी न्यूज

**कल्याण : पंतप्रधान नरेंद्र मोदी शुक्रवारी महाराष्ट्रादत येऊन गेले. उद्या संक्रात आहे. तिळगुळ घ्या गोड गोड बोला. एक साधा शिवसैनिक काय करू शकतो हे आपण करून दाखवले. गद्दारांच्या घराणेशाहीचे तिकीट मोदीच कापतील, असा टोला यावेळी ठाकरेंनी लगावला. ह्या माझ्या नुसत्या भेटी आहेत. शाखा जुन्याच आहेत, पण नवे प्राणप्रतिष्ठा आपण करत आहोत. गद्दारांना कचराच्या पेटीत आपण टाकणार आहोत, असे उद्धव ठाकरे म्हणाले. ते शनिवारी कल्याणच्या दौऱ्यावर होते.**



मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या बालेकिल्ल्यामध्ये उद्धव ठाकरेंचा झंझावती दौरा झाला. त्यामुळे ठाकरेंच्या दौऱ्याकडे सर्वांच्या नजरा लागल्या होत्या. डोंबिवली येथे येथे उद्धव ठाकरे यांचे जोरदार स्वागत करण्यात आले. त्यावेळी त्यांनी कार्यकर्त्यांना संबोधित करताना एकनाथ शिंदेंवर हल्लाबोल केला. गद्दारांना गाडा, येत्या निवडणुकीत कचऱ्याच्या डब्ब्यात टाका, असेही ठाकरे म्हणाले. शिवसैनिकांना डिवचू नका हे भाजपला सांगतो. शिवसैनिक म्हणजे मधमशाचे पोळ आहे. आतापर्यंत तुम्ही मध घेतले आता या पोळाला दगड मारू नका.

कोणी कुठे गेले? कोणी बिळात गेले? पण जे आज उद्धव ठाकरेंच्या स्वागतला आले ते खरे शिवसैनिक आहेत. हा कल्याण मतदारसंघ कोणाची जहागीर नाही, येथे फक्त आपला भगवा शुद्ध झेंडा फडकणार आहे. न्याय सुद्धा आज विकत घेतला जातोय. जेंव्हा बाळासाहेब ठाकरे होते तेव्हा हे गोधडीत सुद्धा नव्हते आणि हे म्हणातात आम्ही बाळासाहेबांची शिवसेना आहे. बाळासाहेब ठाकरे यांना अभिप्रेत असलेली आपली शिवसेना आहे, असे संजय राऊत यांनी सांगितले.

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे चिरंजीव खासदार श्रीकांत शिंदे यांच्या कल्याण लोकसभा मतदारसंघामध्ये आज शिवसेना ठाकरे गटाचे पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांचा दौरा आहे. अंबरनाथ, उल्हासनगर, कल्याण, डोंबिवली, कल्याण ग्रामीण, कळवा मुंब्रा या ठिकाणी उद्धव ठाकरे पदाधिकारी कार्यकर्ते यांच्या भेटी घेणार आहेत. दुपारी 12 ते सायंकाळी 7 वाजेपर्यंत हा दौरा असेल. उद्धव ठाकरे यांचा कल्याण लोकसभा मतदारसंघातला दौरा. दौऱ्याची सुरुवात अंबरनाथपासून होईल. कल्याण डोंबिवली आणि मुंब्रा इथल्या शाखांना भेट देऊन शेवट कळवा येथील शाखेजवळ करण्यात येईल.

# अजिंठा घाटात मालट्रक पलटी; वाहतूक विस्कळीत

आधुनिक केसरी न्यूज

**फर्दापूर :** जगप्रसिद्ध अजिंठा घाटात अपघातात आणि वाहतूक विस्कळीत होण्याचे सत्र सुरूच आहे. शुक्रवारी सकाळीच लोखंडी सळई घेऊन घाट उतरणारा मालट्रक एका वळणावर ब्रेक निकामी झाल्याने पलटी झाला. यात चालकाचे दोन्ही पाय फॅक्चर झाले, तीन तास वाहतूक पूर्णतः विस्कळीत झाली. परिणामी छत्रपती संभाजीनगर- जळगाव महामार्गावर दोन्ही बाजूने वाहनांच्या लांबलचक रांगा लागल्या.जालना येथून लोखंडी सळ्या घेऊन मालट्रक एमपी ०९ एचजी २१७०छत्रपती संभाजीनगर- जळगाव महामार्गावरून मध्यप्रदेशातील खंडव्याकडे चालला होता. शुक्रवारी सकाळी अजिंठा घाट उतरत असताना ब्रेक निकामी झाल्याने घाटातील एका वळणावर हा ट्रक पलटी झाला. या अपघातात चालक रफिक खान यांचे पाय फॅक्चर झाले तर वाहक यासीन खान सुरक्षित आहे. यानंतर घाटात सकाळी तीन तास वाहतुकीचा खोळंबा झाला. वाहनांच्या दूरवर रांगा लागल्या, प्रवाशांना, वाहनचालकांना प्रचंड मनःस्ताप सहन करावा लागला.

अनेकांची कामे खोळंबली. विशेष म्हणजे रविवारी पुणे-यावल बसचे ब्रेक निकामी झाल्याने घाटात अपघात घडला होता, सुदैवाने ५५ प्रवाशांचे प्राण वाचले होते. घाटात छोट्यामोठ्या अपघातांचे सत्र सुरूच आहे.

अपघात घडताच तासनतास वाहतुक ठप्प होते. शुक्रवारी सकाळी तीन तास व सायंकाळी पुन्हा तीन तास वाहतुकीची कोंडी झाली.

जगप्रसिद्ध अजिठा लेण्यांना जोडणाऱ्या छत्रपती संभाजीनगर-जळगाव महामार्गाचे नुकतेच सिमेंटकॉंक्रिटीकरण करण्यात आले. हे काम ठेकेदाराने ओबडधोबड करून संपवले. शिवाय आता घाट व महामार्ग पूर्वीपेक्षा अरुंद बनल्याने वाहने क्षतीग्रस्त होण्याचे आणि वाहतूक विस्कळीत होण्याचे मोठे प्रमाण वाढले आहे.



# शंकराचार्यांचे योगदान विचारणाऱ्या राणेंचे योगदान काय : अतुल लोंढे

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** अयोध्येतील राम मंदिराचे बांधकाम अजून पूर्ण झालेले नसतानाही भारतीय जनता पक्ष व राष्ट्रीय स्वयंसेवक संघाला प्राणप्रतिष्ठा करण्याची घाई झाली आहे. हिंदू धर्मातील सर्वोच्च असलेल्या शंकराचार्यांनीही अर्धवट मंदिरात प्राणप्रतिष्ठा करणे चुकीचे आहे असे स्पष्ट केले आहे. परंतु भाजपाचे लोक शंकराचार्यांवरच तोंडसुख घेऊ लागले आहेत. केंद्रीय मंत्री नारायण राणे यांनी त्यात एक पाऊल पुढे टाकत शंकराचार्यांचे योगदान काय? असा प्रश्न विचारून शंकराचार्य व हिंदू धर्माचा अपमान केला आहे. शंकराचार्यांचे योगदान विचारणाऱ्या श्रीमान नारायण राणे यांचे तरी काय योगदान? असा प्रतिप्रश्न करत राणेंचे वय पाहता त्यांनी आता वानप्रस्थाश्रमाचा मार्ग धरावा, असे महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसचे मुख्य प्रवक्ते अतुल लोंढे यांनी म्हटले आहे. केंद्रीय मंत्री नारायण राणे व भाजपाचा समाचार घेताना अतुल लोंढे पुढे म्हणाले की, नारायण राणे हे राजकीय स्वार्थासाठी शिवसेनेतून काँग्रेसमध्ये व काँग्रेसमधून भाजपात गेले आहेत.

# पालक, शिक्षक, साहित्यिकांनी विद्यार्थ्यांना वाचनाकडे वळवावे

## डॉ. सुरेश सावंत यांचे प्रतिपादन : पहिल्या मराठवाडा बालसाहित्य संमेलनाचे उद्घाटन

आधुनिक केसरी न्यूज

पैठण : पहिल्या मराठवाडा बालसाहित्य संमेलनाचे उद्घाटन समाजसेवक दीपक नागरगोजे यांच्या हस्ते शुक्रवारी झाले. पालक, शिक्षक, साहित्यिक यांनी विदार्थ्यांना वाचना कडे वळवावे सध्याच्या दुषित सामाजिक परिस्थितीमध्ये वाचन चळवळीला बळ देऊन, सर्वांनी यात सहभागी होणे गरजेचेअसे मत संमेलन अध्यक्ष डॉ.सुरेश सांवत यांनी यावेळी मांडले. या संमेलनात पुस्तकांची स्टॉल वर बाल वाचकांची गर्दी केली व मोठ्या प्रमाणावर पुस्तक खरेदी केली. चित्र प्रदर्शनात २२ शाळांनी सहभाग नोदवलि तसेच राष्ट्रमाता जिजाऊ, विवेकांद यांच्या जीवन चरित्रावर आधारित चित्रे प्रदर्शनात शालेय विदार्थ्यांचे कवी संमेलन हा स्थानिकांच्या अभिव्यक्तीचा कार्यक्रम प्रथमच संमेलनात पैठण तालुक्यातील ४५ बाल कविनी कविता वाचन केल्या. संमेलनाचे अध्यक्ष




डॉ.सुरेश सावंत, मराठवाडा साहित्य परिषदेचे कौतिकराव ठाले, डॉ. दादा गोरे, किरण सगर, पुंडलिक अतकरे, साहित्यिक बाबा भांड, मसापचे सचिव संतोष गव्हाणे, स्वागताध्यक्ष संतोष तांबे, डॉ . उर्मिला चाकूरक , मसापचे अध्यक्ष अनिल देशमुख, शिक्षणाधिकारी श्रीराम केदार, प्रकाश लोखंडे, माजी नगराध्यक्ष सूरज लोळगे, सोमनाथ परदेशी, किशोर तावरे, चेअरमन राजेंद्र वाघमोडे, प्रा. संदीप काळे , प्राचार्य रामावत, भास्कर बडे, बालसाहित्यिक आयुब पठाण आदींची उपस्थिती होती.

# सांस्कृतिक भौतिकवाद



प्रा. डॉ. पुरुषोत्तम जुन्ने
संपर्क क्र. ७५८८४२४२५४

आधुनिक केसरी

**जगाचा इतिहास आणि वर्तमान समजून घेण्याचे एक निश्चित शास्त्र आहे. पौर्वात्य प्राच्यविद्या पंडितांनी सहा शास्त्रांच्या अनुषंगाने त्याचा अर्थ लावण्याचा प्रयत्न केला तर पाश्चात्य मीमांसकांनी वेगळा मार्ग चोखाळला. कोण बरोबर किंवा चूक या वादात न पडता प्राप्त परिस्थितीला अनुलक्षून जो भाग महत्त्वाचा आहे, त्याचा आपण विचार केला पाहिजे. समाजाचे परिपोषण अनेक पातळ्यांवर होत असताना सर्वांना सामावून घेणारा एक निश्चित धागा असतो, तो म्हणजे सांस्कृतिकतेचा. ही संस्कृती ज्या मूल्यांचा उद्‌घोष करते किंवा अधिक्षेप करते त्यानुसार समाजधारणा बनत जाते.**



## क्षितिजापल्याड

संस्कृतीमध्ये कोणत्या बाबींचा समावेश होतो हे पाहताना आपणास सामाजिक संरचना, स्तरीकरण, संस्थात्मक कार्यप्रणाली, राजकीय विचारधारा, उत्पादन आणि भांडवलाचा विनियोग, स्त्रियांचा सामाजिक दर्जा, मनोरंजन विषयक कल्पना आणि साधने, सामाजिक आणि व्यक्तिगत अभिव्यक्ती, नैसर्गिक संसाधने आणि त्यावरील मालकी, प्रचलित दैवतकथा, विधी आणि पुजापद्धती, समाजातील नोकरीच्या संधी, बेरोजगाराचे प्रमाण, शासनाची भूमिका आणि अंमलबजावणी या आणि इतर सर्व बाबी संस्कृतीच्या जडणघडणीत महत्त्वाची भूमिका बजावत
असतात. शेवटी संस्कृती म्हणजे दुसरे असते तरी काय? या सर्वांमधून सांस्कृतिक मूल्ये निर्माण होत असतात.
जागतिक इतिहासात कोणकोणते महत्त्वाचे टप्पे होऊन गेले हे अभ्यासण्यासाठी आपणास ऐतिहासिक भौतिकवाद कामी येतो तर या जगाचा विकास कसा झाला हे द्वंद्वात्मक भौतिकवादाने ताडून पाहता येते आणि अलीकडच्या काळातील या सर्व ज्या उलथापालथी चालू आहेत त्याची मीमांसा आपणास सांस्कृतिक भौतिकवादी दृष्टीने अभ्यासता येईल. रेमंड विल्यम्सने सर्वप्रथम ही संकल्पना वापरात आणली आणि तिचा विकास मात्र ओंतिनिओ ग्रामशी यांनी केला. त्यांनी मार्क्सवादी आकलनामध्ये सांस्कृतिक भौतिकवादाच्या अनुषंगाने मोठी भर घातली. त्यांच्या प्रिजन नोटबुकमधील तीन हजार पृष्ठांपैकी बहुतांश पृष्ठे सांस्कृतिक मुद्यांची चर्चा करणारी आहेत.
भांडवलशाही ज्या विविध आयुधाचा वापर करते त्यापैकी सांस्कृतिक साम्राज्यवाद हा एक महत्त्वाचा घटक म्हणता येईल. मानवाची नैतिक आणि सामाजिक मूल्ये भौतिक मापदंडावरून फार कमी पण सांस्कृतिक नियमाने अचूक हेरता येतात. उत्पादन साधनात जसजसा बदल होत गेला तसे एकूण मानवी संस्कृतीचे मूल्यभानसुद्धा बदलले हे ऐतिहासिक भौतिकवादानुसार आपणास ताडून पाहता येईल. वर्तमानकालीन उत्पादकीय वातावरण, नवीन कामगार कायदे, बेरोजगारी आणि त्याचे बहुविध प्रकार, समाजाचा भांडवली व्यवस्थेने निर्माण केलेला स्त्री विषयक दृष्टिकोन, शैक्षणिक पर्यावरण, सामाजिक स्वार्थ आणि राज्यकर्त्यांची भूमिका या सर्वांच्या अभिसरणातून निर्माण होणारे वातावरण एक व्यक्ती म्हणून आपल्यावर निश्चितच प्रभाव पडणारे असते. सांस्कृतिक घटकात या सर्वांचा मोठ्या कौशल्याने वेध घेतला तर आणि तरच आपल्या हाती काही लागू शकते. अन्यथा दृष्टिकोनाशिवाय सांस्कृतिक भान आपणास येऊ शकणार नाही. दीन दलितांवरील कोणतीही कविता ही परिवर्तनवादी होऊ शकत नाही. कारण प्राप्त परिस्थितीचा कार्यकारणभाव नीटपणे साहित्यिकास आकलन झाला पाहिजे. विवक्षित गोष्ट कशी समजून घ्यायची याचे शास्त्र समाज वैज्ञानिकांनी तयार केले आहे. त्यातलाच एक भाग म्हणून आपणास सांस्कृतिक भौतिकवादाकडे पाहता येईल. औद्योगिक क्रांतीनंतर म्हणजेच अठराव्या शतकापासून वित्तीय भांडवल मोठ्या प्रमाणात जमा होऊ लागले. (आर्थिक विचारांमध्ये भांडवलाचे विविध प्रकार केले जातात.) त्यामुळे भरमसाठ मालाचे उत्पादन झाले. सुरुवातीच्या काळात ग्राहकांसाठी उत्पादन हे सूत्र बराच काळ चालले, परंतु जगात अनेक कारणांमुळे वसाहतींना स्वातंत्र्य मिळाले व देश स्वतंत्र झाले. स्वातंत्र्याची नैसर्गिक उर्मी हे एवढेच कारण स्वातंत्र्य देण्यामागे नव्हते.



मालाचे उत्पादन आहे, परंतु बाजारात मागणी नाही त्यावेळेस तथाकथीत विकसित राष्ट्रांनी एकत्र येऊन १९४८ पासून गॅटच्या अंमलबजावणीस प्रारंभ केला. दुसऱ्या महायुद्धानंतर भांडवलशाही संपुष्टात येऊन साम्राज्यवादाची मुहूर्तमेढ रोवली गेली. पुढे डब्ल्यूटीओच्या स्थापनेनंतर साम्राज्यशाहीच्या विकासाचा एक टप्पा पार पडला. साम्राज्यशाहीची जी मुख्य वैशिष्ट्ये आहेत त्यातील दोन-चार वैशिष्ट्यांचा उल्लेख करणे टाळता येणार नाही.
कोणत्याही राष्ट्राला प्रत्यक्ष पारतंत्र्यात न ढकलता स्वातंत्र्य अबाधित ठेवून बाजारपेठेवर नियंत्रण मिळविणे, ग्राहकांसाठीउत्पादन या सूत्राचा त्याग करून उत्पादनासाठी ग्राहक निर्माण करणे, जाहिरातींचा भडीमार हे त्याचेच मूर्तिमंत उदाहरण आहे. प्रत्येक घर मिनी मॉल बनला पाहिजे अशी व्यवस्था निर्माण करणे, सतत युद्धसदृश्य परिस्थिती निर्माण करून संरक्षण साहित्यावरील खर्च अतोनात वाढविणे, कच्चामाल घेऊन जाण्यापेक्षा स्थानिक पातळीवरच स्थानिक स्वस्त मजुरांकडून जागतिक कंपन्यांच्या द्वारा मालाचे उत्पादन करणे, सेझचे उदाहरण यासाठी अभ्यासता येईल. स्थानिक राष्ट्राच्या सरकारवर सर्व प्रकारची बंधने लादून आपणास हवे तसे करारमदार करून घेणे आणि हे राष्ट्राच्या किती फायद्याचे आहे हे सरकारने विविध प्रकारे देशवासियांच्या गळी उतरवणे हा सर्व प्रकार आपणास यादृष्टीने अभ्यासता येईल.
अध्यात्म आणि भक्तीसंप्रदायाची बाजू लावून धरण्यासाठी कोणत्याही प्रतिनिधींची निवड झालेली नसते; परंतु लोकानुनय साधण्यासाठी जनप्रतिनिधी मात्र सर्रासपणे सांस्कृतिक क्षेत्रात ढवळाढवळ करत असतात. नवीन दैवतकथांची निर्मिती, जुन्याचे पुनरुज्जीवन आणि गतकालीन मांगल्याचा पुनर्शोध या प्रक्रियेतून सांस्कृतिक क्षेत्र हे एक आयुध बनविले जाते. कोणाचाही दुस्वास न करणारी, सर्वांप्रति समत्व साधणारी आणि स्वप्नस्थ वास्तवाच्या पूर्ततेसाठी साह्यभूत ठरणारी सांस्कृतिक मूल्येच मानवी जीवन उत्कर्षाप्रत घेऊन जाणारी ठरतील यात शंका नाही.

**(लेखक गोदावरी कला महाविद्यालय, अंबड जि. जालना येथे मराठीचे प्राध्यापक आहेत)**

# एक ध्येयवेडा प्रवासी : डॉ.सुरेश खुरसाळे



कॉ. के.के. जांबकर
मो. 9422870578

आधुनिक केसरी

**मराठीत माझ्या वाचण्यात आले ते असे "महात्वाचे असणे चांगले पण चांगले असणे अधिक महत्वाचे" मराठी शब्दांचे हेरफेर फार मोठे आहेत. जीवनप्रवासाच्या वाटेवर चालत असताना आपणांस अनेक बऱ्या वाईट प्रसंगाचा सामना करावा लागतो. कधी सुख तर कधी दु:ख, कधी चांगले तर कधी वाईट, कधी उष्णता तर कधी थंडावा. चांगल्या वाईटाचा विचार करून नेमके काय साध्य करायचे याचे ज्ञान, भान व जाणिव असणे महत्वाचे वाटते. तरच जीवनप्रवासाला एक निश्चित अशी दिशा मिळते अन्यथा सर्वकाही स्वत:जवळ असुनही विचार व कृतीची धमक नसल्यामूळे जीवनप्रवास दिशाहीन होतो. हा माझा वैयक्तिक अनुभव आहे. म्हणुनच वरिल वाक्याप्रमाणे "चांगले असणे हे अधिक महत्वाचे असे" या विषयावर माझा जास्त भर असतो.**

हे सर्व करत असतांना आपल्या कार्याप्रती नितांत निष्ठा, मेहनत व निस्वार्थ प्रमाणिकपण असणेही खूप महत्त्वाचे असते. आपल्या कार्याप्रती निष्ठा, मेहनत व प्रामाणिकपणा असेल तर कार्य सिद्धीचा आनंद कांही औरच असतो. अशीच कांही माणसे समाजात असून ते आपल्या कार्याप्रती कायम तत्पर राहून समाजात स्वतःची आगळीवेगळी ओळख निर्माण करून एक प्रेरणादायी व्यक्तिमत्त्व म्हणून समाजमनात आपले स्थान निर्माण करतात. म्हणून अशाच एका प्रेरणादायी मार्गदर्शकाच्या जीवनप्रवासाला आपण समाजासमोर ठेवणार आहोत. जेणेकरून समाजात त्याग, समर्पण, स्वाभिमान, निष्ठा, मेहनत, प्रामाणिकपणा अशा अनेक विशेषणांचा ठेवा समाजात व माणसामाणसांच्या मनात कायम टिकून राहून येणाऱ्या भावी पिढीसाठी आदर्श म्हणून वृद्धिंगत व्हावा हाच मानस.
मुळ विषयावर प्रकाश टाकण्यासाठी मला येथे आवर्जुन आठवण येते ती आपल्या नांदेडमधीलच नव्हे तर संपुर्ण मराठावाडाभर एक स्वाभिमानी शिस्तप्रीय, प्रामाणिक व्यक्तिमत्त्व म्हणून ज्यांची ओळख समोर ठेवणार आहोत ते आपणा सर्वांचे मराठवाडा भुषण व आदरणीय व्यक्तिमत्त्व म्हणजेच डॉ. सुरेश खुरसाळे. मराठवाड्यातील संताच्या पावन भुमीत जन्माला आलेले, त्याग, स्वाभिमान, प्रामाणिक सेवा, कठोर परिश्रमाने नावलौकीकास कायम स्मरणात राहणारे, स्वातंत्र्यपूर्व काळापासून शिक्षण सेवेची महती जनमानसात रुजवीणारे, देशाभिमान जागृत ठेवणारे असे अलौकिक



व्यक्तिमत्त्व प.पु.स्वामी रामानंद तीर्थांच्या कुशीत वाढलेले असे बहुआयामी, मितभाषी, प्रसिद्धीपासून कोसो दूर असणारे पण शिक्षण व आरोग्य सेवेच्या माध्यमातून जनसेवेची सेवा करणारे आपणास सर्वांचे सर्व परिचीत असे आदरणीय व आदर्श असे व्यक्तिमत्त्व म्हणजे डॉ. सुरेश खुरसाळे सर. स्वातंत्र्यपुर्वकाळात मराठवाडा निजामाच्या तावडीत असल्यामूळे सर्वसामान्य, गोरगरीब समाज शिक्षणापासून वंचित होता. म्हणूनच की काय स्वामीजींचा आदर्श डोळ्यासमोर ठेऊन व प्रत्यक्ष अंगीकारून अंबाजोगाई व नांदेड सारख्या ठिकाणी रयत रुग्ण व शिक्षण संस्था सुरु केली. रयतेसाठी रात्रंदिवस झटणाऱ्या या मानवाने शिक्षणासह जनसामान्यांच्या आरोग्यासाठी रयत सेवेच्या रुपाने नांदेडमध्ये रयत रुग्णालय स्थापन केले. आज सर्वच स्तरावरील जनतेला या दोन्ही सेवेचा मोठा आधार आहे.
हजारो रुग्णांची अल्पदात रुग्णसेवा व शिक्षणाच्या माध्यमातून सुरेशरावांनी सर्वसामान्यांना आधार देवून उभे केले. हे करत असतांना कुठेही आपल्या कार्याचा कधी गवगवा केला नाही की, प्रसिद्धीसाठी आग्रह धरला नाही. जी आहे ती सेवा सुरेशरावांच्या रुपाने जनतेच्या, गोरगरीबांच्या हृदयात आपसुकच आदर्श स्थान टिकवून आहे. नांदेड स्थित रयत रुग्णालयात अतिशय अल्पदरात गोरगरीब व सर्वसामान्यांना परवडणारी रुग्णसेवा उदाः रक्ततपासणी, सीटीस्कॅन, कमीतकमी दरात औषधी पुरवठ्यासह तज्ञ डॉक्टरांना सोबत ठेवून परवडणाऱ्या शस्त्रक्रिया करून असंख्य रुग्णांना व्याधीमुक्त करणारे व जीवनदान देणारे सुरेशराव खरोखरीच देवदूत म्हणूनच पाच सहा दशकांपासून कार्यरत आहेत.
रुग्णसेवेसह गोरगरीब, वंचित, सर्वसामान्य जनता शिक्षणाच्या प्रवाहापासून वंचीत राहू नयेत म्हणून अंबाजोगाई येथे योगेश्वरी शिक्षण संस्थेच्या माध्यमातून शिक्षणाची ज्ञानगंगा कायम वाहती ठेवणारे सुरेशरावांनी अनेकांना घडविले व आजही अनेकजण घडत आहेत. शाहु, फुले, आंबेडकरांच्या व स्वामी रामानंद तीर्थांच्या निःस्वार्थ व प्रेरणादायी विचारातून नावारुपास असलेली योगेश्वरी शिक्षण संस्था आजही निष्कलंक व स्वाभिमानाने मराठवाडाभर ताठमानेने उभी आहे. सर्वसामान्य माणूस शिक्षणापासून वंचीत राहू नये, सुशिक्षित व सुसंस्कृत समाज निर्माण होऊन देशाभिमान व समाजाभिमान कायम वृद्धिंगत व्हावा हिच त्यामागची तिव्र इच्छा. असे हे अष्टपैलू व्यक्तिमत्त्व असणार आपले सर्वांचे लाडके प्रेरणास्थान आजही वयाची ऐंशी पार करून देखील तरुणाईला लाजवील असे सतत कार्यमग्न असतात. म्हणून त्यांच्या या स्वाभिमानी व प्रामाणिक कार्यकृतीशीलतेला माझा कृतज्ञतापुर्वक लाल सलाम.
प्रसिद्धीमाध्यमांच्या कोसो दूर असणारे मीतभाषी, बहुआयामी व्यक्तिमत्त्व खरोखरी आपणा सर्वांना लाभणे हे आपले सर्वांचे अहोभाग्यच म्हणावे लागेल. अशा या निःस्वार्थ कृतीशीलतेला उदंड दिर्घायुरारोग्य लाभो हीच मनोमन सदिच्छा म्हणूनच म्हणावेसे वाटते अशा या ध्येयवेड्या प्रवाशाचा प्रवास आपणा सर्वांसाठी व भविष्यातील पिढीसाठी नक्कीच प्रेरणादायी असेल.
रयतच्या रुग्ण व शिक्षण सेवेतील सर्व सहभागींना माझ्या नववर्षाच्या कृतज्ञतापुर्वक खूप खूप शुभेच्छा....

**"माना की इस महेफील को हम गुलजार ना बना सके
मगर कुछ फुल तो खिलाये इस गुलशन मे हमने "
जय हिंद, इन्क्लाब जिंदाबाद, लाल सलाम**

हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं ए -३२, औरंगाबाद इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, छत्रपती संभाजीनगर ४३१ ००५ (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. २०५, १३ वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - २, सिडको, जि. छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. (* पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद छत्रपती संभाजीनगर न्यायालयाच्या कक्षेत) आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +९१ ९०७५७ १६७३९

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Chhatrapati Sambhajinagar Industrial Co-op, Society, Station Road, Chhatrapati Sambhajinagar 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Aurangabad (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * (* According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Chhatrapati Sambhajinagar court.)
RNI : MAHMAR/2021/82566, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739




# मुनगंटीवार यांच्या प्रयत्नामुळेच नदी पुनरुज्जीवन कामाला गती

## जलतज्ज्ञ डॉ. राजेंद्र सिंह

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त महाराष्ट्राचे वने आणि सांस्कृतिक कार्य मंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी महाराष्ट्र राज्यातील 75 नद्यांचे पुनरुज्जीवन करण्याचा संकल्प केला. याअंतर्गत त्यांनी 'चला जाणूया नदीला' हा उपक्रम राबवून गावागावात नद्यांचे संरक्षण, संवर्धन करण्याची मोहीम हाती घेतली. विशेष म्हणजे याबाबत श्री. मुनगंटीवार यांनी आमच्यासोबत चर्चा केल्यानंतर केवळ 20 दिवसात जलसाक्षरता अभियान राबविले व नद्यांच्या संवर्धनासाठी चार महिन्यात चार शासन निर्णय काढून या कामाला गती दिली, असे गौरवोद्गार प्रसिध्द जलतज्ज्ञ तथा रमन मॅगसेसे पुरस्कार विजेते डॉ. राजेंद्र सिंह यांनी काढले.

वन अकादमी येथे वनमंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार तसेच प्रसिध्द जलतज्ज्ञ डॉ. राजेंद्र सिंह यांच्या उपस्थितीत 'चला जाणूया नदी' उपक्रमांतर्गत जिल्ह्यातील उमा व इरई नदी संवर्धनाबाबत आढावा घेण्यात आला. त्यावेळी डॉ. राजेंद्र सिंह बोलत होते. बैठकीला प्रभारी जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन, वन अकादमीचे संचालक एम.एस. रेड्डी, उपवनसंरक्षक श्वेता बोड्डू, मनपा आयुक्त विपीन पालीवाल, उपजिल्हाधिकारी अजय चरडे, प्रा. सुरेश चोपणे, प्रा. योगेश दुधपचारे, डॉ. प्रवीण महाजन, नरेंद्र चूग, रमाकांत कुलकर्णी, राहुल गुळघाणे, अजय काकडे आदी उपस्थित होते.

राज्यातील नद्यांच्या संवर्धनासाठी वनमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी प्रत्येक जिल्ह्यातून समोर आलेले जलदूत, जलनायक, जलसेवक, जलप्रेमी आदींची फळी तयार केली, असे सांगून डॉ. राजेंद्र सिंह म्हणाले, देशाला स्वातंत्र मिळाले तेव्हा आपल्या देशातील नद्या अमृतवाहिनी होत्या. त्या शुध्द, अविरल आणि निर्मळ वाहत होत्या. म्हणजेच आपल्या नद्यांमधून अमृत वाहत होते. मात्र आता आपल्या नद्यांची अतिशय दैननीय अवस्था झाली आहे. त्यामुळेच स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त या नद्या पूर्ववत अमृतवाहिनी होण्यासाठी श्री. मुनगंटीवार यांनी नद्यांच्या संवर्धनासाठी मोहीम हाती घेतली आहे.

पुढे डॉ. राजेंद्र सिंह म्हणाले, पुरातन काळात नद्यांच्या आजुबाजुला आपली संस्कृती विकसीत झाली आहे. तसेच आपल्या देशातील 99 टक्के नद्यांचा उगम हा वन जमिनीतून होतो. आज श्री. मुनगंटीवार यांच्याकडे सांस्कृतिक कार्य आणि वनविभाग हे दोन्ही महत्वाचे विभाग आहेत. त्यामुळे वन विभागाने पुढाकार घेऊन नद्यांची सद्यपरिस्थती जाणून घेण्यासाठी अभ्यास दौरा करून नदीला शुध्द, अविरल आणि निर्मळ करावे. त्यामुळे पूर नियंत्रण आणि दुष्काळमुक्त करण्यास मदत होईल, असे त्यांनी सांगितले.

**ईश्वरीय काम होत असल्याचा आनंद : सुधीर मुनगंटीवार**

प्रख्यात जलतज्ज्ञ डॉ. राजेंद्र सिंह आणि त्यांच्या टीमकडून नदी संवर्धनाचे मोठे कार्य होत आहे. हे एक ईश्वरीय कार्य असून या पवित्र कार्यात आपणही सहभागी आहोत, याचा मनापासून आनंद आहे, असे वनमंत्री तथा पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी सांगितले. पुढे ते म्हणाले, 'मिशन अमृत' प्रत्येक जिल्ह्यातील एक नदी मॉडेल म्हणून विकसीत करण्यात येईल. यात नदीची संपूर्ण माहिती, उगम आणि संगम स्थळावरील माहिती क्यूआर कोडच्या माध्यमातून सर्वांना उपलब्ध होईल, असे नियोजन करावे. तसेच नागपूरच्या नीरी या संस्थेमार्फत अत्याधुनिक तंत्रज्ञान विकसीत करावे. नदी संवर्धनासाठी शासन आपल्या पाठीशी आहे . नदी संवर्धनासाठी वेगवेगळ्या पध्दतीने कार्य करणारे प्रसिध्द अभिनेते नाना पाटेकर, आमीर खान, जगतगुरू जग्गी वासुदेवन व इतर मान्यवरांनी एकत्र येऊन काम करणे गरजेचे आहे. त्यासाठी एक पोर्टल तयार करून नद्यांबाबतची संपूर्ण माहिती यात असावी. नद्यांचे संवर्धन, संरक्षण व नियोजनाबाबत लवकरच मुख्य सचिवांच्या उपस्थितीत मुख्यमंत्र्यांकडे बैठक घेण्यात येईल. पर्यावरण, नदी संवर्धन यासाठी राज्य आणि केंद्राच्या कायद्यांचा अभ्यास करून यासाठी समितीचे गठण करण्यात येईल, असेही श्री. मुनगंटीवार म्हणाले. यावेळी जिल्ह्यातील उमा आणि इरई नदीचा विकासाचा आराखडा सादर करण्यात आला. कार्यक्रमाचे संचालन विक्रांत जोशी यांनी केले. यावेळी विविध विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

# यशवंत सेनेच्या तालुका उपाध्यक्षपदी हारकर तर उपाध्यपदी लिके यांची निवड

आधुनिक केसरी न्यूज

**धाराशिव :** यशवंत सेनेच्या कळंब तालुका अध्यक्ष पदी संभाजी हारकर तर उपाध्यक्षपदी ज्ञानेश्वर लिके यांची निवड करण्यात आली आहे. कळंब येथे यशवंत सेनेचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा माजी राज्यमंत्री बाळासाहेब दोलतडे व आनंद खोत यांच्या अध्यक्षतेखाली बैठक घेवुन तालुका कार्यकारिणीची निवड करण्यात आली. या कार्यकारिणी मध्ये विधी व न्याय विभागाच्या जिल्हा अध्यक्ष पदी अँन्ड विश्वजीत दुगाने, कळंब तालुका अध्यक्ष संभाजी हारकर उप ता अध्यक्ष पदी ज्ञानेश्वर लिके,सचिव पदी झेलम शिंपले,शहर अध्यक्ष पदी अनिल शिंपले, तालुका संघटक अक्षय भंडारे, तालुका युवक अध्यक्ष अक्षय शेंडगे,उप शहर अध्यक्षपदी आकार पारेकर, कार्य अध्यक्ष बाळासाहेब सौदागर, आदींच्या निवडी करण्यात आल्या.

यावेळी राष्ट्रीय अध्यक्ष दोलतडे यांनी कार्यकारिणीत नुतन पदाधिका-यांना समाजाचे काम करण्याची संधी दिली आहे. त्यामुळे समाजातील तळागाळातील व्यक्ती पर्यंतच्या आडी-अडचणी समजून घेवून त्याची सोडवणुक करावी असे आवाहन केले. यावेळी नुतन कार्यकारिणीत पदाधिका-यांचा सत्कार करून नियुक्ती पत्र देवून शुभेच्छा देण्यात आल्या.

यावेळी डॉ अशोक शिंपले, डॉ प्रा. दादाराव गुंडरे, गोकुळ शिंपले, संतोष शेंडगे, सचिन हारकर,केशव कस्पटे, राजेंद्र घाटुळे, आकाश दाणे,नेताजी हारकर,बंडु लांडगे,सतिश वैद्य, संतोष घाटुळे,खंडु हारकर, रुषिकेश हारकर, बापूसाहेब घाटुळे, बाळासाहेब हारकर, रामेश्वर हारकर, दत्ता हारकर,करण गायके, यांच्यासह आदी कार्यकर्ते उपस्थित होते.



# माळेगाव यात्रेत बालकल्याण विभागाच्या विविध स्पर्धा; बक्षिसांचे वितरण

आधुनिक केसरी न्यूज

**मोहन पवार**

**लोहा :**दरवर्षीप्रमाणे याही वर्षी माळेगाव यात्रेनिमित्त महिला व बालकल्याण विभागाच्या वतीने विविध स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. त्यामध्ये मेहंदी स्पर्धा, सुदृढ बालक स्पर्धा, पाक कृती स्पर्धा घेण्यात आल्या.

यामध्ये 0 ते 3 वर्षे तसेच 3 वर्ष ते 6 वर्षे वयोगटातील प्रथम आणि द्वितीय क्रमांक मिळवणाऱ्या मुलांना दोन पारितोषिक देण्यात आली. त्यात तीन चाकी व दोन चाकी सायकलचा समावेश आहे. मेहंदी स्पर्धेमध्ये प्रथम द्वितीय आणि तृतीय क्रमांक पटकावणाऱ्या महिलांना प्रत्येकी ट्रॉलीबॅक देण्यात आली. यात्रेत दररोज पाककृती स्पर्धेमध्ये प्रथम येणाऱ्या महिलांना पर्स पारितोषिक देण्यात येत आहे. सुदृढ बालक स्पर्धा वयोगट 3 ते 6 वर्ष - विजेते प्रथम चेतन गजानन पांडागळे, शिराढोण तालुका कंधार, द्वितीय विराज वेदांत राठोड गाव -आमरुतांडा सुदृढ बालक स्पर्धा वयोगट 0 ते 3 वर्ष- प्रथम आयुष संदीप हाबगुंडे, रिसनगाव तालुका लोहा, द्वितीय नयन शिवाजी जाकापुरे, वाळकेवाडी तालुका लोहा मेहंदी स्पर्धा- प्रथम रुपाली दत्ता देवकते, कोष्ठवाडी, द्वितीय पुरस्कार श्रावणी नारायण ठाकुर,उमरगा तृतीय क्रमांक प्रतीक्षा व्यंकटराव, कोष्ठवाडी यांनी पटकावला.



जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मीनल करनवाल यांच्या मार्गदर्शनात महिला व बाल विकास विभागाच्या उप मुख्य कार्यकारी अधिकारी रेखा काळम-कदम यांनी या कार्यक्रमाचे उत्कृष्ट नियोजन केले. या विभागाच्या वतीने माळेगाव यात्रेत भव्य स्टॉलही उभारण्यात आला आहे. या ठिकाणी दररोज पोषण आहार, पाककृती आदीबाबत भाविकांना माहिती दिली जात आहे. यासाठी लोहा व कंधार तालुक्यातील अंगणवाडी पर्यवेक्षिका परिश्रम घेत आहेत.

# शिक्षकांचे आझाद मैदानावर उपोषण

आधुनिक केसरी न्यूज



**धुळे :** राज्यातील विनाअनुदानित व अंशतः अनुदानित शिक्षकांना राज्याचे शिक्षण मंत्री दीपक केसरकर यांनी दिलेला शब्द फिरवल्याने शिक्षक पुन्हा आझाद मैदानावर आंदोलनासाठी बसले आहेत. मागील वर्षी राज्यातील हजारो विनाअनुदानित व अंशतः अनुदानित शिक्षक आपल्या शंभर टक्के पगाराच्या मागणीसाठी 30 ऑक्टोबर 2023 पासून शिक्षक समन्वय संघाच्या माध्यमातून आझाद मैदान मुंबई येथे आंदोलनात बसलेले होते. या आंदोलनात राज्यातील जवळपास सर्वच शिक्षक संघटना सहभागी झालेल्या होत्या. या आंदोलनास शिवसेना उ.बा ठा गटाच्या उपनेत्या तथा महाराष्ट्र टीचर्स असोसिएशनच्या राज्याध्यक्ष शुभांगी ताई पाटील यांनी दिनांक 7 नोव्हेंबर रोजी पाठिंबा देत सदर आंदोलनाची संपूर्ण वस्तुस्थिती पक्षप्रमुख उद्धव ठाकरे साहेब यांना दिली होती. त्यानंतर दिनांक 8 नोव्हेंबर रोजी पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्या निर्देशानुसार विरोधी पक्षनेते खासदार अंबादासजी दानवे साहेब यांनी स्वतः आझाद मैदानावर येत शिक्षकांच्या सदर आंदोलनास पाठिंबा दिला. शिक्षकांचा व विरोधी पक्षाचा दबाव पाहता दिनांक 9 नोव्हेंबर रोजी राज्याचे शिक्षण मंत्री ना दीपक केसरकर यांनी तात्काळ शिक्षकांची भेट घेऊन शंभर टक्के अनुदान देणे शक्य नाही पण अनुदानाचा पुढील टप्पा देण्याची लेखी आश्वासन दिले होते. शिक्षण मंत्र्याच्या या आश्वासना वर विश्वास ठेवून त्यावेळी शिक्षकांनी आपले आंदोलन मागे घेतले होते, परंतु शिक्षण मंत्र्यांनी दिनांक 9 नोव्हेंबर रोजी शिक्षकांना दिलेला शब्द पाळला नाही. त्यामुळे राज्यभरातील विनाअनुदानित व अंशतः अनुदानित शिक्षकांचा मोठा विश्वासघात झाल्याने दिनांक 3 जानेवारी 2024 पासून शिक्षक समन्वय संघाच्या माध्यमातून राज्यातील विनाअनुदानित व अंशतः अनुदानित शिक्षक पुन्हा आझाद मैदानावर आंदोलना साठी उतरले आहेत. या आंदोलनात राज्यातील सुमारे 23 संघटना उतरल्या असून, संघटनांचे सर्व प्रमुख पदाधिकारी यांच्यासह सुमारे आठ ते दहा हजार शिक्षक आझाद मैदानावर आंदोलनात बसले असून या शिक्षकां पैकी अनेक महिला शिक्षिकांनी आपल्या मुला बाळां सह उपोषणाच्या हत्यार उपसले आहे. शिक्षक समन्वय संघाच्या या आंदोलनात शिवसेना उ बा ठा.उपनेते तथा महाराष्ट्र टीचर्स असोसिएशन संघटनेच्या राज्याध्यक्ष शुभांगी ताई पाटील या दिनांक 10 जानेवारी पासून सक्रियपणे उतरल्या असून सदर आंदोलनास शिवसेना पक्षाने पाठिंबा दिलेला आहे. विनाअनुदानित व अंशतः अनुदानित शिक्षकांना जोपर्यंत शंभर टक्के अनुदान मिळत नाही तोपर्यंत माघार घेणार नाही असा निर्धार शुभांगी ताई पाटील , दीपक कुलकर्णी, कर्तार सिंग ठाकूर रहाटे काका, महेंद्र बच्छाव ,अनिल परदेशी , ज्ञानेश्वर चव्हाण ,शेळके सर व अनेक समन्वयकांनी व्यक्त केला आहे.



# जिजाऊ जयंतीनिमित्त आनंद नगरीचे आयोजन

आधुनिक केसरी न्यूज

**बाजार सावंगी :** येथे दि.13 रोजी आनंद नगरी चे आयोजन करण्यात आले होते. स्वामी विवेकानंद इंटरनॅशनल स्कुल आणि ज्युनिअर कॉलेज बाजार सावंगी येथे राजमाता जिजाऊ जयंती आणि स्वामी विवेकानंद जयंती चे औचित्य साधून शाळे मध्ये उत्कृष्ट अश्या आनंदनगरीचे आयोजन करण्यात आले होते.या प्रसंगी कार्यक्रमाचे उदघाटन बाजार सावंगी चे सरपंच आप्पाराव नलावडे यांच्या हस्ते करण्यात आले,या कार्यकर्मासाठी सरपंच आप्पाराव नलावडे, उपसरपंच कारभारी नलावडे ज्ञानेश्वर नलावडे,तसेच सय्यद लाल,पुंजाजी अण्णा नलावडे, प्रकाश नलावडे,किशोर नलावडे, बनसोड साहेब यांनी कार्यक्रमाला आवर्जून उपस्थिती दर्शवली. त्या बद्दल शाळेचे संस्थापक साळुंके ,आणि मुख्यध्यापिका सौ.साळुंके यांनी त्यांचे मनस्वी आभार व्यक्त केले. मुलांमध्ये व्यावहारीक गुणांचा विकास व वाढ होणे हा उद्देश डोळ्यासमोर ठेवून आनंद नगरी उत्साहात पार पडली.त्याच बरोबर सर्व पालक ही यासाठी आवर्जून उपस्थित राहिले होते.सर्व शिक्षकवृंद यांनी कार्यक्रमात उत्स्फूर्तपणे सहभाग नोंदविला.

# श्रीरामाच्या अभ्युदयाचे चैतन्यपर्व



डॉ. वि. ल. धारुरकर
संपर्क क्र. 9225313592

आधुनिक केसरी

**अयोध्येतील श्रीरामाचे मंदिर म्हणजे ही नव्या तेजस्वी विकास पर्वाची नांदी आहे. एक प्रगत राष्ट्र म्हणून भारत जगाच्या क्षितिजावर तेजस्वीपणे तळपत आहे. भारताची ही गरुडझेप म्हणजे श्रीरामाच्या अभ्युदयाचे चैतन्यपर्व होय. विज्ञान, संस्कृति आणि विकास यामध्ये सुवर्ण मध्य साधून भारत प्रगतीची नवनवी शिखरे पादाक्रांत करत आहे. चंद्र मोहीम, सूर्य मोहीम, आंतराळातील प्रयोगशाळा तसेच पृथ्वीच्या पर्यावरणाचे संशोधन या सर्व बाबी अभिमानास्पद आहेत.मर्यादा पुरुषोत्तम प्रभू रामचंद्र हे भारतीय संस्कृतीमध्ये आदर्श व्यक्तिमत्त्व मानले जातात. हिंदू, बौध्द, जैन आणि शिख धर्मामध्ये सुध्दा प्रभू रामचंद्राचे श्रेष्ठत्व आणि पावित्र्य मान्य करण्यात आले आहे. श्रीराम विचारांची ज्योत घरोघरी पोहोचविण्याचे आवाहन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केले आहे. श्रीराम हे राष्ट्रीय एकात्मतेचे प्रतिक मानले जातात.**

रामायण हे एक महाकाव्य आहे, रामायण हे विचारमंथन आहे, रामायण हे एक अमृतपर्व आहे. गेल्या वर्षभरात उत्तरप्रदेशातील शरयु नदीकाठी वसलेल्या अयोध्यानगरित त्यांच्या जन्म स्थानी प्रभू रामचंद्राचे भव्य मंदिर उभारण्यात आले आहे. त्यामुळे अयोध्या नगरीला नवे तेजस्वी रूप प्राप्त झाले आहे. तेथे महर्षी वाल्मिकी यांच्या नावाने आंतराष्ट्रीय दर्जाचे भव्य विमानतळ उभारण्यात आले आहे तसेच रेल्वे स्थानकाचे आधुनिकीकरण करण्यात आले आहे. तेथून देशभरात जाण्यासाठी पाच नवीन 'वंदेमातरम्' रेल्वे सेवा सुरु करण्यात आल्या आहेत. शिवाय 1500 कोटी रुपयाचे बहुद्देशिय विकासप्रकल्प हाती घेण्यात आले आहेत. जगातील पर्यटक आता ताजमहाल ऐवजी अधिकाधिक संख्येने अयोध्येकडे वळतीलआणि अयोध्या नगरीमध्ये नवी पर्यटन क्रांती घडत आहे.तेथे पंचतारांकीत उपहारगृहे तसेच अव्वल दर्जाची आरोग्य सुविधा देणारी इस्पितळे, दवाखाने तसेच मनोरंजन उद्योग व शिक्षण संस्थांचा विकासयामुळे या जिल्ह्यात 50 लाखापेक्षा अधिक रोजगार निर्माण होतील.या सर्व रचनात्मक बदलांचा तेथे समाजशास्त्रीय दृष्टिने अभ्यास केला आहे.

**तेजपूंज:सूर्यपुत्र श्रीराम :** नदीचे मूळ आणि ऋषीचे कुळ शोधल्याशिवाय सापडत नाही असे म्हणतात. भारतीय परंपरेनुसार श्रीराम हे सूर्यपूत्र म्हणून ओळखले जातात. श्रीरामाच्या समग्र जीवनकार्याचा अभ्यास केला असता, असे दिसते की, प्रतिकुल परिस्थीतीमध्ये संघर्ष करुन सर्व संकटांवर मात करून, 14वर्षाचा वनवास पुर्ण करून अयोध्येत श्रीरामाचे पुनरागमण झाले. तसाच उत्साह मंदिर स्थापनेच्या निमित्ताने देशभर संचारत आहे. रामाचा जन्म सूर्य कूळात झाल्याचे दिसून येते. पुराणानुसार राम, कर्ण आणि शनी हे सूर्यकुळालीलतीन वंशज मानले जातात. त्यामुळे रामाभोवती सूर्याचे तेजोवलयप्रकटतांना दिसते.अभ्यासकांनी प्राचीन सांस्कृतिक इतिहासाची तुलनात्मक चिकित्सा करून प्रभू रामचंद्र हे आदर्श व्यक्तिमत्त्व असल्याचे सिद्ध केले आहे.रामाचा जन्म कौसल राज्यात कौसल्या व दशरथ यांच्या पोटी झाला. त्याच्या भावंडामध्ये लक्ष्मण, भरत आणि शत्रुघ्न यांचा समोवश होतो. रामाचा सितेशी विवाह झाला. राजघराण्यात जन्म झाला असला तरी, रामाचे जीवन हे कंटकमय होते. प्रतिकुल आणि कठीण परिस्थितीतीवर मात करून त्यांनी आपले जिवन शिल्प कोरले. जेवढा संघर्ष अधिक असतो तेवढा विरपुरुष तप्त मुशितुन तावून सुलाखून तेजस्वी सोन्यासारखा बाहेर पडतो.

**दुष्ट रावणाचापराभव :** रामायण ही दुष्ट प्रवृत्तीवर सुष्ट म्हणजे चांगल्या सद् गुणाने मिळविलेल्या विजयाची कथा आहे. रावनाने सितेचे अपहरण केल्यानंतर राम, आणि लक्ष्मण यांनी सितेला बंधमुक्त करण्यासाठी सर्व संकटावर मात करून रावणाचा कसा पराभव केला त्याचे चित्र रामायणात प्रतिबिंबित झाले आहे. संकटमोचक हनुमानाचे अदभूत कार्य हा ही रामायणाचा एक मोलाचा पैलू होय. कुशल नियोजन, उत्तम व्यवस्थापन आणि सामान्य दीनदलित आणि वनवासी यांच्या सामर्थ्यामूळे रामाला विजय मिळविता आला. त्यामुळे वनवासी हे पिढ्यानपिढ्या रामकथा ऐकत आहेत, सांगत आहेत, आणि एका पिढीकडून दुसऱ्या पिढिकडे हा अजोड संस्कृतिक वारसा देत आहेत. रामाभोवती असलेले लोकनायक हे तेजस्वी वलय 'राजा' माणूस नव्हे, तर 'लोकनायाक' म्हणून आजही कायम आहे. रामाविषयीच्या लोककथा भारताच्या काना कोपऱ्यात विखुरलेल्या आहेत. प्रभू रामचंद्राच्या सामाजिक, सांस्कृतिककार्याचे लोकतत्त्वीय परंपरेने नवे आकलन करण्याची गरज आहे, तसे झाले तर प्राचीन रुपक कथांचा नवा अर्थ लावणे शक्य होईल.

**लोकह्दयातील श्रीराम :**
गंगा अखंडपणे वाहत आहे व ती वाळूच्या कणाबरोबर सोन्याचे कण मागे ठेवत आहे. अश्या प्रकारे 5000 वर्षाचा काळ लोटला तरी लोकह्दयातील श्रीरामाचे स्थान तेवढेच तेजस्वी राहिले आहे, आढळ राहिले आहे, ते नित्य नव्याने चमकत आहे. रामाच्या आदर्श अध्यात्मिक जिवनाचे आकलन केले असता असे दिसते की, वैष्णव पंथामध्ये रामाला श्रेष्ठ दर्जाचे महत्त्व आहे. प्राध्यापक कोडेज यांच्या मते प्राचीन जगामध्ये भारतीय कर्णाची प्रक्रिया प्रथम घडून आली. आणि या सांस्कृतिक लाटातून दक्षिण आशियाई आणि आग्नेय आशियाई ब्रहत्तर भारतामध्ये सुमारे 100 बेटावर म्हणजे इंडोनेशिया, मलेशिया, जावा, सुमात्रा, बोरनियो तसेच व्हिएतनाम, लाओस, कंबोडीया आणि थायलंड या देशामध्ये श्रीरामाचे महत्त्व नित्य जीवनात रुजलेले आहे. थायलंडमधील सम्राट हे स्वतःला रामाचे वंशज म्हणूनधन्य मानतात. थायलंड या शब्दाचा अर्थ मुक्त भूमी असा होतो. हा प्रदेश कधीही परकियांच्या ताब्यात गेला नाही. तेथे बौध्द व हिंदू धर्माचा संमिश्र प्रभाव आजही दिसून आहे. रामाच्या सामर्थ्यशक्तीमुळे थायलंडवर कधीही परकिय आक्रमणे झाली नाहीत, झाली तरी ती त्यांनी समर्थपणे परतावून लावली. तेथील कला स्थापत्य मंदिरे, लोकगिते, लोकनाट्य यातूनही रामायणाचे प्रसंग प्रभाविपणे चित्रित केले जातात. 'ॲकोर वॉट' हे मंदिर त्याचे उत्तम उदाहरण होय. इडोनेशियातील अनेक स्थळांना रामायणातील नावे देण्यात आली आहे.रामायण हे संस्कृत महाकाव्य लिहिणारे वाल्मिकी हे मराठवड्यातील परभणी जिल्हयातील वालुर या ऐतिहासिक नगरीत जन्मले. संशोधकाने या स्थळाला भेट दिली आहे.वाल्मिकी ऋषींनी काही काळ चाळीसगाव जवळ असलेल्या वालखेडा येथेही घालविला होता अशी नोंद सापडते. वाल्या कुळीचा वाल्मिकी कसा झाला याच्या अनेक दंतकथा प्रचलित आहेत. या बाबत लोकतत्त्वीय दृष्टिने अभ्यास करूनवाल्मिकीच्या मुळ जन्मगावाचा शोध घेतला पाहिजे. वाल्मिकी रामायण ही एक सोन्याची खान आहे. अफाट प्रतिभा शक्तीचा हा महाकवि एखाद्या सोनचाफ्या प्रमाणे आजही सुगंध देत आहे. संस्कृत महाकाव्य लिहीणाऱ्या वाल्मिकी ऋषींनी श्रीरामाच्या भोवती मध्यवर्ती केंद्रबिंदू मानून कथानकांचा सहज सुंदर विकास केला. वाल्मिकीच्या मूल्य प्रेरणा आणि त्यांच्या कल्पकतेचे जगभरातून पाश्चात्य समिक्षकांनीसुध्दा कौतुक केले



आहे. त्यामध्ये ऑक्सफोर्ड, केंब्रीज,हावर्ड तसेच एम. आय.टी. या जागतीक विद्यापीठातील पंडितांचा समावेश आहे. संस्कृत काव्याचा अजोड असा नमुना रामायणात प्रकट झाला आहे. असे नमुद केले आहे की, वनवासात असताना आपल्या आश्रमातून सितेचे संगोपन आणि लव-कुशाचे पालनपोषण वाल्मिकी ऋषीनी आपल्या आश्रमात केले. उत्तर रामायणातील सर्व प्रसंग व कथा वाल्मिकींनी स्वतः अनुभवल्या त्यामुळे ते जिवंत चित्रण करू शकले. उत्तर भारतील पुरातत्त्वज्ञ प्रा. बी. बी. लाल यांनी जसा अभ्यास केला तसा दक्षिणेतील रामायण पुरातत्त्वाचा अभ्यास झालेला नाही. वाल्मिकीचे जन्मस्थळ, अगस्ती ऋषी व रामचंद्राची गोदाकाठी तीन वेळा झालेली भेट, याचा शोध घेतला पाहिजे. (यापैकी एक माजलगाव या तालुक्यातील मंजरथ हे एक गाव होय.) त्यांची ही भेट माजगाव तालुक्यातील मंजरथ या गावी झाल्याचे काही अभ्यासकाचे मत आहे.तसे परंपरेने सांगितले जाते की, प्रभू रामचंद्र व अग्रस्ती ऋषी यांच्या भेटीची माहिती नवगण महात्म्य या पोथीमध्ये आली आहे. तसेच लव व कुश यांनी उभारलेला लवगढ-नांद्रा हे स्थान संभाजीनगर जिल्हयात सिल्लोड तालुक्यात आहे. मराठवाडयातील दंड कारण्यात म्हणजे तपोवनातून पुढे जातांना बीड (देवांचे बीळ) येथे जटायुने सितेच्या अपहरणाची बातमी रामाला सांगितल्याची कथा आहे. बीड येथील जटायु मंदिर त्याची साक्ष देते. बीड हून धारुरला जात असतांना धारुर नजीक प्रभूरामचंद्राने बाण मारून गरम पाण्याचा झरा कसा काढला. याची केवळ कथा नव्हे तर प्रत्यक्ष गरम पाण्याचा झरा संशोधकाने स्वतः पाहिला आहे त्या जागेला सितेचे स्नानगृह म्हणून ओळखले जाते. तुळजापुरच्या भवानी देवीने प्रभूरामचंद्रास रावणाने सितेला कोणत्या मार्गाने लंकेकडे नेले याचा मार्गा दाखविला म्हणून तुळजापुरच्या तुळजाभवानी रामवरदायीनी असे 'तुरजामहात्म्य' या संस्कृत काव्यात संबोधले आहे. पुढे कर्नाटक, केरळ, तामिळनाडू असा प्रभू रामचंद्राने केलेला प्रवास सुध्दा विविध स्थानाच्या रुपाने व कथांच्या रुपाने प्रकट होतो. त्यातील स्थल व कथानक याविषयी दावे-प्रतिदावे केले जातात. परंतु दक्षिण भारतामधील प्रभु रामचंद्रांच्या संचाराचा पुरातत्त्वीय साधनांचा अभ्यास अद्यापही व्हावयाचा आहे. 'रामचरितमानस' या ग्रंथामध्ये सुध्दा काही दक्षिण भारतातील स्थळांचा उल्लेख सापडतो.

**नवा अर्थ नवा संदेश :** समर्थ रामदासांनी रामायणाची शुध्द प्रत तयार केली. त्यांनी गोदाकाठी नाशिक येथे वाल्मिकी रामायणाची निर्दोष प्रत पुर्नरलेखित केली. धुळे येथील राजवाडे संशोधन मंडळाने हे खंड संशोधकांना उपलब्ध करुन दिले आहेत. त्याचे नुकतेच मा. मोहनजी भागवत यांच्या हस्ते, पुण्यात प्रकाशन करण्यात आले. या सर्व खंडांच्या पुनरावलोकनासाठी राजवाडे मंडळाचे संजय बालकिशन मुंदडा आणि अनिल साठे यांचा संशोधक ऋणी आहे. प्रभू रामचंद्राभोवती जैन आणि बौध्द धर्माच्या प्राचीन ग्रंथामधील लोकतत्त्वीय संदर्भ हे रामाचे व्यापक व सुक्ष्म रुप प्रकट करतात. जैन ग्रंथात रामाचा उल्लेख त्रेसष्ठावा सलक पुरुष असा आढळतो. आठवा बलभद्र असेही त्याचे वर्णन आले आहे. प्राचीन बौध्द व पाली ग्रंथामध्ये रामाचे वर्णन सावळा संमिश्र रंगाचा तसेच आंनदी सुंदर असा उल्लेख केला आहे. थॉमसन विल्यम व रायस डेव्हीडस यांनी पालि, इंग्रजी शब्दकोशात रामाचा हा अर्थ दिला आहे. (बनारस 1921 पृ.521 ) शिख धर्मामध्ये रामाचा उल्लेख दशम ग्रंथातील 24 वा अवतार असा सापडतो, म्हणजेच विष्णुच्या 24 इश्वरी अवतारापैकी एक पवित्र दैवत असा उल्लेख शिख ग्रंथामध्ये आला आहे.

**वर्तमानातील चैतन्य :** राम या अर्थाचे अनेक संदर्भ प्राचीन वैदिक संस्कृत भाषेत आढळतत. अथर्ववेदामधील एका श्लोकाचा संदर्भ देवून मुनियर विलीयम यांनी रामाचा अर्थ गडद रंगाचा काळा असा दिला आहे. अन्य काही वैदिक ग्रंथानुसार रामाचा अर्थ आनंददायी, रमणीय सुंदर मोहक असा होतो. अन्य तमिळ व मल्याळी या भाषेतूनही रामाचे असेच वर्णन करण्यात आले आहे. ऋग्वेदातील 10 व्या अध्यायातील 110 श्लोकाचे लेखक राम जमदग्न ऋषी असल्याचे म्हटले आहे. राम हा विष्णूचा सहावा अवतार मानला जातो. काहींनी त्यास सातवा अवतार असेही म्हटले आहे. हिंदू, बौध्द आणि जैन व शिख परंपरातील अनेक कथा रामाचे सर्वसमावेशक रुप म्हणून प्रकट करतात. अंधाररात्रीवर मात करणारा मनमोहक अनुभव प्रदान करणारा सहज सुंदर चंद्रासारखा शीतल प्रकाश देणारा असा आदर्श पुरुष म्हणून राम आजरामर झाले आहेत. रामविजय हे सुध्दा रामाचे आणखी एक नाव होते. असा संशोधकाचा दावा आहे. विष्णु सहस्रनाम या ग्रंथामध्ये राम हे विष्णूचे 394 क्रमाचे नाव आहे असा उल्लेख सापडतो. शाश्वत आनंदी जिवन हा रामाचा संदेश आहे. थांबा स्थिर रहा, शांत व्हा. आनंदी जिवन जगा, प्रसन्न रहा, हा प्रभुरामचंद्राच्या जीवनाचा संदेश आहे. रॉडरीक हिंडरी यांनी हिंदू आणि बौध्द परंपरेतील तुलनात्मक नितीशास्त्राचा अभ्यास केला आहे व त्यात रामाचे महत्व सांगीतले आहे.

**समारोप :** अयोध्येत प्रभू रामचंद्राच्या मंदिराची प्रतिस्थापना झाल्यामुळे भारतामध्ये स्थिर, भक्कम आणि लोक कल्याणकारी राज्याचे नवयुग अवतरत आहे. कारण प्रभूरामचंद्र प्राचीन भारत लोकल्याणकारी राज्याचे उद्‌गाते होते. गेल्या वर्षभरातील कृषी उद्योग शिक्षण, आरोग्य, सुरक्षा तसेच विज्ञान तंत्रज्ञान, कृत्रीम बुध्दिमत्ता या क्षेत्रात भारताने गरुडझेप घेतली आहे. भारताने चंद्र व सूर्यावर आपले यान पाठविले. आता चांद्रयान मोहिम टप्प्यात आली आहे. जगात सर्वात जास्त उपग्रह भारत आंतराळात सोडत आहे. एस ॲण्ड पी च्या अंदाजानुसार 2027 मध्ये भारत जगात तिसरी अर्थव्यवस्था होईल व पुढील दशकात चीनला मागे टाकुन अमेरीकच्या मांडीस मांडी लावून बसेल. शेलडन पोलिक यांच्यामते रामाच्या आकृतीमध्ये व प्रकृतीमध्ये अनेक पौराणिक कथा आणि प्राचीन भारतीय मितकांचा सहज, सुंदर मनोज्ञ संगम झाल्याचे दिसून येते. वाल्मिकी रामायणातील प्रभू रामाला दिलेल्या उपमा तिसऱ्या अध्यायातील 27,59 आणि 73 श्लोकामध्ये आढळतात तसेच 5 व्या अध्यायातील 19 व्या आणि 29 व्या अध्यायातील 28 व्या श्लोकामध्ये प्रकट होतात. प्रभुरामचंद्राच्या दुरदृष्टीचे आणि त्यांच्या आदर्श व्यवहाराचे भारतामध्ये नव्याने पुनरागमन होत आहे. महात्मा गांधीनी त्यामुळे त्यांच्या आदर्श राज्य कल्पनेस रामराज्य असे नाव दिले आहे. मागील वर्ष व येणारे वर्ष हे रामाच्या अभ्यूदयाचे चैतन्य पर्व आहे. पुढील 25 वर्षात भारत पुन्हा एकदा जगामध्ये बलशाली व संपन्न राष्ट्र म्हणून तळपत राहील यात शंका नाही. रामाभोवती असलेल्या संकल्पनाचे व दंतकथांचे नव्याने आकलन केले पाहिजे त्यामुळे भारतीय जिवनातील मानवी मूल्ये पुन्हा प्रकट होतील. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी म्हटल्याप्रमाणे विकास आणि संस्कृति यामध्ये समन्वय साधून नव भारताची उभारणी केली जात आहे. स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवी वर्षातील हा संक्रमण काळ त्यामुळे भावी परिवर्तनाची नादी ठरत आहे. श्रीराम विचारांची ज्योत भारतीय नागरिकांच्या मनात देशभक्ती व स्वावलंबनाचा संदेश देत राहिल. 2047 मध्ये विकसित भारताचे तेच अंतिम उद्दिष्ट आहे. त्यासाठी प्रभू रामचंद्रांनी दिशा दाखविलेल्या आदर्श राम राज्याची स्थापना करावी लागेल, तसे झाले तर भारताच्या राष्ट्रीय इतिहासात नवे सोनेरी पान लिहिले जाईल.

# पत्रकारिता टिकवून ठेवणे गरजेचे



सचिन मोरे
संपर्क क्र.: ९५५२३५७५३४

आधुनिक केसरी

**भारतीय संविधानाने देशाला दिलेले मुख्य चार स्तंभ हे खूप महत्वाचे मानले जातात.लोकांनी लोकांसाठी चालविलेले राज्य म्हणून या लोकशाहीकडे पाहिले जाते.या लोकशाहीचा चौथा स्तंभ म्हणून पत्रकारिता हा समाजाला प्रबोधित करणारा महत्वपूर्ण असा घटक आहे.परंतु हा घटक दुर्लक्षित झालेला आहे.त्यामुळे या घटकाबद्दल सुद्धा सविस्तर बोलणं आवश्यक होऊन बसलेले आहे. सद्यस्थितीत पत्रकारितेवर अनेक प्रश्नचिन्ह हे उपस्थित राहिलेले आहेत.पत्रकारिता ही परिस्थिती नुसार तिचे रूप दाखवत असली तरी ज्या पत्रकारितेत पत्रकार हे काम करत असतात.**

त्यांच्या समस्यांना ही जाणून घेणे गरजेचे आहे. एकीकडे पत्रकारितेवर प्रश्नचिन्ह उपस्थित होत असले तरी दुसरीकडे पत्रकारितेच्या व पत्रकारांच्या त्या समस्यांवर सुद्धा विचारमंथन व्हायला हवे. पत्रकारितेकडे सकारात्मक दृष्टिने बघितले तर पत्रकारिता काय करत असते.याची जाणीव नक्कीच सर्वांना होऊन जाऊ शकते. पत्रकारिता करणाऱ्या पत्रकारांना सुद्धा कुटूंब परिवार असतोच.त्याच्यावर ही अन्याय अत्याचार झाल्यानंतर समाजातील विविध स्तरातील घटकांनी मागे उभे राहणे गरजेचे आहे.परंतु असे होताना दिसत नाही.पत्रकार अनेक अडचणी व समस्यांचा सामना करत असतात.पत्रकार हा निर्भयतेने त्याची पत्रकारिता चालवित असतो. लोकशाहीमध्ये पत्रकाराची मुख्य भूमिका असल्याने लोकशाहीला जिवंत ठेवण्याची महत्वपूर्ण जबाबदारी ही पत्रकारांवर आहे.निर्भयता ही पत्रकारांकडून जपली जात असते.त्याचे परिणाम ही आपल्याला दिसून येत असतात.लोकांचे प्रश्न आणि समस्या सोडवित असताना पत्रकार स्वतःच्या समस्या आणि अडचणी बाजूला ठेवत असतो.लोकांच्या समस्या पत्रकारितेतून मांडत राहणे खरंतर हीच पत्रकाराची खरी लेखणी आहे.त्याच्यामुळे काय लिहायचे किंवा काय लिहून आणायचे हे न ठरविता वास्तविक जे काय खरं आहे ते लिहून आणण्याचं काम पत्रकारितेतून करणे गरजेचे असते.अगदी तेच काम पत्रकार करण्याचा प्रयत्न करत असतो. लोकांचा विश्वास पत्रकारितेवर राहील अशी पत्रकारिता टिकवून ठेवणे हे आजच्या काळात अवघड होऊन बसलेले आहे.परंतु असे अनेक पत्रकार असू शकतात ते इथल्या समाज
व्यवस्थेतील प्रतिबिंब पत्रकारितेतून मांडत असतात. लोकशाहीचा मुख्य आत्मा हा तीन स्तंभा नंतर मुख्य जबाबदारी पत्रकारितेवरच येते कारण समाजाला न्याय देता देता कधी कधी पत्रकारितेवरच अन्याय होत असतो.गुंड प्रवृतीची लोकं सुद्धा पत्रकारांवर हल्ले करत असतात.तेव्हा यातून जीव जाण्याची भीती सुद्धा असते.तरी सुद्धा पत्रकार स्वतःच्या पत्रकारीतेतून व्यक्त होण्याचं थांबवत नाहीत.




पत्रकारावर हल्ले करणे किंवा बातमीचा राग मनात धरून खोटे गुन्हे दाखल केले जात असतात. कोणत्या बातमीचा कधी कुणी कसा राग खुनसी प्रवृतीतून बाहेर काढेल हे काही सांगता येत नाही. अशा वेळेस लोकांनी व राजकीय नेत्यांनी सुद्धा पत्रकारांना पाठबळ द्यायला हवे. पत्रकाराला न्याय देण्याचं काम केलं पाहिजे.संरक्षण आणि सुरक्षितता उपलब्ध करून दिली पाहिजे.पत्रकाराला सरकारी मदत मिळणे गरजेचे आहे.जसे आमदार खासदार असतील त्यांना पगार पेन्शन मिळते तसे सरकार कडून पत्रकारास मानधन पेन्शन मिळणे गरजेचे वाटते.कारण पत्रकार हा समाजात होणारा अन्याय अत्याचार लिहित असतो.त्यामुळे त्यास अन्यायाचा सामना करावा लागतो.कुठेही तेढ निर्माण होणार नाही. याची जबाबदारी पत्रकारिता घेत असते.त्यामुळे पत्रकारितेतील पत्रकार हा घटक सुद्धा संरक्षित करणे सर्वांची जबाबदारी आहे.पत्रकार हा सशक्त करणे ही समाजाची जबाबदारी आहे.पत्रकारितेला पाठबळ हे समाजाने दिले तर समाजातील समस्या मांडण्याचे काम पत्रकारांची पत्रकारिता करत राहील. असा विश्वास या लोकशाहीच्या चौथ्या स्तंभाबद्दल वाटत आहे.त्यामुळे पत्रकारांची पत्रकारिता ठेवणे खूप गरजेचे आहे.जनतेच्या समस्या मांडत असताना पत्रकारांना अडचणी आल्यास त्यास बळ देणे सुद्धा आवश्यक आहे. लोकांनी व समाजातील विविध घटकांनी पत्रकारांच्या पाठिशी खंबीरपणे उभे राहणे अपेक्षित आहे.

# राम मंदिरच का आणि कशासाठी ?



शाम हेडाऊ
संपर्क क्र.9834301568

आधुनिक केसरी

**येत्या 22 जानेवारीला अयोध्येमध्ये प्रभू श्रीरामचंद्रांच्या भव्य मंदिरामध्ये श्रीरामलल्लांच्या प्राणप्रतिष्ठा सोहळ्याचे भव्य आयोजन करण्यात आले आहे. आणि त्यासाठी केवळ भारतातच नव्हे तर , जगातल्या अनेक राष्ट्रांमध्ये या प्राणप्रतिष्ठा सोहळ्याच्या आयोजनाची उत्कंठा आता शिगेला पोहोचलेली आहे. संपूर्ण भारतीयांसाठी अतिशय आनंदाचा आणि अभिमानाचा असलेला हा क्षण देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी समस्त भारतीयांसाठी आणून दिलेला आहे. त्यामुळे सर्वप्रथम या देशाचे पंतप्रधान म्हणून नरेंद्र मोदी यांचे आम्ही अगदी मनापासून अभिनंदन करतो आणि त्यांचे आभार मानतो. नरेंद्र मोदी यांनी समस्त भारतीयांच्या मनामनामध्ये असलेल भव्य श्रीराम मंदिर साकार केलं आणि आमच्या सगळ्यांसाठी ते खुलं केलं.**

खरंतर राम मंदिराच्या या प्राणप्रतिष्ठा सोहळ्याचं याची देही याची डोळा पाहण्याचं भाग्य आपल्या सगळ्यांना लाभते आहे हे खरंच आपलं खूप मोठं भाग्य आहे असं मला तरी वाटतं . कारण आमच्या आधीच्या पिढीने अनेक मंदिर केवळ उध्वस्तच होताना पाहिलेली आहेत. परंतु आम्ही आत्ताची जी जनरेशन आहे ही जनरेशन आणि ज्यांच्या समोर मंदिर उद्ध्वस्त झाली त्यातले काही लोक आज जी शिल्लक असतील ,आहेत ज्यांनी भग्न मुत्यांचे अवशेष पाहत अश्रू गाळले होते असे काही लोक जे आज आहेत त्यांच्यासाठी सुद्धा खरंतर प्रभू श्री राम मंदिराच्या प्राणप्रतिष्ठा सोहळ्याचा हा आनंद अतुलनीय आहे , अवर्णनीय आहे . त्याला शब्दांमध्ये बांधताच येत नाही किंवा शब्दांमध्ये गुंफताच येत नाही.

असं असलं तरी सुद्धा दुसऱ्या बाजूला मात्र या राम मंदिरामुळे पोटशूळ उठलेला आपल्याला पाहायला मिळतो आहे. खरंतर या देशाच्या 75 वर्षाच्या स्वातंत्र्याच्या काळामध्ये सगळ्यात जास्त वर्ष या देशावर राज्य केलं असेल तर तो कॉंग्रेस पक्ष आहे . या कॉंग्रेस पक्षाच्या वाट्यालाही हे राम मंदिर बांधून समस्त भारतीयांच्या मनामनातली ही भावना जिंकून घेण्याच भाग्य, तशी संधी कॉंग्रेस पक्षाला होती. परंतु या कॉंग्रेस पक्षाने मात्र हे राम मंदिर निर्माण करण्याऐवजी भारतीयांची मी असं म्हणेन की हिंदूंची खिल्ली उडवत " मंदिर वही बनायेंगे पर तारीख नही बतायेंगे " असं म्हणत या मंदिराच्या निर्मितीमध्ये अडथळेच कसे निर्माण करता येतील या दृष्टीने प्रयत्न केले.

परंतु देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी 2014 मध्ये आपली सत्ता हातात घेतल्यानंतर या देशाचे नेतृत्व करत असताना भारतीयांच्या मनामनामध्ये असलेली इच्छा ओळखली . आणि या खटल्याच्या संदर्भात नेमकी काय सध्या स्थिती आहे याचा अंदाज घेत या मंदिर निर्मितीमध्ये काय अडथळे आहेत ते दूर करण्यासाठी कसे प्रयत्न करता येतील त्याचा प्रयत्न सुरू झाला. आणि आज वेगवान घडामोडी घडत 2014 नंतर वेगवान घडामोडी घडत आज प्रत्यक्षात प्रभू श्री रामचंद्रांच्या मंदिरामध्ये श्रीराम लल्लांच्या प्राणप्रतिष्ठेचा सोहळा याची देही याची डोळा पाहण्याचं भाग्य समस्त भारतीयांना मिळवून दिलं. त्याबद्दल देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे मनःपूर्वक अभिनंदन.

एका बाजूला हे सगळं होत असतानाच दुसऱ्या बाजूला मात्र या राम मंदिरामुळे अनेकांना पोटशूळ झालेला पाहायला मिळतो आहे. हे राम मंदिरच का आणि कशासाठी त्याऐवजी दवाखाने बांधावेत , शिक्षणाच्या सोयी उपलब्ध करून द्याव्यात, किंवा त्याऐवजी गरिबांना जेवण देता आलं असतं , त्यांच्या निवासाची व्यवस्था करता आली असती असे एक ना अनेक सूचना केल्या जात आहेत. मंदिरावर एवढा पैसा कशाला खर्च करायचा ? याचे दाखले देण्यासाठी मग तुकडोजी महाराजांच्या काही ओळींचा किंवा संत तुकारामांच्या काही ओळींचा संदर्भ घेतल्या जातो आहे जो अतिशय चुकीचा आहे. कारण हे जे लोक आहेत जे या मंदिराच्या निर्माणमुळे अस्वस्थ झाले आहेत त्यांना मात्र आपण जिथे राहतो त्याच एरियातल्या गल्ली बोळांमध्ये इतर धर्मीयांचे वाढत असलेले प्रार्थना स्थळे , त्यावर वाढत चाललेले मनोरेच्या मनोरे मात्र दिसत नाहीत. ही अतिशय खेदाची बाब आहे .आणि केवळ हिंदू धर्मीय सोडले तर कोणतेही इतर धर्मातले लोक हे आपल्या धर्माबाबत, तिथल्या संस्कृती बाबत, तिथल्या रूढी, प्रथा, परंपरांबाबत , चालीरितींबाबत कधीही कोणतीही टीकाटिप्पणी करताना आपण पाहत नाही. परंतु हिंदू धर्मियांमध्ये मात्र काही अति शहाने लोक असे आहेत की, ज्यांना आपल्या हिंदू धर्मामध्ये असलेल्या चालीरीती, रुढी, प्रथा, परंपरा यावर सातत्याने टीका करायला आवडते. किंबहुना हा प्रसिद्धीचा सगळ्यात जास्त चांगला मार्ग आहे. असं समजून ते जाणीवपूर्वक या टीकाटिप्पणी करत राहतात. परंतु हे करत असताना मात्र इतर धर्मियांच्या चालीरीती रूढी प्रथा परंपरा याकडे मात्र जाणीवपूर्वक दुर्लक्ष करतात आणि त्यांच्या वाढत चाललेल्या प्रार्थना स्थळांच्या बाबतीत मात्र हे तितकेच मूग गिळून शांत बसलेले असतात. हे असं का होतं ? तर या देशावर राज्य करण्यासाठी इंग्रजांनी एक धोरण अवलंबलेलं होतं . तोडा, फोडा आणि राज्य करा .याच इंग्रजांच्या धोरणाला पुढे नेत काही पक्षांनी आपल्या देशातील जाती-जातींमध्ये किंवा आपल्या देशातील काही धर्मांमध्ये तोडा फोडा आणि राज्य करा हेच धोरण अवलंबलं. आणि आपली सत्ता गाजवली. आज जेव्हा सत्तेपासून हे लोक दूर झालेत आणि प्रभू श्रीरामचंद्रांच्या मंदिराची निर्मिती होताना दिसते आहे आणि संपूर्ण भारत हा राममय झालेला दिसतो आहे तेव्हा यांच्या पोटामध्ये मात्र पोटशूळ उठलेला आज आपण पाहतो आहे. आणि म्हणून मग या मंदिराच्या निर्मितीनंतर किंवा या मंदिराच्या प्राणप्रतिष्ठानंतर दंगली उठतील. जाती जातीमध्ये असंतोष पटेल असे वक्तव्य जाणीवपूर्वक केल्या जात आहे. हे असं का होतंय ? याचा जेव्हा मी विचार करतो तेव्हा मला एक गोष्ट लक्षात येते की सत्तेपासून दूर राहिल्यामुळे आणि दुसऱ्या बाजूला समस्त हिंदू समाज या भारताच्या कणाकणामध्ये जन्मलेल्या भारताच्या मातीच्या कणाकणा मध्ये जन्मलेला हिंदू समाज हा एकवटताना दिसतो आहे . आणि म्हणून आता आपली सत्ता पुन्हा येते की नाही याची धास्ती त्यांना झालेली आहे. म्हणून मग या देशातल्याच जाती-जातींमध्ये द्वेष निर्माण करायचा, त्यांना तोडायचं, त्यांना एकमेकांच्या समोर उभ ठाकायचं हा प्रयत्न होताना दिसतो आहे. हे सगळं एका बाजूला होत असलं तरी आता समस्त हिंदू समाज मात्र एकवटतो आहे हे मात्र खरे.

आता महत्त्वाचा प्रश्न की राम मंदिरच का आणि कशासाठी ? तर या देशावर अनेकांनी आक्रमण केलो. डच आले, पोर्तुगीज आले, इंग्रज आलेत , मुघलही आलेत .परंतु या देशाच्या संस्कृतीवर घाला घालण्यासाठी मुघलांनी केलेले आक्रमण आणि त्यातून त्यांनी उध्वस्त केलेली आमची सर्व धार्मिक स्थळे तोडलेल्या मुर्त्या, मंदिरे हे जे नुकसान मुघलांनी केलं तितकं नुकसान इतर कोणत्याही आक्रमकांनी आपल्या देशावर केलेलं नाही . हे खरे की इंग्रजांनी या देशावर दिडशे वर्ष राज्य केलं .पण मुघलांनी मात्र इथे जेव्हा जेव्हा आक्रमण केलीत तेव्हा तेव्हा सगळ्यात पहिल्यांदा त्यांनी जर कुठलं काम केलं असेल तर ते म्हणजे इथले मंदिर तोडणे , इथल्या मुर्त्या उध्वस्त करणे , इथल्या संस्कृतीला हरताळ फासणे, इथल्या चालीरीतींवर घाला घालणे, आणि इथल्या महिलांवर आक्रमण करून त्यांना लुटून, पळवून नेणे हे काम जे मुघलांनी केलं ते इतर कधीही कोणत्याही आक्रमकानी केलेलं नाही. मग मुघलांनी हे आक्रमण हे अशा पद्धतीचं आमच्या मंदिर आणि मुर्त्यांना तोडण्याचं काम का केलं ? तर कोणत्याही देशावर अधिराज्य गाजवायच असेल तर त्यांना सगळ्यात पहिल्यांदा त्या देशाची संस्कृती मिटवण्याचा प्रयत्न केला जातो .आणि दुसऱ्या बाजूला त्या देशाची शिक्षण व्यवस्था उध्वस्त करण्याचा प्रयत्न केला जातो. मुघलांनी नेमकं आमच्या संस्कृतीवर हल्ला चढवत इथले शेकडो नव्हे हजारो, लाखो मंदिर तोडलीत , उध्वस्त केलीत , मुर्त्यांच्या मुर्त्या तोडून टाकल्या .आणि त्यावर अनेक ठिकाणी आपली धार्मिक स्थळे उभी केली. किंबहुना अनेक मंदिराच्या मलब्यांमधूनच आपली धार्मिक स्थळे उभी करण्याचाही त्यांनी तेवढाच प्रयत्न केला. त्यात त्यांना यशही आलं . परंतु भारताच्या स्वातंत्र्यानंतर मात्र ही जी उध्वस्त केलेली मंदिर होती , या ज्या तोडलेल्या मुर्त्या होत्या त्या पुन्हा निर्माण कराव्यात आणि या देशाचा गौरवांकित इतिहास पुन्हा एकदा इथल्या येणाऱ्या नव्या पिढीच्या समोर , भारतीयांसमोर उभा करावा असा प्रयत्न मात्र जाणीवपूर्वक टाळण्यात आला. किंबहुना स्वातंत्र्यानंतर इतिहासाच्या पुस्तकांमध्ये नवीन पुस्तक लिहीत असताना आम्ही जाज्वल्य प्रेरणेचा आणि जिंकलेल्या युद्धांचा इतिहास समोर न येऊ देता वेगळा इतिहास कसा समोर येईल या दृष्टीने प्रयत्न करण्यात आले.



याचाच एक भाग म्हणून अयोध्येमध्ये बाबराने मंदिर उद्ध्वस्त करून त्या ठिकाणी एक ढाचा उभा केला. आणि हा ढाचा भारताच्या स्वातंत्र्यानंतरही तब्बल 75 वर्षाचा काळ लोटला तरी तो तिथे तसाच उभा होता. परंतु त्या ठिकाणी राम मंदिर होतं हे तर दूरच पण प्रत्यक्ष रामच नव्हते किंवा रामसेतू कधी बांधल्याच गेला नाही .अशा पद्धतीच्या वल्गना ठासून सांगितल्या गेल्या. हे या देशाचं दुर्दैव . या देशावर राज्य तर करायचं परंतु ह्या देशाच्या अस्मितेच्या प्रतीकांना मात्र पुन्हा नव्याने उभ राहू द्यायचं नाही . या देशाचा खरा इतिहास मात्र समोर येऊ द्यायचा नाही. यासाठी काही लोक अतिशय वरच्या पातळीवरून हे सगळे काम अतिशय शांत डोक्याने पूर्वनियोजित रित्या आजवर करत आले होते. परंतु एक गोष्ट मात्र सूर्यप्रकाशाच्या किरणा इतकी स्वच्छ आहे की, नेहमी सत्याचाच विजय होतो .आणि प्रभू श्रीराम म्हणजे सत्याचेच मूर्तीमंत उदाहरण होते . आणि म्हणून अखेर श्रीरामाच्याच सत्याचा विजय झाला.


काय गंमत आहे पहा . रामायण हे कधी घडलंच नाही , प्रभू श्रीराम नावाचं व्यक्तिमत्व अस्तित्वातच नव्हतं , रामसेतू हा कधी बांधल्याच गेला नाही, अयोध्या मध्ये रामाचा जन्मच झाला नाही , राम कोण ? या प्रश्नांना घेऊन किंवा हे मंदिरच उभे राहू नये म्हणून याच देशातल्या काही लोकांनी सत्तेचा गैरवापर करत रामाच्याच विरोधात अतिशय तज्ञ वकिलांची तगडा चांगला मोठा पैसा खर्च करून वकिलांची फौज च्या फौज निर्माण केली, उभी केली. जी थेट रामाच्या विरोधात न्यायालयामध्ये लढा देत होती. हा लढा कित्येक वर्ष चालला. शेवटी आपल्याला न्याय मिळत नाही हे लक्षात आल्यानंतर भारतातल्या काही लोकांनी थेट एकत्र येत कारसेवेच्या माध्यमातून थेट अयोध्या गाठली. आता लोक जागृत होत आहेत आणि लोकांना अडवणं कठीण होत चाललंय हे जेव्हा लक्षात आलं तेव्हा या कारसेवकांवर तत्कालीन राज्य सरकारने बेछूट गोळीबार केला, लाठीमार केला. आणि यांना तिथून पळवून लावलं . कारसेवक परत आले . पण आम्ही एकवटतोय आम्हाला आमच राम मंदिर हवय हा संदेश मात्र सरकारपर्यंत पोहोचवण्यात यशस्वी झाले. आणि पुढे जाऊन पुन्हा काही वर्षांनी पुन्हा एकदा भव्य कारसेवेच आयोजन करण्यात आलं . या कारसेवेच्या वेळेस मात्र तगडा पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आलेला असतानाही आणि अयोध्ये मध्ये लोकं पोहोचू नयेत यासाठी शंभर ते दीडशे किलोमीटर आधीच लोकांना त्यांच्या वाहनांतून उतरवून देण्यात आलं असलं तरीही , हजारो कार्यकर्ते पायी पायी जात अयोध्येला पोहोचले. आणि अखेर बाबराने निर्माण केलेला तो ढाचा उध्वस्त झाला . जय श्रीराम ,जय जय श्रीराम चे नारे आसमंतात दुमदुमले. लाठीमार, गोळीबार, अश्रुधुराच्या नळकांड्या फोडणे ह्या सगळ्या प्रकाराला कारसेवकांनी हसत हसत सहन केल. अनेक करसेवकांच बलिदान झालं , अनेकांनी स्वतःच्या प्राणांची आहुती दिली, रक्ताच्या थारोळ्यात कित्येक कारसेवक पडलेत , कित्येकांचे हातपाय तुटलेत, अपंगत्व आलं. परंतु ,अखेर बाबराने उभा केलेला तो ढाचा पाडण्यात कारसेवक यशस्वी झाले. " कारसेवकों का यह बलिदान याद रखेगा हिंदुस्तान " आशा घोषम दिल्या गेल्या आणि प्रभू श्रीराम मंदिराच्या निर्मितीचा मार्ग मोकळा होतोय असं कुठेतरी लोकांच्या दृष्टीस पडायला लागलं. परंतु हे मंदिर उभे राहू नये यासाठी न्यायालयीन लढाई सुरू झाली .आणि न्यायालयामध्ये कित्येक वर्ष हा खटला तसाच चालू ठेवायचा आणि मंदिर निर्माणच कार्य मात्र होऊ द्यायचं नाही . यासाठी सर्वतोपरी प्रयत्न काही पक्ष करत होते.

परंतु 2014 साली समस्त भारतीयांनी मतपेटीतून आपला कल दर्शवित नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वावर विश्वास व्यक्त करीत सत्ता बदल घडवून आणला . नरेंद्र मोदी हे देशाच्या पंतप्रधानपदी आरूढ झाले. आणि समस्त भारतीयांच्या मनामनामध्ये असलेलं राम मंदिराचे स्वप्न आतातरी पूर्ण होईल का ? असा प्रश्न पुन्हा एकदा जोर धरू लागला. पंतप्रधानांनीही जनभावना ओळखली आणि त्या दिशेने प्रयत्न सुरू केले. न्यायालयात कित्येक वर्ष अडखळून पडलेला हा लढा त्याला वेग दिला . प्रचंड वेगवान घडामोडी घडल्या . राम नावाचं कोणी व्यक्तीमत्व अस्तित्वातच नव्हतं यासाठी उभे झालेली वकिलांची फौज एका बाजूला तर प्रभू श्रीरामांच्या अस्तित्वाच्या पाऊलखुणा दाखविण्यासाठी संत, ऋषी, मुनी , महात्मे यांच्या साक्षीने त्यांच्या पूर्वजांनी केलेल्या लिखाणातून पुरावे घेत प्रभू श्रीरामांचे अस्तित्व दाखविणारी एक वेगळी वकिलांची टीम हा लढा सुद्धा याच देशांमध्ये आम्हाला पाहायला मिळाला हे या देशातील समस्त हिंदू बांधवांच दुर्दैव.

प्रभू श्रीराम म्हणजे आमच आराध्य दैवत ,प्रभू श्रीराम म्हणजे मर्यादा पुरुषोत्तम, प्रभू श्रीराम म्हणजे सत्याचा परम आदर्श, प्रभू श्रीराम म्हणजे वडिलांचा आज्ञाधारक पुत्र , प्रभू श्रीरामचंद्र म्हणजे वडिलांच्या वचना खातर तब्बल 14 वर्षाचा वनवास भोगणारे एक वचनी आज्ञाधारक पूत्र , प्रभू श्रीराम म्हणजे मायेचा लळा, प्रभू श्रीराम म्हणजे बंधू प्रेमाचे उदाहरण ,प्रभू श्रीराम म्हणजे राम राज्याचा सर्वेसर्वा , प्रभू श्री राम म्हणजे रावणाचा कर्दनकाळ, तर दुसऱ्या बाजूला प्रभू श्री रामचंद्र म्हणजे रावणाच्या लंकेतच वाढलेल्या बिभीषणाचे मित्र , प्रभू श्रीराम म्हणजे अहिल्येचा उद्धारक, प्रभू श्रीराम म्हणजे मैत्रीचा आदर्श , प्रभू श्रीराम म्हणजे संघटन कौशल्य , प्रभू श्री राम म्हणजे असत्यावर सत्याचा विजय मिळविणारे , प्रभू श्री राम म्हणजे समुद्रातही राम सेतू बांधणारे आणि म्हणूनच प्रभू श्री राम म्हणजे आमच्यासाठी आमचा आराध्य दैवत.

रामानंद सागर यांनी रामायणाच्या माध्यमातून घराघरात रामाला पोहोचवलं आणि म्हणून ही पिढी सुद्धा राममय झालेली. यासाठीच आम्हाला आमच्या प्रभू श्रीरामचंद्रांचं मंदिर त्यांच्याच अयोध्येमध्ये साकारलेलं पाहायचं होतं. कारण हे मंदिर म्हणजे आमची अस्मिता , हे मंदिर म्हणजे आमचा इतिहास आणि हे मंदिर म्हणजे आमची श्रद्धा , पराकोटीची श्रद्धा याचं उदाहरण आहे. हे मंदिर म्हणजे आमचा विजय आहे, हे मंदिर म्हणजे आमच्यावर आक्रमकानी केलेल्या आक्रमणाला आम्ही दिलेलं सडेतोड उत्तर आहे, हे मंदिर म्हणजे पुन्हा एकदा हिंदू समाज एकवटतो आहे, हे मंदिर म्हणजे हिंदूंचा विजय, हे मंदिर म्हणजे समस्त भारतीयांचा विजय, हे मंदिर म्हणजे एक नवा इतिहास आणि म्हणून या मंदिराच्या प्राणप्रतिष्ठेने आम्हाला हा नवा इतिहास घडलेला पाहायला मिळतोय. आणि हे सर्व आम्ही या डोळ्यांनी पाहतोय याचा आम्हाला सार्थ अभिमान आहे .म्हणून हे राम मंदिर निर्माण होणं हे आमच्यासाठी आवश्यक होत. आणि देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी त्यांच्या कार्यकाळामध्ये हे मंदिर निर्माण करण्यासाठी अतिशय मोलाचे योगदान दिलं. त्यासाठी समस्त भारतीयांच्या वतीने देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी, या राम मंदिराच्या निर्मितीमध्ये अडथळा आणणाऱ्यांना न्यायालयीन प्रक्रियेद्वारे सडेतोड उत्तर देत रामाचं अस्तित्व सिद्ध करणारे सर्व वकील बांधव आणि आता हे मंदिर निर्माण करण्यासाठी ज्या लाखो लाखो श्रमिकांनी , भाविकांनी हे मंदिर स्वतःच्या हाताने निर्माण केलं त्या सर्व कारागीर, आणि हे मंदिर निर्माण व्हावं यासाठी अयोध्येच्या राम मंदिर ट्रस्टने देणगी मागितल्यानंतर अपेक्षित देणगीच्या कितीतरी जास्त पटीने सढळ हाताने मदत करून ह्या राम मंदिराला निर्माण करण्यासाठी देणगी देणाऱ्या शेकडो हाताना मनःपूर्वक रामराम . राम मंदिर निर्माण होत असतांना आणि समस्त भारतीयांच्या मनामध्ये आनंदाचे वातावरण निर्माण होत असतांना माझ्याहातून राम नामाची ही शब्दसेवा घडावी हे माझंही भाग्यच.

जय श्रीराम, जय जय श्री राम.



## "स्वानंदी शिक्षण"

आलं स्वानंदी शिक्षण
चला घेऊ प्रशिक्षण
मन करिता एकाग्र
येईल आनंदाचा क्षण

"येता सजगतेची जाण
जातो विचारांचा ताण
वर्तमानाच्या भानाने
वाढवू माणुसकीची शान

करु असे कथाकथन
जाणून घेता येईल मन
कल्पनाशक्तीच्या साथीने
वास्तववादी निरीक्षण

कृतीशील उपक्रम
हाच आपुला आता सण
घेता नित्य कार्यक्रम
अनुभवाचे वाढेल धन " ॥४॥

असो कोणीही व्यक्ती
भावनेचे फुलवू बन
शक्ती आणि युक्तीने
वेचू ज्ञानाचे हो कण" ॥५॥

सौ. स्मिता विरेंद्र गायकवाड

## उभा रानात

आज उभा रानात
खारीच्या वावरात
बाप राजाचे शेत
डोले मोठे थाटामाटात
डोले रान ज्वारीचे
उभा हरभऱ्यात
खातो टहाळ जोमात
चव त्याची भारी
लागे न्यारी न्यारी.

काळ्या आईचं हे दान...
कसं फेडू सांग
या मातीचे ऋण.....!!!

ॲड. कृष्णा पाटील जाधव
कन्नड मो.९४२२७१६६३७



## गुलमोहर

कधीतरी केंव्हातरी
मैत्रीच्या प्रेमाने भारावलेली,
मैत्रीची साक्ष देणारी
निर्माल्यतली ती पाकळी
अजून तिथेच असेल का?

नवे रूप घेऊन बहरलेल्या
झाडांच्या कळीच्या रूपात
हिरव्यागार पानांच्या आडून
डोकावताना दिसेल का?

की मग फुलाच्या त्या
पाकळ्या पाकळ्यातून पुन्हा
नव्याने भेटण्यासाठी अलगद
फांदीवरून घसरून पायाशी
येऊन भेटीसाठी आसुसलेली
असेल का?
सौ. वैशाली इंदुमती जाधव
-महाडिक.
मो. -९७६७४३७९२३



## वाटे मनास माझ्या

वाटे मनास माझ्या
आंनदी जीवन जगावे
इतरांना आनंद देऊन
त्यांच्या चेहऱ्यावर हास्य फुलवावे

वाटे मनास माझ्या
पुस्तक वाचन करावे
ज्ञान संपादन करुन
इतरांनाही ज्ञान वाटावे

वाटे मनास माझ्या
संघर्षाच्या वाटेवर चालावे
प्रेरणा त्याच्यातून घेऊन
इतरांना प्रोत्साहन द्यावे

वाटे मनास माझ्या
परखड, सत्य लिहावे
अन्यायाला वाचा फोडून
साहित्य वारी पूर्ण करावे

वाटे मनास माझ्या
दु:ख,छळ,निंदा,सहन करावे
तयांचे आभार मानून
हसत, हसत डोळे मिटावे

सौ.संगीता संतोष ठलाल
मु.कुरखेडा जि.गडचिरोली
७८२१८१६४८५

## पाखरांनो

आता रानात दिसतात
पाखरं
ज्वारीच्या कणसाला
अलगद खाणारे
इकडून तिकडे भुर्रकन
उडणारे
पण ते नावापुरतेच..

कारण हिरव्या पिकात
दिसत नाही त्यांना
काळया मातीत राबणारा
हिरवा पांडुरंग..
जग पोशिंदा.. बाप माझा.

की तो सांगत होता,
'हर दाने पे लिखा है
खानेवाले का नाम'..

'घ्या तुम्ही भी खाऊन
तुमच्या वाटयाचं
कुठं झोळी घेऊन
आलात रे पाखरांनो'.

म्हणून की काय
पाखरं ही प्रेम करत नाही
पूर्वीसारखी.. त्या शेत-
शिवारावर.

कधी काळी तिथंच
बांधली होती त्यांनी घरटी
चिल्यापिल्ल्यासाठी.

ती रुसलीय बहुतेक
या अवकाळी ऋतूच्या हंगामात
बेमोसमी पावसावर
अन् माझ्यासारख्या
बांधावरच्या शेतकऱ्यावर.

ज्ञानेश्वर गायके खामगांव
कन्नड.मो.९४०३३८४८८९



## !! आयुष्याची गाडी !!

हळुहळू चालवा ही आयुष्याची गाडी।
अजून बरीच सोडवायचीत हो कोडी॥
काही दुखणी व्हायची बरी।
काही कामे करायची पुरी॥
काहींना सोसवेना धडाका।
उडाला हो रागाचा भडका॥
आहेरे नाहीरे समीप आणायचे आहेत।
काही इच्छा अजूनही अपूर्ण आहेत॥
दबलेल्या इच्छा दफनायच्या आहेत।
अनेक कर्जे अजून भरायची आहेत॥
काही दूर गेली काही मागे पडली।
काही नाती बनली आणि तुटली॥
त्या तुटलेल्या नात्यांमधल्या।
जखमा भरायच्या राहिल्या॥
काही सहभागींना मी डावलले।
तर काहींचे मन मी दुखावले ॥
आसू पुसायला कोणीच नाही।
आता जनता दुधखुळी नाही॥
यासाठीच मला काम करायचे।
आता तु माझ्या साथीला यायचे ॥
या श्वासावर तुझाच अधिकार।
आता तरी समजून घ्या सरकार ॥
हा जीव या ऋणातून मुक्त करावा ।
म्हणून आयुष्याची गाडी हळू चालवा॥
रचनाकार :आहेर वा.र.
बी.ई.एम.आय.ई.बी.ओ.ई
नाशिक
मो.९९५८७८२९८२

## मकरसंक्रांती

तिळाची उष्णता, गोडवा गुळाचा
कुट खुसखुशीत, खमंग, शेंगदाण्याचा

गोड भाव मनी, नको बोली फक्त
वर्षाचा पहिला, सण मकर संक्रांत

विसरून जाऊ, कालची कटुता
सर्वधर्मसमभाव, नांदावी एकता

तिळगुळ खाऊ, एकमेका देऊ
सारे मिळून, गाणं एकात्मता गाऊ

सण हा सौख्याचा, नसावी दंगल
कृतीत साऱ्यांच्या, असावे मंगल

भरडून आज, जात-पात दाणं
खणाणावं ठोस, मानवता नाणं

उडवा पतंग, करा द्वेष-राग दूर
मानवतेचा तुम्ही, हाती ठेवा दोर
- कल्पना मापूसकर
मीरारोड, ठाणे



## कर्ज....

साधीच ती तरीही चढत्या दरात आली
कर्जात काढलेली माझी वरात आली

ऐपत नसून सुध्दा हफ्ते भरून काहीं
वस्तू महागडी ती माझ्या घरात आली

वसुली करावयाला बेफाम सोडलेले
चावून फाडती कां? धस्की उरात आली

तेजीत काढती ते दडवून साठलेले
बाजारपेठ त्यांची पुन्हा भरात आली

कुजक्या बनावटीला खोके बहुत भारी
बघ जाहिरात त्यांची ताला सुरात आली

नाही कधी निघाले चिठ्ठीत नावं माझे
व्याजा मधे तशी ही भरली परात आली

मिळकत असून थोडी संसार वाढला हा
ती पावती अखेरी भिजल्या स्वरात आली
© बलराज संघई
9420015108



## संक्रांतीचा सण

आला संक्रांतीचा सण,
सौख्य आणि मांगल्याचा
एका सुवासिनी साठी,
कितीं -कितीं जिव्हाळ्याचा..१

हळदी कुंकवाचा पडे,
सडा पहाटे अंगणी
तुळशी वृंदावना पुढे,
शोभे छानशी रांगोळी
वाणवसा सौभाग्याचा,
जन्मोंजन्मीं जपायाचा...२
आला संक्रांतीचा सण...

आज भोगीच्या दिवशी,
भाजी बारा मिसळीची
तीळ लावूनिया केली,
भाकरी ती बाजरीची
बेत अस्सल मराठी,
केला -केला जेवणाचा... ३
आला संक्रांतीचा सण...

तिळ,गुळ ,शेंगदाणे,
त्याचे लाडू आज करु
करू सुगड्यांची पूजा,
ओटी वाणाने गं भरू
शेंगा, बोर,नी गाजरं,
रानमेवा चाखायचा..४.
आला संक्रांतीचा सण...

पोळी मऊ पुरणाची,
धार त्यावरी तुपाची
आता दाखवा नैवेद्य,
आज मानं सुगड्यचा
कढी, भजे नी कुरड्या,
घ्या स्वाद भोजनाचा...५
आला संक्रांतीचा सण...

कुठे शालू गं रेशमी,
कुठे दिसे नऊवारं
साजं लेवून सौभाग्याचा,
पहां सजली हो नारं
नाद किन-कीन येई,
हाती हिरव्या चुड्याचा...६
आला संक्रांतीचा सण...

कुंकू रेखीव कपाळीं,
पायी जोडवे शोभती
गळ्यातले काळे मनी,
जिवाभावाचे सोबती
गंध दरवळला गं
माळलेल्या गजऱ्याचा...७
आला संक्रांतीचा सण...

कानी घातले झुमके,
भरला गुलाल भांगात
छुन -छुन छनकती कसे,
तिच्या पैंजण पायात
कसा शोभतोय तिला,
तोरा नाकाचा नथींचा...८
आला संक्रांतीचा सण...

राहो अखंड असेच,
कुंकू माझ्या कपाळीचे
दे गं माय रखुमाई,
दान मला सौभाग्याचे
येवो बहरूनी वेल,
त्याच्या -माझ्या संसाराचा...९
आला संक्रांतीचा सण...

घ्यारे सारे तिळगुळ,
आता गोड -गोड बोला
काही दुसरा हो जन्म,
या जगी माणसाला
क्षण हाच आहे जणू,
एकोप्याने नांदण्याचा...१०
आला संक्रांतीचा सण...
- सौ.शारदा श्रीकृष्ण
वानखेडे-चोपडे
परभणी. ९८२३०६६६०६

## सुगंध प्रेमाचा

असाच यावा सुगंध प्रेमाचा
देई दरवळ जो
सदैव सुखाचा ।। ध्रु।।
बहर फुलांचा सदैव असावा
मनमोर तो आनंदे नाचावा
सहवास सुखाचा
सदैव असावा
सकल जीवनी
आनंद फुलावा ।। १ ।।
असाच यावा सुगंध प्रेमाचा
हासत खेळत जीवन फुलते
जीवनबाग ही बहरून जाते
हर्षूनी जाऊनी मनही गाते
या जीवनाचे अवीट नाते
।। २ ।।
असाच यावा सुगंध प्रेमाचा
बहरूनी याव्या कळ्या
फुलांच्या
संपूनी जाव्या व्यथा
मनामनांच्या
आनंद फुलावा नयनी जनांच्या
सुखसोहळा बहरावा जीवनी
त्यांच्या ।।३।।
असाच यावा सुगंध प्रेमाचा
गीतरचना: मधुकर ए.
निलेगावकर
९४२१३७५६९१



## ओढ

संघर्ष अनंत ह्या आयुष्याचा,
अबोल शब्द ही जणू बोलली.
थकला हा देह थिजूनी कष्टांनी,
पांडुरंगा अंतर्मनी तुझी ओढ
लागली "
'धन संपत्तीचा मोल जिथे
शून्य ,
श्रद्धेचे पारडे असे इथे न्यारी.
वर्षोनुवर्षे वारी तुझी भक्तांस
ही अशी
ओढ लावते चालण्यास
भक्तीच्या वाटेवरी...!!"

- तुषार राजेश लाखे.
- वरोरा जिल्हा चंद्रपूर

## गंध

कुणाच्या येण्यानं मनं झालं हे
घायाळं न कळे या मनाला कुठे
हरलं हे भान

नसूनी घरातं का? शोधते
आरशातं आरशांच्या
आडोशाला हसला गालातं

मन हे मोकाट सुटलयां
जोरातं नाही उरला त्यांसी
कोणताहीबांध

मनांच्याबाधांवरी फुलले
सोन्यांचे कमळ त्या कमळाला
आलायं जाई-जुईचा गंध

गंध दरवळला आसमंती दाही
ददशांनी केलीयां गती

- कोमल जगताप





प्रा. डॉ. विठ्ठल जायभाये
संपर्क क्र. 9158064068

# तुका म्हणे काय छायेचा अभिलासे । हंस पावे नाश तारागणीं ॥

आधुनिक केसरी

**भूतकाळ हा जुन्या पडक्या किल्ल्यासारखा मोठा अद्भुत असतो. ज्याप्रमाणे जुना किल्ला खोदला तर तिथे दगड धोंडे आणि काही अवशेष मिळतात. त्याचबरोबर त्या किल्ल्यात जडजवाहीर सुद्धा सापडतात. त्यासाठी आपण प्रत्येकाने एकदा तरी जुन्या किल्ल्यात जाऊन आलेच पाहिजे. तिथे मोहरा भेटतील म्हणून नाही; तर आपला भूतकाळ किती भयंकर होता आणि त्यातील आज काहीच शिल्लक नाही! हा विचार करण्यासाठी त्या किल्ल्यात एकदा तरी फेरफटका मारायलाच हवा आणि तिथे फेरफटका मारल्यावर आपण वर्तमानात स्थिर होतो. एवढे लिहिण्याचे कारण म्हणजे सर्वच महापुरुषांचे जीवन, त्याग, त्यांनी केलेले देदीप्यमान कार्य आणि तत्पश्चात आपण करत असलेलो विचार हे सगळेच मोठे विलक्षण आहे. त्या सर्वच लोकांचे आज काय शिल्लक आहे? संपत्ती? संतती? सात बाराचे उतारे? घरे-दारे-महाल? अं हं! आत्ता हे काहीच शिल्लक नाही, शिल्लक आहे तो त्यांचा अवशेष इतिहास आणि महान विचारवंतांचे लेखन-विचार!**

याच अनुषंगाने संत तुकाराम महाराज आणि त्यांनी लिहिलेले अजरामर अभंग वाङ्मय हे आपल्याला नित्य नित्य पथदर्शी होत आहे. खऱ्या अर्थाने संकटेच माणसांना जीवन समजावून देतात. संकटांचा मुकाबला करता करता माणूस वज्रासारखा अचळ बनतो. एका एका घावाने तप्त लोखंड जसे आणखीनच मजबूत आणि अभेद्य बनते तसे माणसाचे जीवन बनत जाते. कमी वयात हिमालयाएवढी आलेली संकटे तुकोबांना खूप काही शिकवून गेली. त्यांच्यातील दडून बसलेला चिंतनशील माणूस, विचारवंत लेखक आणि समाजोद्धारक कीर्तनकार जागा झाला, जो तुमच्या माझ्यामध्ये सुप्त अवस्थेत आजही आहे आणि जर तो आपण बाहेर काढला नाही तर त्याचा तुमच्याबरोबर नक्की मृत्यु होणार आहे. त्यासाठी प्रत्येकाने आपल्यातील एक लेखक, चिंतनशील माणूस बाहेर काढण्यासाठी मोठ्या कसोशीने प्रयत्न केले पाहिजेत. असे करतांना आपल्याला सखोल चिंतन करत करत आपला वर्तमान आणि भोवताल जागृत करावा लागेल. याच्या जोडीला भूतकाळातील महान माणसांच्या लेखन-विचारांची जोड द्यावीच लागेल. असे लिहिण्याचे कारण म्हणजे मी विविध ग्रंथांच्या सोबतीने संतश्रेष्ठ तुकोबांच्या अभंग-गाथा-जीवनाबरोबर राहतोय. त्यातूनच त्यांच्या **मज पाहातां हें लटिकें सकळ । कोठें मायाजाळ दावीं देवा ॥१॥**
**कोणाचा कोणासीं न धरे संबंध । आहे शुद्धबुद्ध ठायींचे ठायीं ॥ध्रु.॥ काढा जी मोह बुंथी जाळे । नका लावूं बळें वेड आम्हां ॥२॥ जीव शिव कांही ठेवियेलीं नांवें । सत्य तुम्हां ठावें असोनियां ॥३॥ सेवेच्या अभिलासें न धराचि विचार । आम्हां दारोदार हिंडविलें ॥४॥ आहे तैसें आतां कळलियावरी । परतें सांडा दुरी दुजेपण ॥५॥**
**तुका म्हणे काय छायेचा अभिलासे । हंस पावे नाश तारागणीं ॥६॥** (१२१५) अशा चिंतनशील अभगांची भेट होत आहे. आपण परम भाग्यवान आहोत, कारण आपल्या भाषेत आपलं सगळं जगणं तुकोबा आपल्या मराठीत लिहितात. तुकोबांचे अभंग समजून घेण्यासाठी एखाद्या शब्दकोशाची गरज भासत नाही. त्यांचे अभंग समजून घ्यायचे असतील तर मनाचे कोश उघडावे लागतील. मनाचे कोश उघडल्यास आपल्याला जगातील अनंत अनाकलनीय गोष्टी ज्ञात होतील यात तिळमात्र शंका नाही. इतर अभंगांप्रमाणे प्रस्तुत अभंग अत्यंत बोलका आणि चिंतनशील आहे. तुकोबांना आपला भोवताल लटका म्हणजे खोटा वाटतोय. डोळ्यासमोर आपल्या आई-वडील, पत्नी, मुलगा, गुरे-ढोरे यांचे मुडदे उठतांना पाहिले होते. त्यामुळे हा सर्व मायाजाळ किती खोटा, लटका आहे? याची प्रतीती त्यांना आली होती. त्यामुळे आपण एकमेकांचे संबंध किती दृढ आहेत? हे दाखवण्याचा प्रयत्न करतो, परंतु तो संबंध किती क्षणिक आहे? याची जाण आणि भान स्वानुभवातून तुकोबांना आले होते. त्यामुळे इथे कुणाचा कुणाशी काहीही संबंध नसून सर्वकाही जिथले तिथे आहे. इथे तुकोबा प्रत्यक्ष देवाशी संवाद साधतांना भोवतालचे जाळे हे मोहाचे असून यात आपण स्वतः गुंतून राहू नये असा स्वसंवाद ते साधतांना आपल्यालाही जागे करतात. जीव-शिव यांचा ऐक्य भाव म्हणजे तरी काय? आपण आपल्याशी साधलेला संवाद म्हणजेच जीवा-शिवाचा संबंध! तो संवाद-संबंध म्हणजेच जीवनाचे अंतिम सत्य! त्यापुढे जाऊन तुकोबाराय देवाची सेवा ही दारोदार जाऊन करावयाची असते, असे सांगतात. त्यातून पुन्हा पुण्य कमाविण्याची अभिलाषा मनात उत्पन्न होते. त्यामुळे माणूस आणखी जास्तच धावपळ करतो, परंतु ते सगळे काही व्यर्थ आहे! असे शेवटी कळते. हे सगळे त्यांना कळल्यावर त्यांचे त्यांनाच आणि आपले आपल्याला हसू आल्याशिवाय राहणार नाही. त्यातून आपले दुजेपण म्हणजेच वेगळेपण सांडणे म्हणजेच सोडणे अवघड होऊन जाते. असे झाल्यानंतर आपण केलेला अट्टाहास वाया गेला हे कळते. तेंव्हा तुकोबा शेवटी एखादा हंस जसा खरा आणि खोटा मोती यातील भेद जाणतो, तो पाण्यातील प्रतिबिंब पाहून त्याला मोती मानत नाही आणि तसे झाले तर हंसाचे हंसतत्व अबाधित राहणार नाही. असा शेवटी हंसाचा दृष्टांत देऊन तुकोबाराय आपला कार्यभाग साधण्याचा प्रयत्न करतात. माणसाने खरे-खोटे हे वेळीच समजून घेऊन सावध राहायला हवे. आपली सावधानता आपल्या जीवनात रोजच पथदर्शी ठरत जाने गरजेचे आहे. देवाशी प्रत्यक्ष संवाद साधण्याचा हा तुकोबांचा अभंग मोठा चमत्कारिक आहे. त्यांची भक्ती ही डोळस भक्ती आहे. देवाशी संवाद साधतांना देव माणसाला कसा मृगजळाच्या पाठीमागे धावायला मजबूर करतो? माणसांना मोह पाशात कसा अडकवत जातो? जे खोटे आहे तेच खरे मानायला भाग पाडतो. असा आपल्यात आभासी तत्वाने असणारी दिव्यत्वाची प्रतीती किती मजेशीर आहे? हे लक्षात घ्यायला हवे. त्यासाठी हा अभंग मोठा मजेशीर आहे. एकीकडे देव देव करताना तुकोबाराय आपल्यातील देव दाखवण्याचा चमत्कार करतात. खरा देव कुठे आणि काय आहे? हे महत्वाचे आहे. तीच बाब इथे आपल्याला वारंवार दिसत जाते. काल-आज-उद्या माणसाला आपले खरे रूप जाणणे काळाची गरज बनली आहे. माणूस आपल्या जीवनातील एकएक अनमोल क्षण व्यर्थ चिंता करून वाया घालवत आहे. योग्य गोष्टींचे चिंतन करून आपला वर्तमान कसा आनंदी राहील? याचा विचार करावा लागेल. जगद्गुरू संत तुकाराम महाराजांचे जीवन-लेखन-कीर्तन आपल्यासाठी नित्य पथदर्शी आहे. तुकाराम नीतीच्या माध्यमातून आपण एक एक अभंग बारकाईने पाहिल्यानंतर आपल्याला

**तुकारामनीती**
**भाग -७६**



तुकोबांची आणि त्या अनुषंगाने आपल्या जीवनाची प्रतीती यायला लागते. त्यांचे ते आपले संसारिक जीवन असले तरी ते वेळीच सावध होऊन जीवनाला समजून घेऊ शकले आणि आपणही त्यांचा गाथा वाचून सावध व्हायला हेवे. असे झाल्यास त्यांनी लिहिलेले सावधानतेचे अभंग आपल्या जीवनाला योग्य मार्ग दाखवतील. वर्तमानात आपल्या भोवताल साधनाची गर्दी झाली आहे. त्यावर बाजारातील अनेक साधनं आपल्याला खुणावत आहेत. बाजारातील झगमग काचेच्या दुकानातील त्यांचं अस्तित्व आपल्याला भुरळ पाडतंय! असं असतांना त्यातील एखादी वस्तू घरी आणण्याचा मोह अनावर होतोय. त्या वस्तूची निगराणी करण्यासाठी आपण आपला अनमोल वेळ खर्ची घालतोय. असे असतांना आपण मात्र आपली मूळ साधना विसरून जातोय का? माणूस वस्तू जमवायच्या नादात आपल्या अनमोल शरीर वस्तूचे महत्व हरवून बसलाय का? आनंदाने तीन वेळा मस्तीत जेवण करणारा आणि रात्री अंथरूणावर अंग टाकल्याबरोबर डोळा लागणारा माणूस दुर्मिळ झालाय का? असे एक ना अनेक प्रश्न नेहमी सतावत असतात. आज सर्वत्र प्रार्थनास्थळी देवाचा शोध घेणे सुरु असतांना भोवताल शेकडो अन्न-वस्त्र-निवाऱ्याच्या शोधातील देव पाहून मन व्यथित झाल्याशिवाय रहात नाही! बाबा आमटे, मदर तेरेसा, सिंधुताई सपकाळ आदींना सापडलेला देव प्रार्थना स्थळात देव शोधणाऱ्याना दिसत नसेल काय? असा प्रश्न सतत पडत असतो. सगळीकडे सर्वच धर्माच्या लोकांकडून देवाच्या नावाने चालवलेला टाहो इथल्या भुकेल्यांची भूक शमवू शकेल काय? स्वातंत्र्याच्या पंचाहत्तर वर्षानंतरसुद्धा इथली भेदाभेदाची उतरंड पाडू शकेल काय? माणसासारखा दिसणारा माणूस सर्वांना सारखा दिसून इथली दृष्टी स्वच्छ करू शकेल काय? असे एक ना अनेक प्रश्न मनाला सतावून सोडतात. त्यात तुकोबांचा एखादा अभंग येतो आणि सहारा बनतो. एक एक शब्द पुन्हा उद्याच्या आशादायी पहाटेचे स्वप्न दाखवतात. उद्याची अशाही माणसाला दुखी करत असते म्हणून केवळ आजचा चालणारा श्वासच केवळ खरा मानून थांबतो! काय करणार? पोटार्थी माणसं क्रांती करू शकत नाहीत! जय तुकोबाराय!

**(टीपः लेखक हे व्याख्याता, कवी, किर्तनकार, समीक्षक, योग-प्राणायाम प्रशिक्षक आहेत.)**



किरणकुमार आवारे
संपर्क क्र. 9423086021

# सर्वच दूध उत्पादकांना मिळणार ५ रुपये प्रतिलिटर अनुदान

आधुनिक केसरी

**सहकारी दूध संघ व खाजगी दुध प्रकल्पांमार्फत दुध उत्पादक शेतकरी यांना ३.५ फॅट ८.५ एसएनएफ या गुण प्रतिकरीता किमान २७ रुपये प्रति लिटर इतका दर संबंधित दुध उत्पादक शेतकऱ्याच्या वैयक्तिक बँक खात्यावर रोख विरहीत पध्दतीने (ऑनलाईन) देणे बंधनकारक राहील. तद्नंतर, शेतकऱ्यांना शासनामार्फत ५ रुपये प्रतिलिटर बँक खात्यांवर थेट वर्ग (डीबीटी) करण्यात येईल. नोव्हेंबर २०२३ मधील आकडेवारीनुसार सहकारी दूध संघ व खाजगी दुध प्रकल्पांमार्फत होणारे दुध संकलन १४९ लाख लिटर प्रतिदिन इतके आहे.**

प्रस्तावित रू.५/- प्रतिलिटर अनुदानप्रमाणे एक महिन्याच्या कालावधीकरीता अंदाजित रू.२३० कोटी इतके अनुदान आवश्यक राहील. **पीक विमा ९ हजार बनावट अर्ज :**तथापि प्रत्यक्ष होणाऱ्या दुध संकलनातील घट वा वाढ यानुसार उपरोक्त रकमेत बदल होण्याची शक्यता आहे. योजना दि.११ जानेवारी २०२४ ते १० फेब्रुवारी २०२४ या कालावधीकरीता राबविण्यात येईल. **राष्ट्रीय कृषी विकास :** राज्यात राष्ट्रीय कृषी विकास योजनेंतर्गत प्रती थेंब व अधिक पीक ही सूक्ष्म सिंचन योजना राबविण्यात येत आहे. यामध्ये केंद्र सरकारचा ६० टक्के आणि राज्य शासनाचा ४० टक्के हिस्सा असतो. राज्यातील ३४ जिल्ह्यांमध्ये ही योजना राबविण्यात येत आहे. ठिबक व तुषार संच उभारणीसाठी अल्प व अत्यल्प भूधारक शेतकऱ्यांना ५५ टक्के तर इतर शेतकऱ्यांना ४५ टक्के अनुदान ५ हेक्टर क्षेत्राच्या मर्यादेत देण्यात येते. सन २०२२-२३ मध्ये या योजनेसाठी एकूण रु.५५६.६६ कोटी निधी उपलब्ध झाला. या निधीमधून सन २०२१-२२ मधील प्रलंबित लाभार्थ्यांकरिता व सन २०२२-२३ मधील महाडीबीटी पोर्टलवर निवड झालेले व अनुदानास पात्र २ लाख २२ हजार २२५ लाभार्थ्यांना रु ५५६.६६ कोटी अनुदान वितरित करण्यात आले आहे. सन २०२२-२३ मध्ये एकूण १.३९ लाख हेक्टर क्षेत्रावर सूक्ष्म सिंचनाचा लाभ देण्यात आला आहे. सन २०२३-२४ साठी रु ५०९.९९ कोटी रकमेचा वार्षिक कृती आराखडा मंजूर करण्यात आला आहे. यापैकी रु. १०२ .०८ कोटी निधी प्राप्त झाला असून सन २०२२-२३ मधील प्रलंबित आणि सन २०२३- २४ महाडीबीटी पोर्टलवर निवड झालेले व अनूदानास पात्र ३२ हजार १८६ लाभार्थ्यांना रु. ८०.६१ कोटी अनुदान वितरीत करण्यात आले आहे. उर्वरित अनुदान वितरीत करण्याची कार्यवाही क्षेत्रीय स्तरावर सुरु आहे. मुख्यमंत्री शाश्वत कृषी सिंचन योजना :- राष्ट्रीय कृषी विकास योजना प्रती थेंब अधिक पीक अंतर्गत देय अनुदानास राज्य शासनाकडून मुख्यमंत्री शाश्वत कृषी सिंचन योजनेमधून अल्प व अत्यल्प भुधारक शेतकऱ्यांना २५ टक्के



आणि इतर शेतकऱ्यांना ३० टक्के पूरक अनुदान देऊन सूक्ष्म सिंचनासाठी अनुक्रमे ८० टक्के व ७५ टक्के एकूण अनुदान देण्यात येत आहे. सन २०२१-२२,२०२२-२३ व २०२३-२४ मधील लाभार्थ्यांना पूरक अनुदान देण्याकरिता राज्य शासनाकडून रु. ४६४ कोटी निधी प्राप्त झाला. यातून पात्र ३ लाख १४ हजार २५२ लाभार्थ्यांना रु.४१८.७३ कोटी पूरक अनुदान देण्यात आले. **अटल भूजल योजना :** ही योजना १३ जिल्ह्यातील ४२ तालुक्यातील १३३९ ग्रामपंचायती मधील १४४० गावांमध्ये केंद्र शासन व जागतिक बॅक यांच्या अर्थसहाय्याने पाच वर्षांच्या कालावधीत राबविण्यात येत आहे. या योजनेंतर्गत अल्प व अत्यल्प भूधारक आणि इतर शेतकऱ्यांना सूक्ष्म सिंचनासाठी अनुक्रमे २५ टक्के आणि ३० टक्के पूरक अनुदान देण्यात येत आहे. **कांद्याची भुकटी करण्याचा प्रकल्प :** कांदा निर्यातीबाबतच्या धोरणात फेरबदल केल्यानंतर कांदा उत्पादक शेतकऱ्यांना नुकसान सहन करावे लागते. काही वेळेस शेतकरी कांदा फेकून देतात. त्यामुळे नाशिक जिल्ह्यात शेतकरी उत्पादक कंपनीकडून डिहायड्रेशन प्रोजेक्ट केल्यास कांद्याची भुकटी करून शेतकऱ्यांना लाभ मिळू शकतो. हा प्रकल्प नाशिक जिल्ह्यातील शेतकऱ्यांचा जनहिताचा असल्यामुळे या प्रकल्पाला स्मार्ट योजनेतून ६० टक्के ऐवजी ९० टक्के पर्यंत अनुदान देण्यासाठी जागतिक बँकेकडे स्वतंत्र प्रस्ताव सादर करण्याचे आदेश कृषीमंत्री धंनजय मुंडे यांनी दिले. नाशिक जिल्ह्यात पिकणाऱ्या द्राक्षाची मोठ्या प्रमाणात निर्यात होते. मात्र, फूड टेस्टिंग लॅबोरेटरी पुरेशा प्रमाणात उपलब्ध नसल्यामुळे अनेक वेळा शेतकऱ्यांना निर्यातीच्या अटींची पूर्तता करता येत नाही. त्यामुळे नाशिक जिल्ह्यात फूड टेस्टिंग लॅबोरेटरी उभारण्यासाठी सुद्धा स्मार्ट योजनेतून अनुदान उपलब्ध करून देण्याचा प्रस्ताव जागतिक बँकेकडे सादर करण्याचे आदेशही कृषिमंत्री श्री. मुंडे यांनी दिले. पीक विमा अर्ज दाखल करण्यासाठी सुविधा केंद्र चालकांना प्रत्येक अर्जामागे चाळीस रुपये अनुदान देण्यात आले. या केंद्र चालकांनी सुमारे ९ हजार बनावट अर्ज दाखल करत ४८ हजार हेक्टर क्षेत्राचा पीक विमा उतरल्याचे उघड झाले आहे. यापैकी ११ सुविधा केंद्रांना टाळे ठोकण्यात आले असून त्यापैकी १० केंद्रे ही मराठवाड्यातील आहेत. बनावट अर्ज बाद केल्याने राज्य सरकारचा ३८ कोटींचा विमा हप्ता वाचला आहे. यंदा एक रुपयात प्रधानमंत्री खरीप पीक विमा योजनेस शेतकऱ्यांनी भरभरून प्रतिसाद देत तब्बल १ कोटी ७० लाख अर्जाद्वारे १ कोटी १३ लाख हेक्टरवरील पिकांचा विमा उतरवला. अर्ज भरण्यासाठी सामायिक सुविधा केंद्रांना परवानगी देण्यात आली होती. त्यासाठी प्रत्येक अर्जामागे या केंद्रांना चाळीस रुपयांचे अनुदान राज्य सरकारने दिले आहे. मात्र, जादा अनुदान लाटण्यासाठी या केंद्रचालकांनी काही कंपन्यांच्या सांगण्यावरून बनावट अर्ज दाखल केल्याचे कृषी विभागाच्या पडताळणीत उघड झाले आहे.

# लैंगिक समस्या निदान व उपचार

आधुनिक केसरी

नमस्कार! मी डॉ. विजय दहिफळे 'सुखी जीवनाचा मंत्र' या माझ्या पुस्तकावर आधारित साप्ताहिक सदरात तुम्हा सर्वांचं अगदी मनापासून स्वागत करतो. गेल्या अनेक दिवसांपासून आपण टीव्ही, सोशल मीडिया या माध्यमांमधून भेटत आहोतच, पण आता आपण दर रविवारी दैनिक आधुनिक केसरी मधून भेटत राहणार आहोत. माझ्या गेल्या २०-२५ वर्षांच्या कारकीर्दीमध्ये मला आलेले अनुभव, मला भेटलेली माणसं, वेगवेगळ्या रूपात समोर येणाऱ्या गंभीर लैंगिक समस्या या सर्व गोष्टींचा ऊहापोह मी या सदरातून करणार आहे.

सेक्स आणि आहार (भाग 1) : अनेक रुग्णांशी त्यांच्या आहाराबद्दल नेहमीच बोलणे होत असते.





आहार म्हणजेच आपलं नेहमीचं अन्न आपल्या लैंगिक आयुष्यावर परिणाम करीत असतं. अनेक रुग्णांच्या बाबतीमध्ये मला हा फरक प्रकर्षानं जाणवला. सर्वात महत्त्वाचं म्हणजे खाण्यापिण्याच्या वेळा निश्चित नसणं, ऋतुनुसार योग्य त्या अन्नाचं सेवन नं करणं, खाण्यावर अंकुश नसणं अशा अनेक गोष्टी त्यात होत्या. लैंगिक कठोरतेसाठी तसेच शुक्राणूंच्या हालचालीसाठी आहार हा एक महत्त्वाचा भाग आहे हे आधी आपण सर्वांनी लक्षात घ्यायला हवं. आता आपण क्रमशः पाहूया की, कशा पद्धतीने आहार असायला हवा? आणि काय खाल्ल्यानं काय होतं? - स्पायनॅच (पालक) - पालकमध्ये 'मॅग्नेशियम' मुबलक प्रमाणात असते. ज्यामुळे रक्तवाहिन्यांचा दाह कमी होतो व रक्त पुरवठा वाढतो. कंबरेच्या खालच्या भागात रक्तपुरवठा वाढतो, उत्तेजना वाढते आणि आनंददायक क्रियेचा आनंद आपण घेऊ शकतो. पालकमध्ये "फोलेट" हे सुद्धा मुबलक प्रमाणात असतं जे रक्तप्रवाह वाढवतं. पालकच्या सेवनामुळे वयात आल्यानंतरच्या अनेक समस्याही कमी होतात. - कॉफी-युनिव्हर्सिटी व टेक्सासच्या प्रबंधानुसार जे लोक २ ते ३ कप कॉफी पितात किंवा ८५ ते १७० मिलिग्रॅमपर्यंत कॉफी इतर पेयातून घेतली तर ४२% कमजोरी कमी होते. कॉफीमुळे शरीरात वेगवेगळे स्टिम्युलंट तयार होऊन लिंगाकडे जाणारा रक्तपुरवठा वाढतो. - बनाना (केळी) - केळीमधे 'पोटॅशियम' मुबलक प्रमाणात असते आणि ते हृदयासाठी पूरक असते. मुबलक 'पोटॅशियम'मुळे 'सोडियम' ची पातळी संतुलित राहते ज्यामुळे रक्तदाब नियंत्रणात राहतो. - टोमॅटो - पुरुषत्व कायम राखण्यासाठी हे कामाला येते. आठवड्यातून दहा वेळा जर टोमॅटोची भाजी खाल्ली तर प्रोटेस्ट कॅन्सर होण्याचं प्रमाण सुमारे १८% ने कमी होतं. तसेच 'लायकोपेन' या अँटिऑक्सिडंटमुळे डीएनए व पेशींवर होणारा दुष्परिणाम टाळला जातो. शुक्राणूंची क्षमता आणि आकार वाढतो. ८ ते १० टक्के शुक्राणू सुदृढ होतात. - हॉट सॉस (चिल्लि सॉस)- फ्रांसमधील एका अभ्यासात तिखट खाणाऱ्यांमध्ये टेस्टेस्टेरॉन जास्त प्रमाणात आढळून आले. कॅप्सिसीनमुळे टेस्टेस्टेरॉन वाढते आणि लिंगाचा आकार वाढून पोटही कमी होते. - वॉटरमेलन (कलिंगड) कलिंगडामध्ये एल-सिट्रलीन आणि अमिनो ॲसिड असते जे कठोरता वाढवण्यास मदत करते. खाल्ल्यानंतर त्याचे रूपांतर एल-अर्जिनीनमध्ये होऊन ते नायट्रिक ऑक्साइड तयार करते व लिंगाचा रक्तपुरवठा वाढतो, पर्यायाने कठोरता वाढते. - जिंजर (अद्रक किंवा आले) ज्यांना गोड किंवा तिखट दोन्ही आवडते ते नशीबवान. आल्याच्या सेवनामुळे रक्तवाहिन्या सुदृढ होतात आणि रक्तपुरवठा वाढतो. हृदयही सुदृढ होतं. तसेच टेस्टेस्टेरॉन वाढून शुक्राणूंची जीवितक्षमता वाढते. - पामग्रेनेड (डाळिंब)- डाळिंबाच्या रसामध्ये 'अँटिऑक्सिडंटस्' मुबलक प्रमाणात असतात. हे 'अँटिऑक्सिडंटस्' रक्ताभिसरण वाढविण्याच्या कामी येतात आणि त्यामुळे लैंगिक कठोरता वाढण्यास मदत होते. - ग्रीन-टी- यामध्ये 'कॅथेचीन' हे मुबलक प्रमाणात असते. जे पोटाची चरबी कमी करते व यकृतातील फॅटचे रूपांतर ऊर्जेत करते. यामुळे रक्तवाहिन्यांचा दाह करणारे घटक कमी केले जातात व रक्तपुरवठा वाढतो. यामुळे नायट्रिक ऑक्साईड देखील तयार होते व रक्तपुरवठा वाढतो, व्यास वाढतो आणि उत्तेजना येते. त्यामुळे ग्रीन टी दिवसातून चार ते पाच कप पिण्यास हरकत नाही. - डार्क चॉकलेट - डार्क चॉकलेट हे बहुतांश वेळा गिफ्ट म्हणून दिलं जातं. कारण यामध्ये 'सिफाओ' हा पदार्थ असतो जो रक्तपुरवठा वाढवतो. याच्या सेवनामुळे 'मूड बूस्टिंग हार्मोन' 'सिरोटोनीन' तयार होते. 'सिरोटोनीन' मुळे ताणाची पातळी कमी होते, उत्तेजना येते व आनंदासाठी त्याची मदत होते. यामुळे शरीरातील सर्व अवयवांचा रक्त पुरवठा वाढतो. - ओटस् (OATS) - ओट्समध्ये एल-अर्जिनीन व ॲमिनो ॲसिड असतं जे 'इरेक्टाइल डिसफंक्शन'साठी वापरतात. याच्या सेवनामुळे कोलेस्टेरॉलचे प्रमाण कमी होते. त्यामुळे रक्तवाहिन्यांचा व्यास वाढतो. लिंगाजवळील रक्तवाहिन्या या हृदयातील रक्तवाहिन्यांपेक्षा लहान असतात. म्हणून त्या बंद होण्याची शक्यता जास्त असते. म्हणून कोलेस्टेरॉल नियंत्रण 'इरेक्टाइल डिसफंक्शन' साठी महत्त्वाचे असते.



डॉ. विजय दहिफळे
युरोलॉजिस्ट, अँड्रॉलॉजिस्ट अँड सेक्सॉलॉजिस्ट
9822326248




# एकच गीत दोनदा ध्वनिमुद्रित झाले...

आधुनिक केसरी



कधी कधी एखाद्या गीतातील शब्द किंवा संपूर्ण ओळ आपल्याला समजत नाही; पण तरीही आपल्याला ते गीत ऐकावेसे वाटते. अशी काही गीते गीतकारांनी लिहिली आहेत की ज्यांचा अर्थ ऐकणाऱ्यांच्या लक्षात येत नाही पण ते ती गातात-गुणगुणतात. प्रख्यात गीतकार मजरूह सुलतानपुरी यांनी असेच एक गीत `इन्कार' (१९७७) या चित्रपटासाठी लिहिले होते. या गीताची लोकप्रियता आजही कायम असून लोक त्याचा आनंद घेतात.

`इन्कार'च्या गीतांचे काम चालू होते. काही गीते ध्वनिमुद्रित झाली होती तर काही लिहिली जात होती. या चित्रपटाचे संगीत दिग्दर्शक राजेश रोशन एक मराठी वळणाचे (कोळी) गीत तयार करीत होते. ते हेलन यांच्यावर चित्रित होणार होते. गीतकार मजरूह सुलतानपुरी गीत लिहित होते. लिहिता लिहिता ते एका विशिष्ट शब्दावर आले आणि तिथेच थांबले. त्यांना काही केल्या कळेना की गीतात त्या शब्दाचा उल्लेख कसा करायचा ते ! आता काय करायचे ? मजरूह सुलतानपुरी तडक निघाले आणि हे गीत गाणार असलेल्या पार्श्वगायिका उषा मंगेशकर यांना मेहबूब स्टुडिओत जाऊन भेटले.

मजरूह सुलतानपुरी यांनी उषा मंगेशकर यांना विचारले, "चींटीला तुम्ही मराठीत काय म्हणता ? " त्या म्हणाल्या, "चींटीला मराठीत आम्ही मुंगी म्हणतो." यावर मजरूह यांनी त्यांना पुन्हा विचारले, "चींटीपेक्षा आकाराने मोठी व काळी असते तिला मराठीत काय म्हणता ?" उषा मंगेशकर उत्तरल्या, "तिला आम्ही मूँगडा (मुंगळा) म्हणतो." उषा मंगेशकर यांचे उत्तर ऐकून मजरूह सुलतानपुरी मनोमन सुखावले. ते त्यांना म्हणाले, "मला नेमका हाच शब्द हवा होता कारण गीत अर्धे हिंदीत आणि अर्धे मराठीत आहे." शब्द मिळाल्यावर मजरूह यांनी "मूँगडा मूँगडा मैं गुड की डली, मंगता है तो आजा रसिया नाही तो मैं ये चली" या मुखड्याचे गीत लिहून हातावेगळे केले. ते उषा मंगेशकर यांच्या आवाजात ध्वनिमुद्रित झाले. गीत ध्वनिमुद्रित झाले खरे पण मूँगडा या शब्दाचा अर्थ काय हेच राजेश रोशन यांच्या लक्षात येईना. चित्रपट प्रदर्शित होऊन एक आठवडा लोटला. प्रेक्षकांना हे गीत अतिशय आवडले. उषा मंगेशकर यांना अभिनेत्री हेलन यांचा फोन आला. त्या उषा मंगेशकर यांना म्हणाल्या, "हे गीत आपण इतके छान गायले आहे की आपण एखादा कार्यक्रम केलात तर या गीतावर नृत्य करण्यासाठी मी नक्की येईन. त्याच आठवड्यात संगीत दिग्दर्शक राजेश रोशन यांचाही उषा मंगेशकर यांना फोन आला. त्यांनी विचारले, "आपण पुन्हा गाऊ इच्छिता ? " उषा मंगेशकर यांनी राजेश रोशन यांना विचारले, "कोणते गीत ?" त्यावर रोशन उत्तरले, "मूँगडा गीत ! कोणाला समजतच नाहीये की आपण काय गायले आहे ते !" उषा मंगेशकर त्यांना म्हणाल्या, "मी काय गायले आहे हे कोणालाही समजणार नाही; पण आपल्या आग्रहाखातर मी गीतातील शब्द बदलू शकत नाही. मजरूह सुलतानपुरी यांनी जे लिहिले आहे तेच मी गायले आहे. यावर राजेश रोशन त्यांना म्हणाले, की नाही नाही आपण हे गीत पुन्हा एकदा गावे. काही वेगळे करता येते का पाहू.

शेवटी हे गीत दुसऱ्यांदा ध्वनिमुद्रित करण्यासाठी ध्वनिमुद्रणाच्या स्टुडिओत पडद्यावर हे गीत दाखविले जात असताना उषा मंगेशकर यांनी ते पुन्हा एकदा गायले. उषा मंगेशकर यांनी दुसऱ्यांदा गायलेले गीत राजेश रोशन यांनी ऐकले मात्र आणि त्यांनी त्याबद्दल नापसंती व्यक्त केली. ते उषा मंगेशकर यांना म्हणाले, "आपण पहिले गीत जसे गायले होते तसेच दुसरे गायले आहे." यावर उषा मंगेशकर त्यांना म्हणाल्या, "मी जसे गायले होते तसेच गाणार !"

उषा मंगेशकर यांनी दुसऱ्यांदा गायलेले गीत चित्रपटात समाविष्ट करण्यात आले आणि सुरुवातीला गायलेले गीत ध्वनिमुद्रिकेत ठेवण्यात आले. परंतु यातील सर्वात गंमतीचा भाग असा, की या गीताचा अर्थ आजपर्यंत कोणालाही समजलेला नाही !

अनिल तोरणे
तळेगाव दाभाडे, पुणे

# परमेश्वर जगताप ठरला माळेगाव केसरी मानकरी; रमेश तुमडेला चितपट करत पटकावली गदा

आधुनिक केसरी न्यूज




**मोहन पवार**

**लोहा :** कंधार तालुक्यातील बामणी येथील कुस्तीपटू परमेश्वर जगताप याने परभणीचा रमेश पुंडलीक तुडमेवर मात करीत माळेगाव केसरीचा बहुमान पटकावला. यावेळी विजेता परमेश्वर जगताप याचा माळेगाव केसरी किताब व गदा देऊन गौरव करण्यात आला. माळेगाव यात्रेचे विशेष वैशिष्ट्य ठरणारी कुस्त्यांची दंगल शुक्रवार दिनांक 12 जानेवारी रोजी माळेगावात मोठ्या प्रमाणात झाली. राज्यातून विविध विभागातून आलेल्या मल्लांनी आपले बळ अजमावले. काही जणांना पराभवाची धूळ चाखावी लागली. अत्यंत चुरशीच्या दंगलीत मल्लांच्या ताकतीचा कस लागत होता. घेण्यात आलेल्या कुस्ती दंगलीत प्रथम क्रमांकाची कुस्ती कंधार तालुक्यातील बामणी येथील मल्ल परमेश्वर जगताप यांनी जिंकत माळेगाव केसरीचा बहुमान पटकावला. मानाचा फेटा, चांदीची गदा व 31 रोख रक्कम देण्यात आली. रमेश पुंडलिक तुमडे हा उपविजेता ठरला. 21 हजारांच्या कुस्तीमध्ये पुणे येथील सुहास घोडके प्रथम तर उपविजेता सुरज मुलानी, सोलापूर, 11 हजाराच्या कुस्तीमध्ये सुनेगाव तालुका लोहा येथील सचिन जाधव विजेता तर उपविजेता लातूर येथील दीपक सरवदे, 9 हजाराच्या कुस्तीमध्ये दिलीप बामणे विजेता तर उपविजेता विष्णू ताकपुरे, सात हजाराच्या कुस्तीमध्ये लातूर येथील तुकाराम महानौर विजेता तर उपविजेता माऊली महानौर ठरला. 5 हजाराच्या कुस्त्यांमध्ये माळाकोळी तालुका लोहा येथील मल्ल दीपक रोहिदास कागले हा हा विजेता ठरला नांदेड येथील शोयब यांनी हा उपविजेता ठरला आहे. यावेळी बक्षिसाच्या रकमेतील उपविजेत्यांना वीस टक्के रक्कम देण्यात आली. दुपारी सुरू झालेल्या कुस्त्या रात्री उशिरापर्यंत सुरू होत्या. यावेळी लोहा पंचायत समितीचे गट विकास अधिकारी डी.के आडेराहो, विस्ताराधिकारी डी. आय. गायकवाड, धनंजय देशपांडे, पी.एम. वाघमारे, गजानन शिंदे, सतीश चोरमले, ग्रामविकास अधिकारी संभाजी धुळगंडे, हनुमंतराव धुळगंडे, लखन चौधरी, अमृत शिंदे, परशुराम कौशल्य यांच्यासह लोहा पंचायत समितीचे कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.

## लय भारी सुगरण



सौ. स्नेहा मुसरीफ, पुणे.
संपर्क क्र. 9503434424

आधुनिक केसरी




अलीकडे खूप लोक अनेक प्रकारची सूप बनवतात. टोमॅटो, पालक, गाजर अशा अनेक भाज्यांची, चायनीज, इटालियन अशा विविध कॉन्टीनेंटल प्रकारची सुप बनवली जातात कारण आता लोकांना त्याचे महत्व समजले आहे . काही डाएटसाठी तर काही एनर्जी वाढवण्यासाठी! बदाम सूप खूप कमी लोक बनवतात. हे एक शाही थाटाचे सूप आहे असे म्हटले तरी चालेलं कारण कष्ट , वेळ , सामग्री अगदी कमी लागते आणि जे साहित्य लागते ते शाही आणि रिझल्ट सुद्धा एकदम पॉवरफुल ! चला, मग बदाम सूप बनवायला .

**साहित्य :** 1 कप बदाम, 3 कप व्हाईट व्हेज स्टॉक , 2 चमचे बटर, 1 चमचा मैदा किंवा कणिक, 2 चमचे फ्रेश क्रिम , चिमुटभर मिरपूड आणि चवीनुसार मीठ, 4..5 थेम्ब बदाम इसेन्स .

**कृती :** प्रथम 2..3 बदाम सजावटीसाठी बाजुला ठेवून बाकीचे बदाम गरम पाण्यात 15..20 मिनिटे भिजत ठेवावेत. मग त्यांची साले काढून टाकावीत. गरम पाण्यात भिजवल्यामुळे साले लगेच निघतात. मग मिक्सरच्या भांड्यातून किंचित रवाळ.. जाडसर वाटून घ्यावेत. आता गॅस वर कढई ठेवून त्यात बटर घालावे.ते वितळले की त्यात हेल्दी बनवायचे असेल तर कणिक घालावी. थोडी गुलाबी झाली की त्यात व्हेज स्टॉक किंवा पाणी घालावे. ते गरम झाले की त्यात बदाम पेस्ट घालावी व छान उकळू द्यावे. मधून मधून ढवळत राहावे. नंतर त्यात मिरपुड घालून चवीनुसार मिठ घालावे. शेवटी फ्रेश क्रीम घालून सर्व्हिंग बाऊल मध्ये काढून त्यावर सजावटी साठी बदामाचे पातळ काप घालुन गरम गरम सर्व्ह करावे. **वैशिष्ट्य :** हिवाळ्यात शरीराला स्निग्ध व पौष्टिक आहाराची अत्यंत गरज असते. बदामात, क्रीम मध्ये, बटरमध्ये हे दोन्ही भरपूर असल्यामुळे हे उत्तम असते. झटपट बनणारे व दमदार असे हे सूप एकदम सौम्य चवीचे असुन लहाना पासून वृद्धानपर्यंत साऱ्यांना चालते. शाही थाटाचे हे हेल्दी सूप सर्वांना नक्कीच आवडेल.



# शिक्षण महर्षी स्व. कृष्णराव जाधव स्मरणार्थ कायम

## उद्योजक मनोज पवार : जिजामाता प्रसारक मंडळाचे स्नेह संमेलन उत्साहात संपन्न

आधुनिक केसरी न्यूज

**कन्नड :** येथील जिजामाता शिक्षण प्रसारक मंडळ व शिक्षण महर्षी स्वर्गीय के के जाधव यांच्या सेवाभावी प्रतिष्ठान कन्नड यांच्या संयुक्त विद्यमाने राजमाता जिजाऊ व युवक दिन महोत्सवाच्या निमित्ताने जिल्हास्तरीय वादविवाद स्पर्धा तसेच रविद्रनाथ टागोर शाळेचे स्नेह संमेलन उत्साहत पार पडले यावेळी जिजामाता शिक्षण प्रसारक मंडळाचे संस्थापक सचिव शिक्षण महर्षी स्वर्गीय कृष्णाराव काशिनाथराव जाधव यांच्या स्मृतीस्थळावर मान्यवरांनी अभिवादन केले. यावेळी विद्यालयातील विद्यार्थिनींनी जिजाऊ वंदना व स्वागत गीताने उपस्थितांचे स्वागत करण्यात आले. या वेळी रविद्रनाथ टागोर विदयालयाच्या स्नेह संमेलनात विविध गाण्यावर चिमुकले शिरकल्याने चिमुकल्यानीं सर्वाचे मने जिंकुन घेतले. या वेळी उदयोजक मनोज पवार बोलतांनी म्हणाले की स्व : कृष्णाराव जाधव खरच शिक्षण महर्षी होते त्यांनी काळाची गरज ओळखुन अतंत्य हालाखीच्या परीश्रमातुन तालुक्यात विविध ठिकांनी शाळा काढुन उत्कृष्ट शिक्षण दिल्याने आजही सर्व शाळा तालुक्यात नाव उज्वल करत आहेत . या वेळी जिजामाता शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष ताराबाई जाधव, सचिव सागर जाधव, मुख्याध्यापक आबासाहेब चव्हाण, मुख्याध्यापक रवींद्र नीळ,उद्योजक मनोज पवार, उपनिरीक्षक राम बारहाते, नगरसेवक काकासाहेब कवडे, साईनाथ अल्हाड, पत्रकार गोरख पाटील, प्रविण जंजाळ, संतोष निकम, अनिल अल्हाड, नंदकिशोर, शेजवळ, विश्वनाथ शहरवाले, गणेश मोरे, प्रदीप सनंसे आर .टी .निकम रूपेश भारका, संगेश भारुका, पवण ठाकुर, योगेश त्रिभवण, सोमनाथ दाभाडे, बंन्टी जाधव यांची उपस्थीती होती.



# नगराध्यक्ष माणिकराव पाटील पवार यांची जयंती विविध उपक्रमांनी साजरी

आधुनिक केसरी न्यूज

**लोहा :** नगरीचे शिल्पकार तथा लोहा नगर परिषदेचे प्रथम नगराध्यक्ष माणिकराव पाटील यांची जयंती लोहा शहरात विविध उपक्रमांनी साजरी करण्यात आली.

यावेळी लोहा येथील श्रीसंत गाडगे महाराज विद्यालयातील हुतात्मा स्मारक येथे श्री संत गाडगे महाराज विद्यालयाचे अध्यक्ष व्ही.जी. चव्हाण यांच्या हस्ते श्रीसंत गाडगे महाराज व लोहा शहरांचे प्रथम नगराध्यक्ष माणिकराव पाटील पवार यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले व त्यानंतर विद्यार्थ्यांना पॅड वाटप करण्यात आले.

यावेळी श्री संत गाडगे महाराज विद्यालयाचे अध्यक्ष व्ही.जी. चव्हाण,माणिकराव पाटील यांचे पुत्र डी.एम.पवार , शिक्षक नेते हरीभाऊ चव्हाण, संजय मालक मक्तेदार, श्री संत गाडगे महाराज विद्यालयाचे मुख्याध्यापक बोधगिरे, यांच्या सहित सर्व शिक्षक, प्राध्यापक, आदी उपस्थित होते. यावेळी बोलताना श्रीसंत गाडगे महाराज विद्यालयाचे अध्यक्ष व्ही जी चव्हाण म्हणाले की, कै. माणिकराव पाटील पवार यांनी जुना लोहा , विठ्ठलवाडी,बेनाळ, वाडी,तांडे यांना एकत्रीत करून तात्कालीन आ.केशवराव धोंडगे यांच्या माध्यमातून तात्कालीन मुख्यमंत्री शंकरराव चव्हाण यांच्या माध्यमातून लोहा नगर पालिका केली. लोहयात रस्ते केले शहरांचा विकास केला. माजी आ. केशवराव धोंडगे यांच्या माध्यमातून लोहा शहरात श्री संत गाडगे महाराज प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक, महाविद्यालय स्थापन करुन शिक्षणांची गंगोत्री आणली .१९९२ ला ला तात्कालीन मुख्यमंत्री सुधाकरराव नाईक व तात्कालीन आ.केशवराव धोंडगे यांच्या माध्यमातून लोहा तालुका केला व लोहा जिल्हा झाला पाहिजे हा त्यांचा मानस होता असे व्ही.जी. चव्हाण म्हणाले. तसेच यावेळी बोलताना शिक्षक नेते हरीभाऊ चव्हाण म्हणाले की, माणिकराव पाटील हे व्यक्तिमत्त्व सर्वांच्या विरोधात होते ते जे करु नका म्हटले ते करीत होते .कै. माणिकराव पाटील यांनी १९६० मध्ये अस्पृश्य लोकांसाठी हॉटेल खुले केले त्यांच्या हस्ते उद्घाटन केले . त्यांच्या माणूस वारल्यानंतर त्यांची तेरवी करु नका म्हणायचे त्या काळात २०-२५ हजार खर्च करु नका म्हणायचे असे सुधारणावादी विचाराचे ते होते तसेच लोहा शहरांचा विकास त्यांनी मोठ्या प्रमाणात केला असे हरीभाऊ चव्हाण म्हणाले. तसेच माणिकराव पाटील पवार यांच्या जयंतीनिमित्त लोहा येथील जिल्हा परिषद हायस्कूल येथील अनाथ मुलांच्या वसतिगृहातील विद्यार्थ्यांना फळे ही वाटप करण्यात आले.

# निजामपूरचे नाव श्रीरामपूर करण्याची मागणी

## भाजपचे लखनसिंह ठाकूर यांची मागणी

आधुनिक केसरी न्यूज

**रिसोड :** येथून जवळच असलेल्या निजामपूर चे श्रीरामपूर करण्यात यावे यासाठी गेल्या अनेक दिवसापासून ग्रामपंचायत प्रशासन व गावकरी पाठपुरावा करत आहेत निजामपूर ही ग्रामपंचायत असून या गावाचे नाव मोगलाई निजाम कार्यकाळात निजामपूर असे नाव देण्यात आले होते आपल्या राज्याला स्वातंत्र्य मिळून अनेक वर्ष झाले मोगलाई संपली त्या काळाची मुगल शाही सुद्धा संपुष्टात आलेली आहे परंतु निजामपूर नाव अजूनही अस्तित्वातच करून निजामपूर या गावाचे आहे मोजे निजामपूर ग्रामस्थ सह अनेक रिसोड वासियांची अनेक वर्षापासून मागणी आहे की ग्रामपंचायत निजामपूर ऐवजी श्रीरामपूर असे शासनाकडून नामांतरण व्हावे सदर नाव बदलून श्रीरामपूर नाव देण्यात यावे याबाबत ग्रामपंचायत निजामपूर पांचा ठराव सुद्धा पारित झालेला आहे.

तरी निजामपूर या गावाचे नाव बदलून श्रीरामपूर नाव गावाला नाव देण्यात पावे याकरिता आपल्या स्तरावरून योग्य ती कार्यवाही व्हावी याकरिता मुख्यमंत्री एकनाथजी शिंदे यांच्या कार्यालयात तसेच उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणीस व ग्राम विकास मंत्री गिरीश महाजन यांच्याकडे पत्रव्यवहार करून श्रीरामपूर करण्यात यावे याची मागणी भाजपाचे महाराष्ट्र उत्तर भारतीय प्रदेश सचिव लाखानसिंह ठाकूर व रिसोड भाजपा शहराध्यक्ष नंदकिशोर मगर भाजपा जिल्हा उपाध्यक्ष अशोकराव सानप युवा मोर्चा प्रदेश सचिव सारंग निवाण भाजपचे तालुका सरचिटणीस सुनील बेलोकर भाजपा शहर महामंत्री महादेवराव पवार भाजपाचे बबनराव मोरे बापू मंचकराव देशमुख धनंजय मानवतकर कैलास महाजन धनंजय देशमुख गजानन वाळले रणजीतसिंह ठाकुर बाळासाहेब देशमुख अनेक माजप कार्यकर्त्यांच्या मागणी आहे.



# जिजाऊ जयंतीनिमित्त आरोग्य शिबिरास प्रतिसाद

## भोकरला शाहू परिवार व डॉक्टर संघटनेचा पुढाकार

आधुनिक केसरी न्यूज

**भोकर :** शहरातील श्री शाहु महाराज माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात " शाहू परिवार" व डॉक्टर असोसिएशनच्या संयुक्त विद्यमाने" राष्ट्रमाता जिजाऊ जयंती " निमित्त विद्यार्थी व शिक्षकांसाठी आरोग्य तपासणी शिबीर व कार्यशाळा आयोजित करण्यात आली. सदरील शिबिरास चांगला प्रतिसाद मिळाला आहे.

#विद्यालयातील इयत्ता १ ली ते १२ च्या (४०००)विद्यार्थ्यांची शारीरिक तपासणी करण्यात आली. डॉक्टर संघटनेचे तालुकाध्यक्ष अध्यक्ष डॉ. राम नाईक सहकारी टिमसह उपस्थिती होते. अध्यक्षस्थानी डॉ.सौ. कनिज फातेमा इनामदार



यांची उपस्थिती होती.प्रमुख पाहुणे म्हणून डॉ.राम नाईक( अध्यक्ष डॉ. असोसिएशन भोकर) प्राचार्य संजय देशमुख कामनगावकर यांची उपस्थित होते. किशोरवयीन मुलींसाठी 'मासिक पाळी व आरोग्याच्या समस्या' या विषयावर डॉ.अश्विनी बनबरे- धोपटे, डॉ. नाईक मॅडम, डॉ माने मॅडम,डॉ.बाचेवाड मॅडम, डॉ जाधव मॅडम, यांनी मार्गदर्शन केले.सौ.धूमाळ व्ही. एच., श्री. डुमलवाड एस.(राष्ट्रीय बाल स्वास्थ कार्यक्रम) यांनी सर्व शिक्षक बांधवाची शुगर टेस्ट घेतली.

रामरतन नर्सिंग कॉलेज भोकर येथील प्रशिक्षणार्थी मुलींनी सहभाग घेतला.श होता.विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गुणवत्ता वाढीबरोबरच शारीरिक व मानसिकदृष्ट्या सक्षम विद्यार्थी घडविण्यासाठी " शाहू परिवार" सातत्याने प्रयत्न करत आहे.


कार्यक्रम यशस्वीतेसाठी श्री. किनेवाड , श्री. कुलकर्णी ,श्री. सर्जे, श्री.सावते, जाधव बी. जी,श्री. शेख सलीम,श्री. जोंधळे,श्री.काळवणे यांच्यासह सर्व सहका-यांनी प्रयत्न केले.

# मॉर्निंग वॉकसाठी निघालेल्या दोन विद्यार्थ्यांना वाहनाने चिरडले

## भोसी गावावर पसरली शोककळा

आधुनिक केसरी न्यूज

**भोकर :** भोकर नांदेड राष्ट्रीय महामार्गावर भोसी (ता. भोकर) गावाजवळ मॉर्निंग वाक साठी निघालेल्या दोन विद्यार्थ्यांना अज्ञात वाहनाने चिरडल्याची दुर्दैवी घटना शूक्रवारी (ता. १२) पहाटे पाच वाजताच्या दरम्यान घडली आहे. या बाबत मिळालेल्या माहितीनुसार,संकेत दत्ता पाशमवाड (वय१७) शिक्षण (इयत्ता १०वी) कै. मोहनराव देशमुख विद्यालय भोसी व वैभव दत्ता येळणे (वय १८) शिक्षण ११ वी (कै. लक्ष्मणराव घीसेवाड



विद्यालय भोकर) असे मयत विद्यार्थ्यांचे नाव आहे. सदरील विद्यार्थी शुक्रवारी पहाटे मार्निंग वाकला गेले असता अज्ञात वाहनाने त्यांना चिरडले आहे. ऊशिरा पर्यंत गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू होती.

# प्रभू श्रीराम मंदिर हा आमच्या अस्मितेचा विषय

## शिवानी दाणी : प्रा. हिमगौरी देशपांडे यांच्या आविष्कृत पुस्तकाचे प्रकाशन

आधुनिक केसरी न्यूज

**वरोडा :** आज अयोध्येमध्ये निर्माण होत असलेल्या भव्य श्रीराम मंदिरासाठी या देशातील जनतेने अनेक वर्षे लढा दिला. गेली बरीच वर्षे आपण ऐकतेचे दर्शन घडविले आणि संघर्ष केला. कारण आपला इतिहास संघर्षाचा आहे. भारत हा देश विविधतेतील एकतेसाठी, सनातन ताकदीसाठी आणि अध्यात्मिकतेसाठी प्रसिद्ध असून, आज या ताकदीच्या जोरावरच आपण एकत्र येऊ शकतो. आवश्यकता पडली तेव्हा कारसेवाही केली आणि आज करोडो रुपये गोळा करून स्वतःच्या बळावर राम मंदिर बांधून दाखवले. कारण प्रभू श्रीराम हे आमच्या अस्मितेचे प्रतीक असल्याचे प्रतिपादन



भारतीय जनता युवा मोर्चा महाराष्ट्र प्रदेशच्या शिवानी दाणी यांनी केले.

अखित भारतीय साहित्य परिषद शाखा चंद्रपूरच्या वतीने गुरुवार, ११ जानेवारी रोजी वरोडा येथील राम मंदिरात आयोजित, 'भारतीय अस्मितेचा ऐतिहासिक लढा श्रीराम जन्मभूमी' या विषपावर त्या पुष्प गुंफत होत्या.

यावेळी व्यासपीठावर अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. ब्रह्मदत्त पांडे, तर प्रमुख पाहुणे म्हणून प्रसिद्ध विधिज्ञ ॲड. रवींद्र भागवत आणि साहित्य परिषदेचे जिल्हाध्यक्ष डॉ. परमानंद बावनकुळे यांची उपस्थिती होती. शिवानी दाणी यांनी आपल्या ओघवत्या वाणीतून भारताचा जाज्वल इतिहास उपस्थितांसमोर मांडला. आपला इतिहास संघर्षाच्या आहे, असे सांगत अनेकांनी भारतीय स्थापत्य शास्त्राची आणि रामसेतूची गंमत केली.

आकांतानी मंदिरे, किल्ले, इमारती यांची नासधूस करून येथील संपत्ती लुटण्याचे काम केले. मात्र, आपण सतत संघर्ष केला आणि म्हणूनच यावर्षी आम्ही दोनदा दिवाळी साजरी करणार आहोत. आज जात-पात-धर्म बाजूला सोडून प्रत्येक जण राम लल्लांच्या प्रतिष्ठापनेसाठी एकत्र आल्याचे बघून आनंद होतो, असेही त्या म्हणाल्या.

ॲड. रवींद्र भागवत यांनी 22 जानेवारीला अयोध्येत प्रतिष्ठापना होत असलेल्या राम मंदिराची घटना ही अभिमान वाटणारी आहे, असे सांगत प्रा. हिमगौरी देशपांडे यांनी लिहिलेल्या 'अविष्कृत' या पुस्तकाचे कौतुक केले. डॉ. पांडे यांनी, राम सनातन संस्कृतीचे आदिपुरुष होते. असे सांगत रामाच्या नावापुढे कोणत्याही विशेषणाची किंवा उपसर्गाची आवश्यकता नाही. अतिशय संघर्षातून आणि परिश्रमातून राम मंदिर पूर्णत्वास येत असून, त्याचे स्वागत जल्लोषात झाले पाहिजे, असेही ते म्हणाले. कार्यक्रमाच्या सुरुवातीला ॲड. मिलिंद देशपांडे यांनी प्रभू रामचंद्राची प्रतिमा देऊन उपस्थित मान्यवरांचे स्वागत केले. प्रा. हिमगौरी देशपांडे लिखित अविष्कृत पुस्तकाचे प्रकाशन याप्रसंगी करण्यात आले. त्यानंतर त्यांनी पुस्तकाबद्दत मनोगत व्यक्त केले. प्रास्ताविक डॉ. परमानंद बावनकुळे यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. डॉ. जयश्री शास्त्री यांनी, तर डॉ. पल्लवी ताजने यांनी आभार मानले.

# स्वस्त धान्य दुकानदार चालकांची देयके द्या : तहसीलदारांना निवेदन

आधुनिक केसरी न्यूज

**फुलंब्री :** तालुक्यातील २७ विविध कार्यकारी सहकारी सोसायटी स्वस्थ धान्य दुकान चालक नियमाप्रमाणे पाठवलेले धान्य रेशन कॉर्ड धारक यांना नियमित वाटप करत आहे त्या वाटपा पोटू मिळणारी रक्कम ही आगोदर दुकान चालक यांच्या नावाने येत होती परंतू मागच्या तीन महिन्याचे देयक हे सोसायटी सचिव आणि चेअरमन यांच्या खात्यात जमा करण्यात आलेली आहे.

निवेदन म्हणले आहे की स्वस्थ दुकान चालक यांनी मागणी केली असता सहाय्यक निबंधक चगटसचिव त्या रक्कमेतुन ३५% कमिशनची मागणी करत मा.तहसीलदार साहेबांनी यांना लवकर आवर घालून आमचे



देयक तात्काळ आम्हाला देण्याच्या सुचना कराव्या नसता २७ विविध कार्यकारी सहकारी दुकान चालक आपले ई पॉश मिशन सुरू करणार नाही. व आपण पाठलेले धान्य वितरणीत करणार नाही. यासाठी आज सर्व स्वस्त धान्य दुकानदार यांनी मा. फुलंब्री तहसीलदार डॉ. कानगुले साहेब यांना निवेदन दिले आहे यावेळी उपस्थित. बाबुराव डकले चेअरमन, शिवाजी जयवंतराव माहोरे , दादाराव मेटे, कैलास गोविदेराव वाढेकर, नामदेव जीवरग, आनदा सोनवणे, योगेश जोगदंडे, संतोष आप, निसार पटेल, सुर्यभान इधाटे, विष्णु भाऊसाहेब साबळे, सुनिल ठोंबरे, नामदेव काळे, नवनाथ काळे, सुर्यभान साळुके, आदी राशन दुकानदार चालक उपस्थित होते.

# काँग्रेसची विभागीय बैठक गडचिरोलीत

आधुनिक केसरी न्यूज

**गडचिरोली :** काँग्रेस पक्षाची विभागीय आढावा बैठक आता नागपूरऐवजी गडचिरोली येथे होणार आहे. २० जानेवारी रोजी धानोरा मार्गावरील महाराजा सेलिब्रेशन हॉल ॲण्ड लॉनमध्ये प्रदेश प्रभारी रमेश चेन्नीथला यांच्या प्रमुख उपस्थितीत ही बैठक पार पडणार आहे. लोकसभा निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर नुकतीच मुंबई येथे काँग्रेसची महत्वपूर्ण बैठक पार पडली. यात राज्यभरातून पदाधिकारी सहभागी झाले होते. लोकसभानिहाय इच्छुकांचे अर्ज सादर करण्यात आले. त्यामुळे विभागस्थरावर आढावा घेऊन लोकसभा उमेदवारांची नावे अंतिम करण्यात येणार आहे. नागपूर येथे प्रदेश प्रभारी रमेश चेन्नीथला यांच्या प्रमुख उपस्थितीत आढावा बैठकीचे आयोजन करण्यात आले होते.

# साई पब्लिक स्कूल अँड ज्युनिअर कॉलेजने वादविवाद स्पर्धेत पटकावला द्वितीय क्रमांक

आधुनिक केसरी न्यूज

**खुलताबाद :** तालुक्यातील बाजार सावंगी येथील दिनांक 12 जानेवारी 2024 कन्नड येथे झालेल्या जिजामाता शिक्षण प्रसारक मंडळ कन्नड आयोजित जिल्हास्तरीय वादविवाद स्पर्धेत साई पब्लिक स्कूल अँड ज्युनिअर कॉलेजची विद्यार्थिनी कुमारी शिवांजली बाळासाहेब वेताळ हिने द्वितीय क्रमांक पटकावला. तसेच तिचा रोख रक्कम सहा हजार रुपये ( 6000रू ) ट्रॉफी, प्रशस्तीपत्र देऊन सन्मान करण्यात आला. तिच्या या यशाबद्दल संस्था अध्यक्ष किशोर पाटील नलावडे, प्राचार्य गोपाल अधाने, उपप्राचार्य गिरधर जाधव, प्राध्यापक अतुल जाधव, रामेश्वर मते, ज्ञानेश्वर अधाने, ज्ञानेश्वर नलावडे, संदीप चव्हाण,अक्षय गोसावी,सौरभ दहातोंडे,ओमकार राठोड ,प्राध्यापिका ज्योती वायसळ, शितल नलावडे,साक्षी जैस्वाल,वर्षा लोंढे, कालिंदा जंजाळ, रिना जैस्वाल, रेणुका देवकर, जयश्री भांगरे, कल्पना नलावडे,राज्यश्री राणे यांनी अभिनंदन करून, पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.






# राजमाता जिजाऊ आणि स्वामी विवेकानंद जयंती यांना अभिवादन

आधुनिक केसरी न्यूज

**बाबुराव गोनारकर**

**धर्माबाद :** शुक्रवारी धर्माबाद येथील यशवंत प्राथमिक शाळेत राजमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद विविध उपक्रम घेऊन जयंती साजरी करण्यात आली. यावेळी मुख्यदापक श्री होनलवाड एम वाय यांनी प्रतिमेचे पूजन केले. कार्यकर्माचे अध्येक्ष श्रीमती प्रभावती विजयकुमार येताळकर शाळेतील हे होते, प्रमुख पाहुणे म्हणून श्री.आर् एस, मार्गदर्शक म्हणून सौ कदम एस डी, यांनी राजमाता जिजाऊ तर श्रीमती प्रभावती विजयकुमार येताळकर यांनी स्वामी विवेकानंद यांच्या जीवन कार्याची माहिती विद्यार्थ्यांना सांगितली.याप्रसंगी विद्यार्थ्यांना स्वामी विवेकानंदाची तर विद्यार्थ्यांनी राजमाता जिजाऊच्या वेशभूषा करून आले होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री इंद्रवाड ए जी, समरोप व आभार श्री.शेख जी आय.सर यांनी केले. गोनारकर अशोक, सर्व शिक्षक उपस्थित होते.

# डॉ.अब्दुल कलाम उर्दू महाविद्यालयात माँ जिजाऊ, स्वामी विवेकानंद जयंती

आधुनिक केसरी न्यूज

**साजरी सुलतानपूर :** सुलतानपूर येथे अब्दुल कलाम उर्दू महाविद्यालयात आज दिनांक 12 जानेवारी 2024 रोजी राजमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद यांची जयंती साजरी करण्यात आली यावेळी शाळेचे मुख्याध्यापक शेख ए एम व शिक्षक मुशरब खान शेख सुमय्या मॅडम सय्यद सुलताना बाजी तसेच कर्मचारी आणि विद्यार्थी उपस्थित होते.





# बुद्ध, भीमावरील निष्ठा ढळता कामा नये :भदंत पंय्याबोधी थेरो

आधुनिक केसरी न्यूज

**नांदेड :** कितीही संकटे आली तरी कोणत्याही परिस्थितीत तथागत गौतम बुद्ध आणि महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांवरील, आदर्श किंवा तत्वज्ञानावरील असलेली आपली श्रद्धा तसूभरही ढळता कामा नये असे प्रतिपादन येथील अखिल भारतीय भिक्खू संघाचे जिल्हाध्यक्ष तथा धम्मगुरू संघनायक भदंत पंय्याबोधी थेरो यांनी केले. ते गायतोंड येथील आठव्या बौद्ध धम्म परिषदेचे उद्‌घाटन करतांना बोलत होते. यावेळी भदंत पंयारत्न थेरो, भिक्खू सिद्धार्थ बोधी, भंते संघप्रिय, भिक्खू महाकाश्यप, सुगत बोधी, आनंद भंडारे, संजय कांबळे, प्रज्ञाधर ढवळे, व्यंकटेश लोणे, हिदायतखान पठाण, बबन भालेराव, शामराव पाटील, थोरात बंधू, निवृत्ती लोणे आदींची उपस्थिती होती. तालुक्यातील खुरगाव नांदुसा परिसरातील श्रामणेर प्रशिक्षण केंद्राच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या भव्य महाधम्मध्वज महापदयात्रेनंतर धम्मदान आणि धम्मसंदेश यात्रेस प्रारंभ झाला आहे. या यात्रेचे हदगाव तालुक्यातील गायतोंड येथील बौद्ध धम्म परिषदेत आगमन झाले. याप्रसंगी भदंत पंय्याबोधी थेरो यांनी धम्मदेसना दिली. ते बोलत असताना पुढे म्हणाले की, येणारा काळ खडतर आहे. बौद्धांनी अत्यंत सावधगिरीने वागले पाहिजे. बुद्धाचा विचार तसेच बाबासाहेबांचा विचार नेहमीच उर्जा देणारा आहे. मानवजातीच्या कल्याणाचा हा विचार आहे. यामुळे माणसाची सर्वांगीण प्रगती होते. या विचारांवरच पुढे चालले पाहिजे. अन्यथा दिशा जर चुकली तर आपला घात होतो. यासाठी बुद्ध भीम विचारांवरच मार्गक्रमण केले पाहिजे.

प्रारंभी मान्यवरांच्या हस्ते तथागत गौतम बुद्ध आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमांचे पूजन करून अभिवादन करण्यात आले. याचनेवरुन भिक्खू संघाने त्रिसरण पंचशील दिले. भिक्खू संघास भोजनदान देण्यात आले. तसेच उपस्थित बौद्ध उपासक उपासिकांना भोजनदान देण्यात आले. सकाळी परित्राणपाठ, त्रिरत्न वंदना, विविध गाथांचे पठण करण्यात आले. दुपारच्या सत्रात भिक्खू संघाची धम्मदेसना संपन्न झाली. रात्री बुद्ध भीम गितांचा बहारदार कार्यक्रम संपन्न झाला. उद्‌घाटन सत्राचे प्रास्ताविक रमेश खिल्लारे यांनी केले तर सूत्रसंचालन राजू वाठोरे यांनी केले. धम्म परिषदेच्या यशस्वीतेसाठी संयोजन समितीच्या पदाधिकाऱ्यांनी परिश्रम घेतले.

# राज्यात आठ हजार कोटींचा रुग्णवाहिका महाघोटाळा

## विजय वडेट्टीवार यांचा सरकारवर हल्लाबोल

आधुनिक केसरी न्यूज



**मुंबई :** राज्यभरातील गरीब आणि गरजू रुग्णांसाठी आधार ठरलेल्या सरकारी ॲम्ब्युलन्समधून पैसे कमावण्याचा सरकारने उद्योग सुरु केला आहे. ॲम्ब्युलन्सचे चार हजार कोटीचे टेंडर 8 हजार कोटीपर्यंत फुगवले आहे. मंत्र्यांच्या नातेवाईकाचा, जवळच्या ठेकेदाराचा खिसा भरण्यासाठी सरकारने हे टेंडर फुगवल्याचा हल्लाबोल विधानसभेचे विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी केला आहे. सरकारी तिजोरी लुटण्याचा सरकारचा कार्यक्रम राजरोसपणे सुरूच असून टेंडर थांबविण्यासाठी मुख्यमंत्र्यांकडे पत्राद्वारे तक्रार करणार असल्याचे वडेट्टीवार यांनी स्पष्ट केले.
वडेट्टीवार म्हणाले, रुग्णवाहिका महाघोटाळा समोर आला आहे. ८ हजार कोटींचा हा घोटाळा आहे. सात दिवस शॉर्ट नोटीसवर टेंडर काढले. चार हजार कोटीच्या कामाला ८ हजार कोटी सरकार मोजणार आहे. यामध्ये मंत्र्यांच्या नातेवाईकांना काम मिळाले आहे. सरकारमधील काही नेत्यांचे लाड पुरविणाऱ्या ठेकेदाराला हे काम देण्याचा आटापिटा सरकारनेच केला आहे. गरीब रुग्णांसाठी असलेल्या या योजनेच्या टेंडरमध्ये आठ हजार कोटींचा महाघोटाळा झाल्याची शक्यता नाकारता येत आहे. अधिकाऱ्यांवर दबाव टाकून सरकार अशी कामे करत आहे. केंद्रीय दक्षता आयोगाच्या नियमानुसार निविदेसाठी ठेकेदारांमध्ये स्पर्धा होऊन कामाचा दर्जा असला पाहिजे. यासाठी टेंडर मुदत किमान 21 दिवसांची असली पाहिजे. जेणेकरून ठेकेदारांना सहभागी होता येईल. मात्र नियमाला केराची टोपली दाखवून हे टेंडर 7 दिवसांतच काढण्यात आले. त्यामुळे या घोटाळ्याची चौकशी झाली पाहिजे, अशी मागणी वडेट्टीवार यांनी केली आहे.



# संपाला सहकार्य करण्याची मागणी

आधुनिक केसरी न्यूज

**सुलतानपूर :** खुलताबाद तालुक्यातील सुलतानपूर येथील ग्रामपंचायत ने अंगणवाडी सेविकांच्या संपाला सहकार्य करण्याची मागणी गुरुवारी (दि.११) अंगणवाडी संघटनेतून ग्रामपंचायतीकडे निवेदन देऊन करण्यात आली.
तूट पुंज्या मानधनावर काम करीत असलेल्या अंगणवाडी सेविका व मदतनीस गेल्या एक महिन्यापासून बेमुदत संपावर आहेत सेविका व मदतनीस यांना कर्मचाऱ्यांचा दर्जा देऊन, वेतन देण्यात यावे यास विविध मागण्या घेऊन अंगणवाडी सेविका व मदतनीस गेल्या एक महिन्यापासून संपावर आहेत.
संपाचा परिणाम बालकांच्या पोषण आहारावर, गरोदर माता,स्तनदा माता यांच्यावर होत असुन, बालकांची कुपोषित होण्याचे प्रमाण वाढण्याची शक्यता निर्माण झाली आहे.
अद्याप पर्यंत शासनाकडून या संपावर काही एक तोडगा निघालेला नसून उलट अंगणवाडी सेविका व मदतनीस यांच्यावर कार्यवाहीचा बडगा उगरत संप बे कायदेशीर असून तात्काळ कामावर हजर होण्याचे नोटिसा सेविकांना देण्यात आले आहे वेळेत कामावर हजर न झाल्यास कामावरून काढण्याचा इशाराही प्रशासनाच्या वतीने देण्यात येत आहे. तर दुसरीकडे ग्रामपंचायत, बचत गट व जिल्हा परिषद शाळेच्या माध्यमातून अंगणवाड्या उघडून बालकांना पोषण आहार देण्याचे काम प्रशासनातून चालू आहे. हेच काम ग्रामपंचायतीने व शाळेने करू नये आणि आम्हाला या संपात सहकार्य करावे अशी मागणी ग्रामपंचायती सरपंच, उपसरपंच, ग्रामपंचायत सदस्य ग्रामसेवक रामराव सोनवणे यांच्याकडे निवेदन देऊन करण्यात आली आहे. याप्रसंगी विष्णू चव्हाण ,संजय मोरे, सुदाम सोनवणे, ततेराव कोतकर, बाबासाहेब मालोदे यांची उपस्थिती होती तर संघटनेतील सभासद तथा अंगणवाडी सेविका, मदतनीस सविता बोडखे,सुनीता मोरे, लहानुबई वाघ,मंगल गडवे, वर्षा गाडेकर, लता हीवर्डे,सिंधू मालोदे, छाया मोटे, ज्योती पळसकर आदींची उपस्थिती होती.

# संघर्ष बुद्धभूमी विहारात जिजाऊ जयंती

आधुनिक केसरी न्यूज

**नांदेड :** नवीन कौठा परिसरातील संघर्ष बुद्धभूमी विहारात राजमाता जिजाऊ जयंती साजरी करण्यात आली. स्वराज्य जननी जिजामाता जयंती निमित्त प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी यशोधरा महिला मंडळाच्या सुभद्राबाई जोंधळे, लक्ष्मीबाई भुतके, सुशीलाबाई दिग्रसकर तसेच प्रभागातील नागरिक सुभाष कांबळे, बाळासाहेब ढवळे, दलितनंद जोंधळे, प्रदीप ससाने, धम्मदीप जोंधळे, जळबा सोनकांबळे तसेच लहान बालकांची उपस्थिती होती. प्रारंभी जिजामातेच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. कार्यक्रमाचे आयोजन नवयुवक भीम जयंती मंडळ व सप्तरंगी साहित्य मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने करण्यात आले होते.

यावेळी जिजामातेच्या नावाचा जयघोष करण्यात आला. जिजाऊ वंदना घेण्यात आली. या निमित्ताने बुद्ध विहार परिसरातील बौद्ध उपासक, उपासिका, बालक, बालिका यांची उपस्थिती होती. परिवर्तनाच्या चळवळीतील सर्व महापुरुषांच्या जयंती व स्मृतीदिन साजरे करण्याचा मनोदय यावेळी व्यक्त करण्यात आला.






# बाल संरक्षण समिती कागदावर न राहता प्रत्यक्षात येण्याची गरज : सतीश लोखंडे

आधुनिक केसरी न्यूज

**खुलताबाद :** बाल संरक्षण समिती कागदावरच असुण ती प्रत्यक्षात येण्याची व काम करण्याची गरज आहे. तरच देशातील बालकांचे भविष्य सुंदर आणि सुरक्षित राहील असे परखड मत सामाजिक कार्यकर्ते सतीश देवेंद्र लोखंडे वेरूळकर यांनी गदाना ता. खुलताबाद येथे व्यक्त केले. ते वर्ल्ड विजन संस्थेच्या कार्यक्रमात आयोजित बाल संरक्षण समिती प्रशिक्षण शिबिरामध्ये बोलत होते.

यावेळी श्री लोखंडे बोलताना पुढे म्हणाले की ग्राम पातळीपासून ते महानगरपालिका पातळीपर्यंत सर्वच स्तरांवर बालकांच्या संरक्षणासाठी शासनाकडे बाल संरक्षण समितीची नोंद केलेली असते, त्याद्वारे त्या त्या महानगरपालिकेचे वार्ड अध्यक्ष अथवा ग्राम पातळीवर ग्रामपंचायतचे सरपंच हे बाल संरक्षण समितीचे पदसिद्ध अध्यक्ष असतात. त्याचप्रमाणे वैद्यकीय अधिकारी, शिक्षक, दोन अठरा वर्षाखालील मुले, शाळेतील मुख्याध्यापक, आशाताई आणि अंगणवाडी सेविका, पोलीस स्टेशन मध्ये बाल संरक्षण अधिकारी हेही त्या संरक्षण समितीच्या सदस्य असतात. मात्र ही बाल संरक्षण समिती केवळ कागदावरच असल्याने आणि सामान्य नागरिकांना या समितीचे कार्य आणि महत्त्व माहीत नसल्याने अनेक बालकांचे घरात तसेच बाहेर शोषण होते. अनेक बालके अत्याचारास बळी पडतात यामुळे बालकाचे भविष्य अंधकारमय होत जाते व अपराधी पणाची भावना त्यांच्यात निर्माण होते. हे थांबवायचे असेल तर बाल संरक्षण समितीने कागदावरून प्रत्यक्षात येण्याची गरज आहे. तरच देशातील बालकांचे भविष्य सुंदर आणि सुरक्षित राहील असे यावेळी आयोजित कार्यक्रमात श्री लोखंडे यांनी उपस्थित प्रशिक्षणार्थींना सांगितले.

यावेळी वर्ल्ड विजन संस्थेचे प्रकल्प अधिकारी शैलेश गोफने, प्रकल्प समन्वयक आशिष इंगळे व विनोद घोडके, प्रकल्प संयोजक प्रकाश फुलझेले, फिल्ड ऑफिसर सिद्धार्थ जाधव आणि विकास बनकर, गदाना गावाचे तंटामुक्त अध्यक्ष विष्णू चव्हाण यांच्यासह ग्रामस्थांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.



# कागजीपुरा येथे रस्तेकामाचे लोकार्पण

आधुनिक केसरी न्यूज

**खुलताबाद :**तालुक्यातील कागजीपुरा येथे दोन ठिकाणी रस्ते कामे पुर्ण झाल्यानंतर कामांचे लोकार्पण करण्यात आले.
कागजीपूरा (ता.खुलताबाद) येथे दोन ठिकाणी गाव अंतर्गत सी सी रस्ते करण्यासाठी मी 25-15 व आमदार निधीतून 20 लक्ष रुपयांचा निधी उपलब्ध करून दिला होता. सदरील काम पूर्ण झाले असून आज रोजी मा.आमदार सतिष भाऊ चव्हाण पाटील यांच्या हस्ते या कामाचे लोकार्पण करण्यात आले.
याप्रसंगी राष्ट्रवादी काँग्रेसचे तालुकाध्यक्ष श्री.अनिल चव्हाण, माजी नगराध्यक्ष श्री.हाजी अकबर, कार्याध्यक्ष श्री.जुबेर लाला, ज्ञानेश्वर दुधारे, श्री.ज्ञानेश्वर मातकर, श्री.इब्राहिम शेख, श्री. राजकुमार पांडे, सरपंच श्रीमती नाजरीन कुरेशी, उपसरपंच श्री.अहमद शेख, श्री.शेख मझहर, श्री.शेख आसिफ, श्री. कासीम खान, श्री.शेख मिनाज, श्री.शेख आलीम, श्री.शेख अमिरोद्दीन, श्री.शेख इस्माईल आदींची उपस्थिती होती.

# सरकारचे टपाल तिकिटांमधून राष्ट्रपुरुषांना अभिवादन!

## वने व सांस्कृतिक कार्य मंत्री सुधीर मुनगंटीवार यांचे प्रतिपादन

आधुनिक केसरी न्यूज



**सिंदखेडराजा :** 'डाक विभागाच्या इतिहासात आजपर्यंत कधीही शक्य झाले नाही ते छत्रपती शिवाजी महाराजांच्या ऊर्जेमुळे शक्य झाले. ३५०व्या राज्याभिषेक सोहळ्याच्या निमित्ताने महाराजांवरील टपाल तिकीट अवघ्या सहा दिवसांत प्रकाशित करण्याचा विक्रम झाला. त्यानंतर राज्याच्या सांस्कृतिक विभागाने शहाजी राजांवर, आज राजमाता जिजाऊंवर टपाल तिकीट काढले. आता पुढील महिन्यात छत्रपती संभाजी महाराजांवरील टपाल तिकीट प्रकाशित होणार आहे. राज्य सरकार टपाल तिकिटांच्या माध्यमातून राष्ट्रपुरुषांना अभिवादन करीत आहे, असे प्रतिपादन राज्याचे वने, सांस्कृतिक कार्य व मत्यव्यवसाय मंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी आज (शुक्रवार) केले.

सिंदखेडराजा येथील मातृतीर्थावर राजमाता जिजाऊ यांच्या जयंतीनिमित्त राजमाता जिआऊ यांच्यावरील टपाल तिकीटाचे ना. श्री. सुधीर मुनगंटीवार यांच्या हस्ते विमोचन झाले. यावेळी राज्याचे सहकार मंत्री तसेच बुलढाण्याचे पालकमंत्री ना. श्री. दिलीप वळसे पाटील, सिंदखेडराजाचे आमदार डॉ. राजेंद्र शिंगणे, जळगाव जामोदचे आमदार डॉ. संजय कुटे, खामगावचे आमदार ॲड. आकाश फुंडकर, चिखलीच्या आमदार श्वेताताई महाले, माजी आमदार चैनसुख संचेती, बुलढाण्याचे जिल्हाधिकारी किरण पाटील, भाजप जिल्हाध्यक्ष डॉ. गणेश भांटे, माजी आमदार विजयराज शिंदे, संभाजीनगरचे पोस्ट मास्टर जनरल अदनान अहमद, राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष नाझीर काझी, भाजप जिल्हाध्यक्ष सचिन देशमुख, सिंदखेडराजाचे नगराध्यक्ष सतीश तायडे यांची व्यासपीठावर प्रमुख उपस्थिती होती.

सुधीर मुनगंटीवार म्हणाले, 'राजमाता जिजाऊंनी छत्रपती शिवाजी महाराजांवर धर्मसंस्कार केले, त्यांना युद्धनिती शिकवली. या संस्कारामुळे छत्रपती शिवाजी महाराजांचा विचार जगाला रयतेची सेवा करण्याचा संकल्प देणारा ठरला. जगाला जाणता राजा देणाऱ्या सिंदखेडला आणि मातृतीर्थाला माझे कोटी कोटी नमन.' सिंदखेडराजाचा विकास आराखडा लवकरात लवकर मंजूर होऊन गुणवत्तापूर्ण विकासकामे होण्यासाठी पाठपुरावा करणार असल्याचेही त्यांनी यावेळी सांगितले.

'छत्रपती शिवाजी महाराजांच्या ३५०व्या राज्याभिषेक दिन सोहळ्याच्या निमित्ताने राज्य सरकारने अनेक उपक्रम राबविले आणि अनेक निर्णय देखील केले. ज्या क्रूर अफजलखानाचा महाराजांनी वध केला, त्याची कबर बांधून केलेले अतिक्रमण सरकारने तोडले. आता त्याच ठिकाणी शिवाजी महाराज वाघनखांनी अफजलखानाचा वध करतानाचे शिल्प उभारण्याचा निर्धार आम्ही केला आहे. महाराजांनी ज्या वाघनखांनी अफजलखानाचा कोथळा बाहेर काढला, ती वाघनखे देखील ब्रिटनवरून भारतात येणार आहेत.

आम्ही पुणेकर आणि राज्य सरकारच्या वतीने भारत-पाकिस्तान सीमेवर पाकिस्तानच्या दिशेने तलवार घेऊन असलेला छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याचे अनावरण झाले. या सोहळ्याला दीड हजारांहून अधिक भारतीय जवान उपस्थित होते,' असेही ना श्री. मुनगंटीवार म्हणाले.



## एक्सलन्स ॲवार्डने संतोष पवार सन्मानित

आधुनिक केसरी न्यूज

**लोणंद :** गेली अनेक वर्षापासून पत्रककारिता क्षेत्रात उल्लेखनीय अशी कामगिरी करणारे खंडाळा तालुका मराठी पत्रकार संघाचे अध्यक्ष व दै.पुण्यनगरीचे तालुका प्रतिनिधी संतोष पवार यांच्या कार्याची दखल घेऊन त्यांना पुण्यनगरी मिडिया ग्रुपच्यावतीने एक्सलन्स ॲवार्डने सन्मानित करण्यात आले.या ॲवार्डबद्दल त्यांचे पत्रकारिता क्षेत्रासह विविध क्षेत्रातील मान्यवरांकडून अभिनंदन करण्यात येत आहे.

आ.मकरंद पाटील,जि.प चे माजी अध्यक्ष,उदय कबुले,माजी उपाध्यक्ष नितिन भरगुडे पाटील,

जिल्हा बँकेचे संचालक दत्तानाना ढमाळ,माजी कृषी सभापती मनोज पवार ,युवा नेते विराज शिंदे , माजी सभापती रमेश धायगुडे -पाटिल,राजेंद्र तांबे , एस.वाय.पवार,खंडाळच्या नगराध्यक्षा उज्वला संकपाळ,माजी पं.स सदस्य चंद्रकांत यादव, भाजपाचे जिल्हा सरचिटणीस अतुल पवार यासह सामाजिक,राजकीय व पत्रकारिता क्षेत्रातील लोकांनी प्रत्यक्ष व अप्रत्यक्षरित्या अभिनंदन केले .

पुण्यनगरी मिडिया ग्रुप व इतर सामाजिक संस्थांनी संतोष पवार कामाचा नेहमीच गौरव केला आहे. नुकत्याच झालेल्या बैठकीत त्यांच्या कामाची दखल घेऊन त्यांना जनता बँकेचे पॅनलप्रमुख व संपादक विनोद कुलकर्णी,जाहिरात व्यवस्थापक संतोष कदम व प्रमुख मान्यवरांच्या हस्ते मानाचा एक्सलन्स ॲवार्ड देऊन सन्मानित करण्यात आले.

यावेळी सातारा जिल्ह्यातील पुण्यनगरी मिडियाचे प्रतिनिधी उपस्थित होते.संतोष पवार हे खंडाळा तालुक्यातील अहिरे गावचे सुपुत्र असून त्यांनी गत सतरा वर्षापूर्वी पत्रकारितेत पदार्पण केले.

तालुक्यातील विविध विषयावर त्यांनी सडेतोडपणे लिखाण करत आलेले आहेत.तालुक्यातीलऔद्योगिकरण,पाणीप्रश्न, दुष्काळ व विविध विषयावर त्यांनी केलेले लेखन नेहमीच दिशादर्शक ठरले आहे.

## वेरूळ येथे महर्षी ज्ञानयुग दिवस उत्साहात

आधुनिक केसरी न्यूज

**वेरूळ :** येथील महर्षी वेद विज्ञान विद्यापीठ येथे शुक्रवार दिनांक 12 रोजी महर्षी ज्ञानयुग दिवस साजरा करण्यात आला. महर्षी महेश योगी यांची 107 वी जयंती निमित्ताने सदरील महर्षी वेद विज्ञानयुग दिवस वेरूळ येथील वेद विज्ञान विद्यापीठ येथे साजरा करण्यात आला. येथील वेदांचे शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना फलाहार आणि मिष्ठान्न देण्यात आले. तसेच विश्वशांती हेतू विद्यार्थ्यांनी गुरुपूजन करून स्वस्तिवाचन आणि शांतीपाठही करण्यात आला.

यावेळी दत्ताश्रम टाकाचे श्री विद्या वामदेव तीर्थ स्वामी आणि श्री स्वामी दिव्यानंदगिरीजी महाराज, माजी उपसभापती विजय भालेराव, सामाजिक कार्यकर्ते सतीश लोखंडे वेरूळकर, संतोष सोनवणे, मयूर पाटणी, अमोल गवळी आश्रम व्यवस्थापक गोविंद सिंग, आचार्य राजेश मिश्रा यांच्यासह विद्यार्थ्यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.



## सायबर लुटारूंनी केली लाखांची फसवणूक

आधुनिक केसरी न्यूज

**अमरावती :** जिल्ह्यात सायबर गुन्ह्यांत मोठी वाढ झाली असून त्यामध्ये ऑनलाइन आर्थिक फसवणूकीच्या सर्वाधिक घटना घडल्या आहेत. शहरातील दोन बेरोजगार युवकांसह तिघांची सायबर भामट्यांनी १९.५७ लाख रुपयांची फसवणूक केल्याचा प्रकार समोर आला आहे. येथील प्रतीक गजाननराव चिकटे (३०, रा. गुरूकृपा कॉलनी) यांनी दिलेल्या तक्रारीनुसार एकूण चार आरोपींनी त्यांना टेलिग्राम आणि समाज माध्यमांवर खोटे संदेश पाठवून ऑनलाईन हॉटेल बुकिंगच्या अर्धवेळ नोकरीचे आणि चांगल्या पगाराचे आमिष दाखवले. वेगवेगळी कारणे सांगून त्यांच्याकडून ऑनलाईन रक्कम मागविण्यात आली. अशा पद्धतीने चार सायबर भामट्यांनी त्यांची १३ डिसेंबर ते २० डिसेंबर २०२३ या कालावधीत तब्बल १० लाख ३८ हजार ७४४ रुपयांची फसवणूक करण्यात आली. दुसऱ्या घटनेत एका युवकाची ४ लाख ३४ हजार रुपयांची फसवणूक करण्यात आली. तक्रारकर्ते हितेश संजय नानवाणी यांचा कापडाचा व्यापार आहे. भामट्यांनी टेलिग्राम प्लॅटफॉर्मच्या माध्यमातून संपर्क साधला आणि ब्राईट ऑप्शन कंपनीमध्ये चांगल्या पगाराची नोकरी मिळवून देण्याचे आमिष दाखविले.

## आयुष्मान भारतचे 80 हजार कार्डधारक

आधुनिक केसरी न्यूज

**वैजापूर :** आयुष्मान योजना नागरिकांसाठी मोठी दिलासादायक ठरत असून या योजनेतर्गंत आतापर्यंत वैजापूर तालुक्यात ८० हजारांहून अधिक नागरिकांचे आयुष्मान कार्ड तयार करण्यात आले आहे असून एक लाख नागरिकांची कार्ड लवकरच तयार होणार आहे यासाठी महसूल विभाग बरोबरच आरोग्य विभागही प्रयत्नशील असून आयुष्मान कार्ड घेणाऱ्या रुग्णांना मोफत उपचार मिळणार आहेत.

आयुष्मान भारत- प्रधानमंत्री जनआरोग्य योजना अंतर्गत पात्र कुटुंबांची आयुष्मान भारत ई-केवायसी करण्याचे काम केले जात आहे. ग्रामपंचायत स्तरावर आणि शहरी भागात आयोजित केलेल्या शिबिरांमध्ये आयुष्मान कार्ड देखील बनवले जात आहेत. भारत विकास संकल्प यात्रेत अलीकडे या शिबिरांमध्ये नवीन कार्ड बनविण्यास सुरवात झाली आहे, तर गेल्या वर्षीपर्यंत सुमारे 80 हजार वैजापूरवासीयांना कार्ड मिळाले आहेत. भारत विकास संकल्प यात्रेच्या कार्यक्रमात आता केंद्र सरकारने मोठा निर्णय घेत योजनेचा विस्तार करण्याचा निर्णय घेतला आहे. त्यामुळे वैजापूर तालुक्यातील एक लाख नागरिकांना याच लाभ होणार आहे. नव्याने आणखी एक लाख नागरिकांना आयुष्मान कार्ड देण्याचा सरकारने संकल्प केला आहे. एक लाखाहून अधिक नागरिकांना लाभ देण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. उद्दिष्टात राहिलेल्या लाभार्थ्यांची कार्ड बनविण्याची प्रक्रिया ई-केवायसी करून पूर्ण केली जाईल, जेणेकरून लाभार्थ्यांना आयुष्मान भारत योजनेचा लाभ घेता येईल.आरोग्य विभाग आयुष्मान कार्ड बनविण्याचे काम सातत्याने करत आहे. यासंदर्भात तहसीलदार सुनील सावंत यांनी एका झालेल्या बैठकीत कठोर सूचना दिल्या आहेत. शक्य टक्के टार्गेट लवकरात लवकर पूर्ण करावे आणि वैद्यकीय विभागातील सर्व कर्मचाऱ्यांना ई-केवायसीचे टार्गेट देण्यात यावे. असे त्यांनी सांगितले आहे. आरोग्य अधिकारी व संबंधित अधिकाऱ्यांना तसे आदेश दिले आहेत.

> असंसर्गजन्य आजारांची तपासणी, क्षयरोग तपासणी व अनेक आजारांनी ग्रस्त असलेल्या लोककल्याणकारी योजनांपासून वंचित असलेल्या नागरिकांना योजनांशी जोडून त्यांना योजनांचा लाभ घेण्यासाठी प्रवृत्त करण्यात येत आहे. याअंतर्गत या शिबिरांमध्ये आयुष्मान कार्डचे वाटप करण्यात येत आहे. बनविण्याचे काम सुरू असून सर्वसामान्य नागरिकांनी शिबिरात आधारकार्ड व मोबाईल सोबत आणावेत, जेणेकरून शिबिरात कार्ड बनवता येईल.
> **जी. एस. इंदूरकर, आरोग्य अधिकारी, वैजापूर**




हिवराळे क्लिनिक ॲण्ड हर्बल हेल्थ केअर
9130174444
डॉ. के.बी. हिवराळे
आयुर्वेद जनरल फिजिशियन, ॲक्युपंक्चर तज्ज्ञ
B.A.M.S., N.D.,C.M.S.& Ed(MUMBAI)
R.No.2366/12/2000
एमसीए/2022/10/बी/000839 बॉम्बे नर्सिंग होम परवाना क्र.218, औरंगाबाद
उपलब्ध सुविधा
- जुनाट सांधे दुखी (गुडघे दुखी)
- आम वात उदर रोग
- दमा व ॲलर्जी (जुनाट)
- चिकन गुनिया
- मनोकयीईक आजार
- त्वचा व गुप्त रोग
- स्त्रीयांचे आजार
- स्थूलपणा, मूळव्याध
- वंध्यत्व, संतती प्राप्ती
- कॅन्सर सल्ला, मुतखडा
- वजन वाढविणे
- वजन कमी करणे
- केसांच्या सर्व तक्रारी
- लहान मुलांची
- स्मरणशक्ती वाढविणे
पंचकर्म सुविधा (मुख्यकार्य) 1) वमन, 2) विरेचन, 3) बस्ती, 4) नस्य, 5) रक्तमोक्षन

अजिंठा रोड, सारा कॉलनी, फुलंब्री, ता. फुलंब्री, जि. औरंगाबाद

# जग विज्ञानाने पुढे गेले आहे, तरीही त्यामध्ये अज्ञान दिसत आहे : बनकर

आधुनिक केसरी न्यूज



**लोणंद :** अंधश्रद्धा म्हणजे एखाद्या गोष्टीवर आंधळेपणाने विश्वास ठेवणे.आपण आपली बुद्धी पुराणात आणि व्रतवैकल्य अडकवलेली आहे.अंधश्रद्धा,अनिष्ट रूढी यांना राष्ट्रमाता जिजाऊ यांनी आपल्या कृतीतून तिलांजली दिली होती. महात्मा फुले आणि सावित्रीबाई फुले यांनी शिक्षणाची दारे खुली करून माणसाला सुज्ञ केले. बुद्धी प्रामाण्यवादी स्वामी विवेकानंदानी रूढी परंपरा बाजूला ठेवून मानवतेचे विचार समाजात रुजविले. भारतामध्ये आजही भोंदू बाबा सर्वसामान्य माणसाचा मानसिक, शारीरिक,
आर्थिक छळ मोठ्या प्रमाणे करताना दिसत आहेत.आजचे जग विज्ञानाने पुढे गेले आहे पण तरीही त्यामध्ये अज्ञान दिसत आहे. देशातील माणुस कितीही शिकला तरी तो विज्ञानाच्या अंगाने विचार करताना दिसत नाही.माणसांमध्ये शिक्षणाने वैज्ञानिक दृष्टिकोन येत नाही तो विवेकी विचाराने निर्माण होत असतो. स्वतःचा विकासाबरोबर समाजाच्या विकासाची ही जाणीव आपण ठेवली पाहिजे. विज्ञाननिष्ठ समाज व्यवस्था निर्माण होणे गरजेचे आहे. प्रत्येकाने विज्ञाननिष्ठ सुसंस्कारी वाचन करणे आवश्यक आहे. त्याचबरोबर आपली संस्कृती जपणे काळाची गरज आहे.असे प्रतिपादन पाडेगाव सामाजिक विकास फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष व सामाजिक कार्यकर्ते गिरीश बनकर यांनी केले.
लोणंद येथील रयत शिक्षण संस्थेचे शरदचंद्र पवार महाविद्यालयात मराठी विभाग व विवेक वाहिनी समिती आयोजित शिवाजी विद्यापीठ अग्रणी महाविद्यालय योजनेअंतर्गत विवेक वाहिनी समिती उद्घाटन व विशेष व्याख्यान कार्यक्रम घेण्यात आला होता.यावेळी गिरीश बनकर प्रमुख व्याख्याते म्हणून बोलत होते.या उद्घाटन समारंभाचे आयोजन महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ.बाळासाहेब जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले होते.व्याख्यानाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे कला विभागाचे उपप्राचार्य भीमराव काकडे होते.या व्याख्यानाचे प्रास्ताविक,स्वागत व परिचय मराठी विभाग प्रमुख प्रा. सुभाष कदम करून दिला. यावेळी विचार पीठावर वाहिनी समितीचे चेअरमन प्रा.सुभाष कदम, शिवाजी विद्यापीठ अग्रणी कॉलेज योजना समन्वयक प्रा.डॉ.संदीप शिंदे,हिंदी विभाग प्रमुख एम.डी.नायकू,पाडेगाव सामाजिक विकास फाउंडेशनचे संचालक प्रशांत ढावरे आदी मान्यवर उपस्थित होते.मराठी विभागातील प्रा.सतीश कांबळे शिक्षक शिक्षकेत्तर सेवक विद्यार्थी विद्यार्थिनी बहुसंख्येने उपस्थित होते.या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व मान्यवरांचे आभार डॉ.कोकिळा चांगण यांनी मानले.

# मनानं श्रीमंत असणारी माणसंच समाज घडवतात

## प्रा. नितीन बानगुडे पाटील

आधुनिक केसरी न्यूज



**बि.डी. रामपूरकर**

**जिंतूर :** आपला वर्तमान व भविष्यकाळही उज्ज्वल करता आला पाहिजे, मनानं श्रीमंत असणारी माणसंच समाज घडवतात असे प्रतिपादन व्याख्याते प्रा.नितीन बानगुडे-पाटील यांनी केले. ते जिंतूर तालुका मराठी पत्रकार संघ ' यांच्या कडून गुरुवार ११ जानेवारी रोजी शहरातील जुनी मुन्सफी येथे आयोजित ' चला भविष्यावर बोलू काही ' कार्यक्रमात पाटील बोलत होते.
शिवरायांकडून कसे जगावे हे शिकावे, तर संभाजी राजांकडून कसे मरावे हे शिकावे. प्रतिकूल परिस्थिती अनुकूल कशी करावी हे छत्रपती संभाजी राजांचे चरित्रअभ्यासले की लक्षात येते. आपला इतिहास उज्ज्वल आहे. तसाच आपला वर्तमान व भविष्यकाळही उज्ज्वल करता आला पाहिजे, असे प्रतिपादन व्याख्याते प्रा. नितीन बानगुडे-पाटील यांनी केले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी आमदार मेघना बोर्डीकर, प्रमुख पाहुणे मुकुंद सावजी कळमकर,प्राचार्य श्रीधर भोंबे,प्राचार्य आर टी पाचकोरएड मनोज सारडा, रमण तोष्णीवाल, अँड.गोपाळ रोकडे, एड विनोद राठोड,सचिन देवकर, सत्यनारायण शर्मा, देवेंद्र भूरे,गजानन व्हाड,प्रिया देशमुख,कृपा चौधरी, मुफ्ती कलीम बेग मिर्झा, यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवरांची उपस्थिती व्यासपीठावर यावेळी होती.पुढे बोलतांना पाटील म्हणाले की, ध्येय उंच असले की झेप देखील उंच घ्यावी लागते त्यामुळे संघर्ष हेच प्रगतीच आमंत्रण आहे. जो स्वीकारतो तोच पुढे जातो विद्यार्थ्यांनी परिस्थितीचे कुठलेही कारण न देता येणाऱ्या प्रत्येक अडचणीना स्वीकारले पाहिजे यामध्येच आपल्याला वाट मिळत असते. त्यामुळे आपल्या नियतीचे मालक बना पण परिस्थितीचे गुलाम बनू नका, असे यावेळी बोलताना बानगुडे पाटील यांनी विद्यार्थांसह उपस्थित प्रेक्षकांना मार्गदर्शन केले.
या वेळी बोलताना आ मेघना बोर्डीकर यांनी सांगितले की शहरात नाट्यगृहासाठी पाच कोटी रुपयांचा निधी उपलब्ध झाला होता.परंतु जागे अभावी नाट्यगृह होऊ शकले नाही. येत्या काळामध्ये आपण नाट्यगृहासाठी जागा उपलब्ध करू आणि शहरातील रसिक प्रेमींसाठी सुसज्ज असे नाट्यगृह उभारणीसाठी प्रयत्न करू तालुक्यातील विविध प्रश्न, पत्रकारांना पक्के घर बांधण्यासाठी आपण विधानसभेत पाठपुरावा करु व पत्रकारांचे विविध प्रश्न आपण सोडविण्यासाठी तत्पर असल्याचे यावेळी आमदार बोर्डीकर यांनी सांगितले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक सन्फहाचे अध्यक्ष शेख शकील सूत्रसंचालन मो या शेख तर आभार शहजाद पठाण यांनी मानले. कार्यक्रमासाठी यशवी करण्यासाठी मराठी पत्रकार संघाच्या सर्व पदाधिकाऱ्यांनी परिश्रम घेतले या कार्यक्रमाला विद्यार्थी, महिलासह, नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.



# साहित्यिक अय्युब पठाण यांच्या कष्टाच्या वाटा बाल कथासंग्रहाचे थाटात प्रकाशन

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :** विशाल बहुउद्देशीय प्रतिष्ठाण आणि मराठवाडा साहित्य परिषद शाखा पैठण तथा संभाजीनगर येथील मराठवाडा साहित्य परिषदेच्यावतीने १ ले मराठवाडा बालकुमार साहित्य संमेलनात पैठण तालुक्याचे प्रसिद्ध बाल साहित्यिक अय्युब पठाण लोहगांवकर यांचा बाल मनावर सुसंस्कार करणारा दर्जेदार बाल- किशोर- कुमारासाठी वाचनीय असलेला " कष्टाच्या वाटा " या बाल कथासंग्रहाचे प्रकाशन नुकतेच नांदेड येथील प्रसिद्ध बाल साहित्यिक तथा संमेलनाचे अध्यक्ष डॉ. सुरेश सावंत यांच्या हस्ते माहेश्वरी धर्मशाळा पैठण येथे थाटात करण्यात आले. यावेळी व्यासपीठावर संभाजीनगर म.सा.प.चे अध्यक्ष प्राचार्य कौतिकराव ठाले पाटील,कार्यवाह डॉ. दादा गोरे, उपाध्यक्ष किरण सगर, कोषाध्यक्ष कुंडलिक अतकरे, प्रसिद्ध बाल साहित्यिक बाबा भांड, उद् घाटक दिपक नागरगोजे आयोजक तथा स्वागताध्यक्ष प्रा. संतोष तांबे, डॉ. ऊर्मिला चाकूरकर प्रा. संतोष गव्हाणे यांची व्यासपीठावर विशेष उपस्थिती होती. याप्रसंगी संमेलनात मराठवाडयातील सहभागी बाल साहित्यिक आणि पैठण येथील विविध शाळेतील शिक्षक- विद्यार्थी मोठया संख्येने उपस्थित होते.

# शालेय व्यवस्थापन समितीच्या अध्यक्षपदी मारोती घायाळ यांची निवड

आधुनिक केसरी न्यूज

**श्रीक्षेत्र राजूर :** लोणगाव येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा घायाळ वाडी शाळेत नुकतीच शालेय व्यवस्थापन समिती स्थापन करण्यात आली. यावेळी अध्यक्ष म्हणून मारोती घायाळ तर उपाध्यक्ष म्हणून धम्मदीप झिने यांची एकमताने निवड करण्यात आली. त्यांच्या निवडीबद्दल ग्रामस्थांकडून अभिनंदन करून नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांना शुभेच्छा देण्यात आल्या. यावेळी उद्धव घायाळ, कुंडलिक घायाळ, दत्ता घायाळ, विलास हिरगुडे, गणेश घायाळ, मंदा घायाळ, मुख्याध्यापक भगवान घायाळ, रामेश्वर खंडागळे यांसह पालक व विद्यार्थी उपस्थित होते.



# आत्महत्येचा प्रयत्न करणाऱ्यावर गुन्हा

आधुनिक केसरी न्यूज

**यवतमाळ :** शेतातील नाला वळविण्यात आल्याने पिकांचे नुकसान झाले. वारंवार मागणी करून न्याय मिळत नसल्याने शेतकऱ्याने आर्णी तहसीलदार परशराम भोसले यांच्या कक्षात विषारी औषध प्राशन करून आत्महत्या करण्याचा प्रयत्न केला. या प्रकरणी तहसीलदारांनी शेतकऱ्याला न्याय देण्याऐवजी त्याच्या विरोधात शासकीय कामात अडथळा आणल्याप्रकरणी गुन्हे दाखल केले. आर्णी तहसील प्रशासनाच्या या कारभाराविरोधात सर्व स्तरातून तीव्र संताप व्यक्त होत आहे. गौतम गेडे (रा. जवळा, ता. आर्णी) असे विष प्राशन करणाऱ्या शेतकऱ्याचे नाव आहे. त्यांनी नववर्षच्या पहिल्याच १ जानेवारी रोजी आर्णी तहसीलदार परशराम भोसले यांच्या कक्षात विष प्राशन करून आत्महत्या करण्याचा प्रयत्न केला. या प्रकरणी तहसीलदार भोसले यांनी आर्णी पोलीस ठाण्यात तक्रार दिली. त्यावरून शासकीय कामात अडथळा निर्माण करण्यात आल्याचा गुन्हा दाखल करण्यात आला. यावर आमदार डॉ. संदीप धुर्वे यांनी संताप व्यक्त केला.अधिकाऱ्यांनी शेतकऱ्यांशी सन्मानाने वागावे, असा इशारा त्यांनी दिला आहे.



# भारताला नारीमुक्तीची नाही, तर नारी शक्तीची गरज

## साध्वी ऋतंभरा दीदी यांचे प्रतिपादन

आधुनिक केसरी न्यूज

**पुणे :** आपल्या देशात नारी मुक्तीचा विचार सातत्याने मांडला जात असला, तरी भारताची श्रेष्ठ परंपरा लक्षात घेता आपल्या देशाला नारी मुक्तीची नव्हे, तर नारी शक्तीची गरज असल्याचे स्पष्ट प्रतिपादन साध्वी ऋतंभरा दीदी यांनी शुक्रवारी केले. राजमाता जिजाऊ यांची ४२५ वी जयंती आणि स्वामी विवेकानंद यांच्या १६१ व्या जयंतीच्या निमित्ताने स्वामी विवेकानंद प्रतिष्ठान आणि माय होम इंडिया यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमात विविध क्षेत्रात कार्य करणाऱ्या कर्तृत्ववान महिलांना 'राजमाता जिजाऊ गौरव पुरस्कार' तसेच युवकांना 'स्वामी विवेकानंद युवा पुरस्कार' देऊन सन्मानित करण्यात आले. याप्रसंगी साध्वी ऋतंभरा दीदी बोलत होत्या.
'माय होम इंडिया'चे संस्थापक सुनील देवधर यांच्या संकल्पनेतून संपन्न झालेल्या या पुरस्कार प्रदान सोहळ्यात यावेळी व्यासपीठावर राम मंदिर निर्माण आंदोलनाच्या अग्रणी नायिका दीदी साध्वी ऋतंभरा, स्वामी जितेन्द्रानंद सरस्वती, जेएनयुच्या कुलपति शांतिश्री धूलिपुडी पंडित, पद्मश्री मिलिंद कांबळे, सुनील देवधर आणि दिनेश होले उपस्थित होते. यावेळी पुण्याच्या माजी महापौर आणि आमदार स्व. मुक्ता टिळक यांना राजमाता जिजाऊ गौरव पुरस्काराने मरणोत्तर सन्मानित करण्यात आले. हा पुरस्कार कुणाल टिळक यांनी स्वीकारला.

याप्रसंगी भाजपचे शहराध्यक्ष धीरज घाटे, आमदार सिद्धार्थ शिरोळे, विश्व हिंदू परिषदेचे अखिल भारतीय कार्यकर्ते दादा वेदक, राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे पदाधिकारी मा. का. देशपांडे, विज्ञान भारतीचे काशीनाथ देवधर, जनसेवा बँकेचे संस्थापक वसंतराव देवधर, उद्योजक गजेंद्र पवार, ईशान्य भारतातील कार्यकर्ते प्रशांत जोशी, ॲड. सत्यम सुराणा यांच्यासह आदींची उपस्थिती होती.
स्त्रिया स्वतंत्र असल्याचे चित्र जगभरातील इतर देशात निर्माण केले गेले असले तरी भारतातील स्त्रियांना जो सन्मान दिला जातो, तसा सन्मान मला विश्वात कुठेही दिसला नाही. असे सांगून साध्वी ऋतंभरा दीदी म्हणाल्या समाजात स्वतःचे स्थान महिलांना स्वतः निर्माण करता येते, तप, साधनेने हे शक्य आहे. अनाथाश्रम, वृद्धाश्रम, बालकाश्रम ही व्यवस्था समाजासाठी आदर्श व्यवस्था होऊ शकत नाही. कुटुंब आणि संस्कार यातून महिला आदर्श निर्माण करू शकतील. अयोध्येत श्रीराम मंदिर भूमिपूजन प्रसंगी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी दंडवत प्रणाम केला, परंपरेचा असा सन्मान करणारे ते पहिले पंतप्रधान आणि देशाचे सुपुत्र आहेत. असे साध्वी ऋतंभरा दीदी म्हणाल्या. अयोध्येत २२ जानेवारी रोजी राम येत आहेत. माझ्या आनंदाला खरोखरच पारावार राहिलेला नाही, असेही त्या म्हणाल्या.कार्यक्रमात स्व. मुक्ता टिळक (मरणोत्तर) - क्षेत्र राजकीय, डॉ. सुचित्रा कराड-नागरे – शैक्षणिक, ममता सपकाळ - सामाजिक,




उषा माळी - शैक्षणिक, उषा वाजपेयी - राजकीय, पुष्पाताई वागळे - राजकीय, सीमा चांदेकर - चित्रपट , शुभांगी भालेराव - सामाजिक, अंजली व नंदिनी गायकवाड गायिका - संगीत, शैला नाईक - प्राणीमित्र, डॉ. सुप्रिया पुराणिक - वैद्यकीय, प्रतिभा चंद्रन - पत्रकारिता, गीता पेडणेकर - उद्योग, नंदाताई बराटे - सामाजिक, सी. ए. रचना रानडे - आर्थिक, डॉ. जयश्री तोडकर - वैद्यकीय, पुष्पाताई वागळे - राजकीय, शैला देशपांडे - क्षेत्र समाजसेवा, यांना राजमाता जिजाऊ गौरव पुरस्काराचे सन्मानित करण्यात आले. यासोबत वीव्ध क्षेत्रात अतुलनीय कामगिरी करणाऱ्या १४३ महिलांचा विशेष सन्मान करण्यात आला.
त्याचप्रमाणे तुषार दामगुडे, सुखदेव अडागळे, किशोर चव्हाण, शिवशंकर स्वामी, आशुतोष मुगळीकर, निलेश भिसे,अविनाश तायडे, आशुतोष झा, दत्तात्रेय मिरगणे पाटील, निलेश धायरकर, आनंद जाधव, महेश पवळे यांना विवेकानंद युवा पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.
स्वामी विवेकानंद आणि हिंदुत्व यांना आम्ही एक

> राष्ट्राच्या उद्धारासाठी सर्व महिलांनी राजमाता जिजाऊ आणि क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांचा आदर्श घेण्याची गरज आहे . छत्रपती शिवाजी महाराजांना जिजाऊंनीच हिंदवी स्वराज्याची प्रेरणा दिली . भारताला विकसित करण्यासाठी, आपल्या युवा पिढीसमोर जिजाऊंचाच आदर्श आहे . युवक आणि युवतींनी जिजाऊंचा आदर्श घेऊनच जीवनात वाटचाल करावी .

दुसऱ्याचा पर्याय मानतो. महिलांना सर्व भौतिक स्वातंत्र्य पश्चिमी देशात आहे. मात्र सन्मान आणि खरे स्वातंत्र्य भारतातच आहे, असे ठाम प्रतिपादन स्वामी जितेंद्रानंद सरस्वती यांनी केले.
राजमाता जिजाऊ ह्या एक माता आणि थोर आचार्य होत्या. पुणे शहर माझी कर्मभूमी आहे. पुण्यासारखे चांगले लोक मी इतर ठिकाणी पाहिले नाहीत. पुण्यासारख्या सुसंस्कृत शहराचे नेतृत्व सुनील देवधर यांनी करावे, अशी अपेक्षा डॉ. शांतिश्री धुलीपुडी पंडित यांनी व्यक्त केली.
माय होम इंडियाचे संस्थापक सुनील देवधर यांचे कार्य देशभर सुरु आहे आणि पुणे हे ही त्यांचे 'होम'च आहे. पंतप्रधान मोदी यांच्या धोरणांचा परिणाम आहे की, तरूणांनी स्टार्टअपच्या माध्यमातून क्रांती केली आहे, साडे चार लाख लोकांना रोजगार एकशे सोळा स्टार्टअप युनिकॉन आहेत. नव्या युगातला हेच तरूण उद्योजक जगाला दिशा देतील, शिखरावर पोहचवतील. असे प्रतिपादन पद्मश्री डॉ. मिलिंद कांबळे यांनी केले.

# कॅन्सर जागरूकता निर्माण करण्यासाठी जागतिक कर्करोग दिवशी 'सिग्माथॉन'चे आयोजन

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :** कॅन्सरबद्दल जागरुकता वाढवण्यासाठी "सिग्माथॉन" मॅरेथॉन, दरवर्षी प्रमाणे या वर्षी देखील आयोजन करण्यात आले आहे . ०४ फेब्रुवारी रोजी जागतिक कर्करोग दिवस म्हणून साजरा करण्यात येतो . याच्या उद्देश्य कॅन्सर जनजागृती करणे , लोकांना या बदल माहिती करून देणे , घाबरून न जाणे , प्रतिभांधात्मक तपासणी , योग्य उपचार या वर माहिती सांगणे. कॅन्सर देखील वेळेवर उपचार घेतल्यावर बर्रा होतो अशे सांगणे . केअर सिग्मा हॉस्पिटल औरंगाबाद तर्फे ०४ फेब्रुवारी 2024 आयोजित करण्यात आले आहे . संपूर्ण मराठवाड्यातून मोठ्या प्रमाणात स्पर्धक सहभागी होतात.
मॅरेथॉन स्पर्धेत विविध कौशल्य स्तरावरील धावपटूंसाठी 3 KM, 5 KM आणि 10 KM या तीन श्रेणी असतील. हा कार्यक्रम प्रख्यात डॉक्टर्स आणि आरोग्यसेवा व्यावसायिकांच्या संयुक्त विद्यमाने



आयोजित करण्यात आला आहे, त्यात डॉ. उन्मेश टाकळकर, डॉ. मनीषा टाकळकर, , श्री. मनोज रॉय आणि डॉ. प्रफुल्ल जटाळे व संपूर्ण डॉक्टरांची टीम हे उपस्थित राहणार आहेत व उपस्थित सहभागींना कर्करोग प्रतिबंध आणि लवकर ओळख या बद्दल योग्य मार्गदर्शन देखील करतील. या कार्यक्रमाविषयी बोलताना डॉ. उन्मेश टाकळकर म्हणाले, "आम्ही सिग्माथॉनचे आयोजन करण्यास उत्सुक आहोत आणि या कार्यक्रमाद्वारे कॅन्सरबद्दल जागरूकता निर्माण करण्याची आशा आहे. आमच्या आरोग्यसेवा व्यावसायिकांच्या टीमच्या मदतीने, लोकांना लवकर निदान करण्याच्या महत्त्वाविषयी शिक्षित आणि कर्करोगाचा प्रतिबंध करण्याचे आमचे ध्येय आहे.." या मध्ये कॅन्सर पासून बरे झालेले रुग्ण देखील असणार आहेत व समाजासाठी हा एक सकारात्मक विचार पुढे नेणार आहे. यात विविध वयोगटातील स्पर्धकणा बक्षिह देखील आहे.आरोग्य जागृती साठी पोस्टर प्रदर्शन स्पर्धा आयोजित केली आहे. हि मॅरेथॉन सिग्मा हॉस्पिटल ते डेअरी सिग्नल वापस दर्गाह , मंदिर आणि सेव्हन हिल पासून वापस सिग्मा ला संपेल. हा कार्यक्रम सहभागी होऊ इच्छिणाऱ्या प्रत्येकासाठी खुला आहे आणि हॉस्पिटलच्या वेबसाइटला भेट देऊन किंवा हॉस्पिटलमधील नोंदणी काउंटरला भेट देऊन नोंदणी केली जाऊ शकते. मोठ्या संख्येने सहभागी होवून हा कार्यक्रम यशस्वी होईल अशी अपेक्षा आहे. CIIGMATHON बद्दल अधिक माहितीसाठी कृपया 9422625978 येथे हॉस्पिटलशी संपर्क साधा. नाव नोंदणी ची अंतिम तारीख २०-०१-२०२४ ही आहे.

# पुणेरी मेट्रो स्थानकांत स्वतंत्र वाहनतळाची सुविधा

आधुनिक केसरी न्यूज

**पुणे :** पुणेरी मेट्रोचे काम पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाकडून (पीएमआरडीए) सुरू आहे. हिंजवडी ते शिवाजीनगर मार्गावरील या मेट्रोच्या स्थानकांना काही ठिकाणी वाहनतळासाठी जागा मिळत नसल्याने कोंडी झाली होती. यावर पीएमआरडीएने महापालिकेकडे आरक्षित भूखंडांची मागणी केली होती. महापालिकेने मेट्रो स्थानकांच्या १०० ते ४०० मीटर अंतरातील आठ भूखंड देण्याची तयारी दर्शविली असून, त्यावर लवकरच अंतिम निर्णय होणार आहे. पुणेरी मेट्रोची एकूण २३ स्थानके आहेत. त्यांपैकी केवळ माण, बालेवाडी आणि शिवाजीनगर या तीनच स्थानकांना वाहनतळासाठी जागा मिळाली आहे. इतर स्थानकांना वाहनतळासाठी जागा मिळत नसल्याने पीएमआरडीएने अखेर महापालिकेकडे धाव घेतली.

याबाबत पीएमआरडीएने मागील महिन्यात महापालिका आयुक्त विक्रम कुमार यांना पत्र पाठविले. त्यात बाणेर आणि बालेवाडी परिसरातील आठ आरक्षित भूखंडांची मागणी करण्यात आली आहे. पीएमआरडीएला हे भूखंड मिळाल्यास बालेवाडी क्रीडा संकुल, एनआयसीएमएआर, रामनगर, लक्ष्मीनगर, बालेवाडी फाटा, बाणेरगाव आणि बाणेर या सात मेट्रो स्थानकांना वाहनतळासाठी स्वतंत्र जागा मिळणार आहे.

गुप्तरोगाबाबत काहीही लपवू नका
(रविवारी मोफत तपासणी)
या अशा अडचणी असतात ज्या कोणाला सांगता येत नाहीत व न सांगितल्याने त्या वाढत जातात पण काळजी करू नका डॉक्टरपासून काहीही लपवू नये, ते आपले सर्व प्रश्न सहज सोडवितात. डॉ. शेख आजपर्यंत 200 पेक्षा अधिक पुरस्काराने सन्मानित, प्रचंड अनुभवी व अत्यंत माफक खर्चात इलाज करतात, आजपर्यंत लाखों पेशंटनी याचा अनुभव घेतलाय, आपली माहिती अत्यंत गुप्त ठेवली जाते, आयुर्वेदाने सर्व रोग नष्ट होतात, (रविवारी मोफत तपासणी).
आपल्या सर्व चिंताचा एकमेव उपाय म्हणजे डॉ. शेख यांचे नवजीवन आयुर्वेदीक डीस्पेंसरी. आजच भेट द्या व खात्री करा.



डॉ. शेख ए.एच.
नवजीवन आयुर्वेदिक डिस्पेन्सरी
सेंट्रल बसस्टँड समोर, हॉटेल मिर्झा जवळ, औरंगाबाद.
फोन : (0240) 2350042, मो. : 9021111549 www.drshaikhah.in

शहरातील विश्वसनीय बिग सुपर मार्केट
महावीर
घर संसार
किराणा | सुका मेवा | मसाले | क्रॉकरी
प्लास्टिकच्या वस्तू | स्टीलच्या वस्तू | ॲल्युमिनियमच्या वस्तू
घरगुती उपकरणे | साफ सफाईचे सर्व साहित्य | आणि बरेच काही
सुमित 7620111118 राजेश जैन 7588348738
रमेश जैन (क्रॉकरी) 9860481142 7620111117
व्हॉट्सअपवर ऑर्डरसाठी 9850017181
वितरण स्थितीसाठी 9021395308
घाऊक चौकशीसाठी 7620111118
www.mahavirbestprice.com sumitparakh73@gmail.com
S.P. रोड, चेलीपुरा, शहागंज, छत्रपती संभाजीनगर
प्लॉट क्रमांक A25, MIDC पोलिस स्टेशन समोर, चिकलठाणा, छत्रपती संभाजीनगर